नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास

(Netravali parisaratil lokgeetancha Abhyas)

एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका

MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

मराठी अध्ययनशाखा
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

अभ्यासक

आशिष नारायण परवार

हजेरी क्र. 22P0190002
ABC ID 51448801861
पी. आर 201912521

मार्गदर्शक

डॉ. हेमंत बाळकृष्ण अय्या

(सहायक प्राध्यापक)
मराठी अध्ययनशाखा
शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष 2023 – 2024

NETRAVALI PARISARATIL LOKGEETANCHA ABHYAS

Submitted in partial fulfilment of Masters Degree

MA in Marathi

MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

Marathi Discipline

Shenoi Goembab School of Language & Literature

Goa University

by

Ashisha Narayan Parwar

Seat No: 22P0190002

ABC ID: 51448801861

PRN: 201912521

Under the supervision of

Dr. Hemant Aiya

(Assistant Professor)

Marathi Discipline

Shenoi Goembab School of Language & Literature

Goa University

2023 – 2024

DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, "नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास" is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Dr. Hemant B. Aiya and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

(Ashisha Narayan Parwar)

Seat no: 22P0190002

Date: 15/04/2024

Place: Goa University

COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report **"नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास"** is a bonafide work carried out by Mr. **Ashisha Narayan Parwar** under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

15/04/2024

Dr. Hemant B. Aiya

Date: 15/04/2024

Signature of Dean of the School

Date: 25/04/2024

Place: Goa University

GOA UNIVERSITY SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE TALEIGAON PLATEAU

School Stamp

मनोगत

गोवा विद्यापीठाला प्रबंधिका सुपूर्त करताना मला अतिशय आनंद होत आहे. नवखा विषय ते आवडता विषय असा माझा संबंध लोकासाहीत्याशी आलेला आहे. बी.ए पर्यंत 'लोकसाहित्य' या विषयी मी काहीच वाचले, ऐकले, नव्हते. विद्यापीठात आल्यानंतर लोकसाहित्य म्हणजे काय ते समजले. पहिल्या वर्षात आम्हाला प्राध्यापक जयेश गावकर सर लोकसाहित्य विषय शिकवायचे. सुरुवातीला वाटायचे की कथा, कादंबरी, नाटक हे सुद्धा लोकसाहित्य असावे कारण ते कोणीतरी लिहिलेले असते. जयेश सरांनी आम्हाला लोकसाहित्याची ओळख करून दिली. तेव्हा समजले की लोकसाहित्य कोणाला म्हणावे. मला वाटायचे लोकसाहित्य हे वेगळे काही नसून आपल्या लोकजीवनात येणाऱ्या सर्व गोष्टींचा अभ्यास यात केला जातो त्यामुळे याविषयाकडे आपुलकी निर्माण झाली.

एम. ए भाग एकमध्ये असताना हेमंत अय्या सर आम्हाला भाषाविज्ञान विषय शिकवायचे. तेव्हा त्यांनी सादरीकरणाच्या निमित्ताने सांगे परिसरातील धनगरी बोली असा विषय दिला होता. माझे अनेक मित्र त्या समाजातील असल्याने मला त्याविषयी लिहिणे सोपे गेले. पुढे हा प्रबांधिकेसाठी विषय घ्यायचे ठरविले पण आमच्याच वर्गातील एक विद्यार्थिनीने 'धनगरी बोली' हा विषय निवडल्याने मी तो विषय सोडून दिला. शेवटी लोकगीतांवर अभ्यास करण्याचे ठरविले. नेत्रावळी परिसर परिचयाचा असल्याने मी तो परिसर निवडला व शेवटी **'नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास'** असे शीर्षक निवडले.

सुरुवातीला जयेश गावकर सरांशी बोलणी करुन एकूण स्वरूप कसे असेल याचा नमूना तयार करायला मदत केली. दुसऱ्या वर्षाच्या सुरुवातीला माझे मार्गदर्शक हेमंत अय्या सरांनी प्रकरणांची मांडणी कशी असेल यावरून चर्चा करुन कामाला सुरुवात करायला सांगितले. त्यावेळी हेमंत अय्या सरांचा 'गोमंतकातील काणकोण तालुक्यातील लोकसाहित्य: चिकित्सक अभ्यास' हा प्रबंध विद्यापीठात सुपूर्त होत असल्याने त्यांच्या मागदर्शनाखाली काम करायला संधी मिळाली होती.

नेत्रावळी परिसरविषयी जास्त काही माझ्या वाचनात आले नव्हते. वृत्तपत्रांवर तेथील परिसरबद्दल आलेले किंवा पर्यटन विकासाच्या बाबतीत आलेले लेखन अनेकदा वाचण्यात आले होते. अशा वेळी हेमंत सरांनी मला 'उल्हास प्रभू देसाई' यांचा *'गंगावळळी शंखावळळी नेत्रावळळी पर्तगाळळी'* हे पुस्तक

सुचविले. त्या पुस्तकात नेत्रावळी विषयी अनेक चांगली माहिती मिळली होती त्या पुस्तकाचा आधार मला खूप झाला. या प्रबंधिकेत महत्त्वाचे कार्य म्हणजे संकलन. परिचयाचा परिसर असूनदेखील संकलनासाठी मला लोकांचे सहकार्य व्यवस्थित लाभले नाही. माझे मार्गदर्शन हेमंत अय्या सरांचे मी सर्वप्रथम ऋण व्यक्त करतो कारण सरांनी आम्हाला ज्या ज्या वेळी गरज भासली त्यावेळी वेळात वेळ काढून मार्गदर्शन केले. माझ्या संकलनामागे मला नेत्रावळी परिसरात लोकांची भेट करून देणारे माझे मित्र हरीश अंकुश फडते व परिसारविषयी माहिती देणारे उमेश गावकर यांचा मी मनापासून आभारी आहे. तसेच संकलनासाठी जाताना काही पूर्वनियोजन नसतानाही आम्हाला वेळात वेळ काढून आम्हाला लोकगीते म्हणून दाखविल्याबद्दल चंद्रकांत गावकर, रामचंद्र गावकर, कुष्टा गावकर, अक्षदा गावकर, या सर्वांचा मी ऋणी आहे. माझे आई-वडील नारायण मंगेश परवार आणि नंदिनी नारायण परवार यांनीही मला खूप पाठिंबा दिला. सण-उत्सव कसे साजरे करतात, विधी कशी केली जाते याविषयीची माहिती मला दिली. त्याबद्दल मी त्यांचेही ऋण व्यक्त करतो.

संशोधन लेखन कधीच केले नव्हते. ललित लेखन करत असल्याने अनेक भाषिक अडचणी, वाक्य निर्मिती, वस्तुनिष्ठ भाषा वापरण्यात अडथळा निर्माण झाला. या प्रबांधिकेमुळे अनेक अजाणत्या गोष्टी मला समजल्या. सुरुवातील असे वाटले की संकलन होणार नाही. देवाच्या आशीर्वादानेच माझे संकलन झाले असे मला वाटते.

गोवा विद्यापीठातील मराठी विभागातील प्राध्यापकांची मला मदत केली. तसेच प्रबंधिकेच्या गटातील माझे सहकारी वर्षा घाडी, पूर्वा शिरोडकर, तेजस्वी हळर्णकर, तन्वी वेळीप यांचेही सहकार्य महत्त्वाचे होते. त्यासाठी मी त्यांचेही ऋणी आहे. संदर्भ ग्रंथासाठी मला गोवा विद्यापीठाचे ग्रंथालय, सांगे ग्रंथालय, कुडचडे ग्रंथालय, कृष्णदास शामा ग्रंथालय पणजी, यांचीही मदत मला मिळाली. तेथील ग्रंथपाल आणि कर्मचारी वर्गाचेही मनःपूर्वक आभार.

नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास

अनुक्रमणिका

प्रकरण क्र		पृष्ठ संख्या
Declaration		
Completion certificate		
मनोगत		I-II
प्रस्तावना		1-5
१	**लोकसाहित्य, लोकासंकृती आणि गोमंतक**	6-30
२	**नेत्रावळी परिसराचा सामाजिक आणि सांस्कृतिक परिचय**	31-52
३	**नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मय: व्याप्ती आणि मर्यादा**	53-66
४	**नेत्रावळी परिसरातील लोकगीते आणि प्रकार**	67-87
५	**निष्कर्ष**	88-89
परिशिष्ट		90-111
संदर्भ सूची		112-114

तक्ता

	तक्ता	पृष्ठ क्र.
१.८	गोमंतकीय लोकसाहित्य	21
१.१०	गोमंतकीय लोकगीतांचे प्रकार	24
२.१	हळळी' शब्दाचा अपभ्रंश	35
२.३.७	नेत्रावळीतील जमिनीचा वापर	39
२.४.३	धनगरी बोलीचा नमुना	42
३.१	नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मय	54

प्रस्तावना

पश्चिमेकडे सर्वात आधी ‘Folklore’ ही संकल्पना ‘समाजशास्त्र’ व ‘मानवशास्त्र’ ह्या अभ्यासातून आली. सर **विल्यम जोन्स थॉमस** या इंग्रजी पुरतत्वज्ञाने ‘Folklore’ ही संज्ञा सर्वप्रथम वापरली. जागतिक पातळीवर इंग्लंडमध्ये ‘folklore society’ उदयास आली आणि त्यानंतर त्या माध्यमातून लोकसाहित्य अभ्यासाला चालना मिळाली. ‘Folklore is historical science’ हा ग्रंथ १९०९ मध्ये **जी. एल. गोम्मे** यांनी प्रकाशित केला ह्या ग्रंथाचा प्रभाव लोकावर व अभ्यासकावर झाला. महाराष्ट्रात तसेच गोव्यातही लोकसाहित्याचा विविध अंगाने अभ्यासक संशोधन करताना दिसतात.

या प्रबंधिका लेखनाचा विषय ‘नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास’ असा असून दक्षिण गोव्यातील सांगे तालुक्यातील नेत्रावळी परिसराच्या लोकगीतांचा अभ्यास होणार आहे. लोकगीते म्हणजे लोकनिर्मितीतून उदयास आलेली आणि मौखिक परंपरेतून पिढ्यान पिढ्या संक्रमित होत असलेली गीते. त्यांचा कर्ता हा अनामिक असतो. त्याचबरोबर लोकसाहित्याचा अभ्यास करताना आपण त्याचा इतर ज्ञानशाखांशी असलेला संबंध पाहू शकतो. इतर परिसरातील लोकगीतांपेक्षा तिथल्या भौगोलिक दृष्टीने वेगवेगळे संदर्भ असू शकतात याचा आढावा घेतला जाणार आहे. त्यामध्ये नेत्रावळी परिसराचा सामाजिक आणि सांस्कृतिक अभ्यास ज्यामध्ये तिथला समाज, जीवनशैली, व्यवसाय, सण-उत्सवांचा आढावा सदर प्रबंधिकामध्ये समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न आहे.

संशोधन विषयक समस्या

लोकसाहित्य हा लोकमानसाचा आविष्कार आहे. लोकसाहित्यात परंपरा टिकविणे आणि त्याचे पुनररूप जीवित करणे या क्रिया घडतात. लोकगीतांना अति-प्राचीन परंपरा लाभलेली आपल्याला आढळते. जेव्हा एखादा समाज समूह जीवन जगायला लागला तेव्हापासून लोकगीतांची परंपरा सुरू असल्याचे आढळते. गोव्यातील इतर परिसराप्रमाणेच नेत्रावळी परिसरातही लोकगीतांचा साठा आढळतो. जाणकार माणसे आता कमी झाल्याने ते ज्ञान पुढील पिढीस पोहचविणे काळाची गरज ठरते. मुळ गीते

सादरीकरणानिमित्त रंगमंचावर सादर होतात तेव्हा त्यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाने बदल होत असतो. त्यामुळे मूळ गीते बाजूला राहताना दिसतात.

आजची पिढी आपल्या मूळ संस्कृतीपासून दूर होत चाललेली आहे. आपला सांस्कृतिक सर्वसंपन्न असा असलेला ठेवा काय आणि कसा आहे याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आपल्या विशिष्ट स्थळाची असलेली एक ओळख जपून ठेवणे तितकेच महत्त्वाचे आहे. आजपर्यंत झालेल्या अभ्यासानुसार नेत्रावळी परिसरातील लोकगीतांवर अभ्यास झाल्याचे वाचनात आढळून आलेले नाही. तसेच बदलत्या काळात तिथली जीवनपद्धती, समाज, सण, उत्सव, विधी, परंपरा यामध्ये झालेले बदल व कारणे पडताळून पाहण्यात येईल.

संशोधन कार्याची उपयुक्तता / आवश्यकता.

जसा प्रदेश बदलतो तसा लोकगीतांच्या आविष्कारणात बदल होत असतो. त्याचबरोबर लोकगीतांना स्थानिक वैशिष्ट्यांचा गंध असतो. त्यामुळे त्या लोकगीतांचा अभ्यास होणे आवश्यक आहे. त्या परिसरातील लोकजीवनाचे वैशिष्ट्य पडताळून पाहणे. लोकसाहित्याची जाण असलेली वृध्द माणसे कमी होत चालली असल्यामुळे आपल्या लोकगीतांचे संकलन आणि संवर्धन होणे ही काळाची गरज बनलेली आहे. आपल्या भावी पिढीला आपली लोकसंस्कृती, लोकपरंपरा यांची ओळख व महत्त्व हे पुढच्या पिढीला या अभ्यासातून उपयुक्त ठरणार आहे. काळाबरोबर आपल्या लोकगीतामध्ये होत असलेल्या बदलांचाही इथे अभ्यास होणे आवश्यक आहे .

संशोधन कार्यामागची उद्धिष्ट्यें

- नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचे संकलन करुन त्याची वर्गवारी करणे.
- नेत्रावळी परिसरातील लोकगीतांची स्थलविषयक वैशिष्ट्य शोधणे.
- नेत्रावळी परिसरातील लोकगीतामध्ये असलेला आशय पडताळणे.
- नेत्रावळी परिसरातील लोकगीते आणि तिथला परिसर यांचा सहसंबंध जाणून घेणे.
- नेत्रावळी परिसरातील मौखिक परंपरांचे बलस्थानांचा शोध घेणे.

गृहितकांची मांडणी

- नेत्रावळी परिसरातील लोकगीतांतून तिथल्या स्थळवैशिष्ट लोकसंस्कृतीचे चित्रण होते.
- लोकगीतांचे संदर्भ आपल्या दैनंदिन जीवनाशी निगडित असतात.
- अनेकदा लोकगीतांतून सामूहिक प्रश्नांना वाचा दिली जाते.
- पौराणिक कथा, अख्यायिका यांचा संदर्भ घेऊन लोकगीते आविष्कृत होत असतात.
- गतकालीन जीवनाचे संदर्भ लोकगीतांमधून अभिव्यक्त होत असतात.

संशोधन पद्धती

सामाजिक अंगाने पुढे सरकणारा असा अभ्यास आपण लोकसाहित्याचा अभ्यास असे म्हणू शकतो. लोकगीते ही उगीच प्रगत नसून त्याच्यामागे काहीतरी कारण दडलेले असते. समाजातील मौखिक परंपरा संस्कृती यांचा शोध घेण्यासाठी सर्वेक्षण पद्धतीची आवश्यकता भासते. त्याचबरोबरच प्रबांधिका लेखन करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर संशोधनात होणार आहे.

- सर्वेक्षण पद्धती

नेत्रावळी परिसरातील अभ्यास सदर प्रबंधिकेत होत असल्याने इथे सर्वेक्षण पद्धतीने अभ्यास होणार आहे. मुलाखती घेणे, प्रत्यक्ष भेट देणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करुन घेणे, दृक-श्राव्य माध्यमाच्या आधारे, संकलन करणे, छायाचित्रे मिळविणे, उत्सवाच्यावेळी तो उत्सव प्रत्यक्ष अनुभवणे आदी पद्धतीद्वारे सदर संशोधन आकाराला येईल.

- वर्णनात्मक पद्धती

संकलनातून मिळालेल्या माहितीची शास्त्रीय पद्धतीने मांडणी करून त्यांची वर्गवारी करणे, त्यांचे विश्लेषण करुन चिकित्सा करणे असे या प्रबंधिकेचे स्वरूप असणार आहे. लोकगीतात आलेला आशय वर्णनात्मक पद्धतीने होणार आहे.

संशोधनाचा आराखडा

‘नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास’

प्रकरण १. लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि गोमंतक.
प्रकरण २. नेत्रावळी परिसराचा सामाजिक आणि सांस्कृतिक परिचय • समाज • जीवनशैली • व्यवसाय • सण उत्सव आदी
प्रकरण ३. नेत्रावळी परिसरातील लोकवाङमय
प्रकरण ४. नेत्रावळी परिसरातील लोकगीते, आणि प्रकार • स्त्रिगीते • पुरुषगीते
प्रकरण ५. समारोप. • निष्कर्ष • संदर्भ • व्यक्तीनामसुची • परिशिष्टे • छायाचित्रे

समारोप

'नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास' या विषयाअंतर्गत सांगे तालुक्यातील नेत्रावळी परिसराचा विविध लोकगीतांचा अभ्यास होणार आहे. तिथल्या लोकगीतांतून दिसणाऱ्या तेथील समाजाचे वर्णन त्यामधून होणार असून यापूर्वी असा अभ्यास झालेले वाचनात आले नाही. सदर प्रबंधिकेसाठी जाणकारांच्या, लोककलाकारांच्या माहितीद्वारे संकलन करून प्रबंधिकेची मांडणी करायची आहे. एकंदरीत गोमंतकीय लोकसाहित्यातील अनेक बारकाव्यांची उकल करण्याची क्षमता येथील लोकसाहित्यात असावी अशी अपेक्षा आहे.

प्रकरण १

लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि गोमंतक

प्रास्ताविक......8

१.१ लोकसाहित्य म्हणजे काय?......8

१.२ लोकसाहित्य : संकल्पना......9

१.३ लोकसाहित्याच्या व्याख्या 10

१.३.१ पाश्चात्य अभ्यासकांच्या व्याख्या......11

१.३.२. भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या......12

१.३.३ मराठी भाषिक लोकसाहित्य अभ्यासकांच्या व्याख्या 13

१.४ 'लोकसाहित्य' पदाची पुर्वपरंपरा......15

१.५ लोकसाहित्याची लक्षणे 15

१.६ लोकसाहित्याची व्याप्ती......17

१.७ लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती 18

१.८ गोमंतकीय लोकसाहित्य 20

१.८.१ गोमंतकीय लोकसाहित्याचे वर्गीकरण......21

१. ९ 'लोकगीत' म्हणजे काय? 22

१.९.१ लोकगीतांच्या व्याख्या 22

१.९.२ लोकगीताच्या प्रेरणा 23

१.१० गोमंतकीय लोकगीतांचे प्रकार......23

१.११ गोमंतकीय लोकसंस्कृती 24

१.११.१ गोमंतकीय सांस्कृतिक सीमारेषा......25

१.११.२ परिसराचा प्रभाव......25

१.१२ समारोप......26

१.१३ निष्कर्ष 27

संदर्भ 27

प्रकरण १

लोकसाहित्य, लोकसंस्कृती आणि गोमंतक

प्रास्ताविक

लोकसाहित्य हे लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकमन, यांच्यापासून उदयास आलेली लोककला आहे. मानवी जीवनाच्या प्रवासाचे प्रतिनिधित्त्व लोकसाहित्य करते. समाजजीवनाचा लोकसाहित्याशी अतूट संबंध आहे. प्रत्येकाच्या घरात अनुभवायला मिळणारी गोष्ट लहानपणी मुलांचे आजी-आजोबा झोपताना गोष्टी सांगतात, गाणी म्हणतात, यातूनच मुलांमध्ये संस्कार रुजवले जातात. लोकसंस्कृती म्हणजे एक प्रकारची जीवनशैली होय. अशा या साहित्याचा अभ्यास गोमंतकीय अभ्यासकांनी केला आहे; त्यात **पद्मश्री विनायक खेडेकर, उल्हास प्रभुदेसाई, पांडुरंग फळदेसाई, जयंती नायक, हेमंत अय्या** या अभ्यासकांची नावे आवर्जून घेतली पाहिजेत.

पहिल्या प्रकरणात लोकसाहित्य म्हणजे नेमके काय? विविध लोकसाहित्य अभ्यासकांच्या व्याख्याव्दारे इथे लोकसाहित्याचे स्वरुप कसे आहे हे सांगण्यात आले आहे. लोकसाहित्याची संकल्पना सांगताना **गास्टर** या अभ्यासकाचे मत नमूद केले आहे. व्याख्यांच्या आधारे लोकगीतांचे स्वरूप निश्चित केले आहे. त्याचबरोबर स्त्रीगीते आणि पुरुषगीते असे दोन भाग पडण्यात आलेले आहेत. प्रस्तूत प्रकरणाद्वारे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीतील विविधायामांचा गोमंतकासंदर्भातील पडताळ केलेला आहे.

१.१ लोकसाहित्य म्हणजे काय?

लोकसाहित्य म्हणजे पिढ्यान् पिढ्या चालणारे संक्रमित ‘साहित्य’ व ‘जीवन - सामग्री’ होय. लोकांनी लोकांसाठी तयार केलेले मौखिक तसेच कृतीशील ‘साहित्य’ म्हणजे लोकसाहित्य. मानवी उत्क्रांतीच्या दशेतून नकळतपणे समाजात रूढ झालेली व आदिम परंपरा लाभलेली व्यापक अशी ही संकल्पना आहे. लोकाविष्काराची समग्रता त्यात सामावलेली आहे. मुळात ‘लोकसाहित्य’ हे लोकसंस्कृतीतून घडलेले आविष्कार असते. लोकवाङ्मय म्हणजे वाणीयुक्त असे ज्यात लोकगीते, लोककथा,

उखाणे, म्हणी, वाक्प्रचार यांचा समावेश होत असतो. 'लोक' ही संज्ञा मुळात ग्रामीण जीवन जगत असलेल्याच लोकांसाठी आहे. लोकसाहित्याची निर्मिती 'एकनिष्ठ', 'एककेंद्रीय', 'व्यक्तीप्रधान' नसून ती समुहनिष्ठ असते. समूहाच्या एकत्रीकरणातून लोकसाहित्य निर्माण होत असते.

लोकसाहित्याचा कर्ता हा अदृश्य आणि अज्ञात असतो. लोकपरंपरा, लोकरुढी, लोकविश्वास, लोकभ्रम, लोकविधी, लोकनाट्य, विधीनाटय, इत्यादीतून लोकसाहित्यातील 'लोकमानस' व्यक्त होतो. लोकाविष्कार, लोकविचार, लोकविश्वास, लोकरूढी, लोकभ्रम यांचा समावेश मौखिक परंपरेसोबतच होतो. वस्तुत: 'लोकसाहित्य' हे लोकांचे जीवन जगण्याची पद्धत असते; आणि ती पूर्वापार चालत आलेली असते. लोकजीवनातील परिवर्तनाच्या ओघात ती बदलत राहते. तसेच लोकसाहित्यातून लोकजीवनाला एक वेगळे वळण प्राप्त होते. त्यामूळे लोकसाहित्य आणि लोकजीवनाला एका नाण्याच्या दोन बाजू म्हणणे गैर ठरणार नाही. "लोकसमुहातील घटक व्यक्तीचे परस्परांतील भावसंबंध कायम राहतात. चिंता, भय, आनंद हे भाव एकत्रीतपणे अनुभवले जातात आणि व्यक्त केले जातात. त्यामुळे व्यक्तीची एका अर्थाने मानसिक व भावनिक गरज भागविली जाते." [1] असे प्रभाकर मांडेचे मत होय. लोकसाहित्य हे लोकमानसाची सहज व स्वाभाविक अभिव्यक्ती आहे. लोकमानसाची ही कृती उक्तीतून होणारी अभिव्यक्ती परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेली असते. या अभिव्यक्तिमागील लोकचेतना लोकसाहित्याला उभारी देत असते. लोकजीवनात प्रचलित ठेवीत असते.

लोकसाहित्य हे संचित ज्ञान असल्याने ते एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला पोहोचविण्याचे कार्य करत असते. त्यामुळे लोकजीवनाला भूतकालीन संबंधाशी जोडले जाते. तसेच लोकसाहित्याला आपण शिकवण देणारे एक उत्तम साधन म्हणू शकतो.

१.२ लोकसाहित्य : संकल्पना

१७ व्या शतकाच्या आसपास लोकसाहित्य अभ्यासाला सुरुवात झाली. सतराव्या आणि अठराव्या शतकात लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विषेश प्रयत्न झाले. एकोणिसाव्या शतकात लोकसाहित्याचे संकलन आणि शास्त्रीय अभ्यास सुरु झाला. **विल्यम जॉन थॉमस** याने लोकसाहित्याच्या सामग्रीला प्रथमत:

'Folklore' ही संज्ञा वापरली. याआधी या सामग्रीला 'Popular Antiquities' म्हटले जायचे. पुरातत्त्वीयशास्त्राचा अभ्यास या सामग्रीसाठी केला जायचा. पाश्चिमात्य देशांत सर्वात आधी 'Folklore' ही संकल्पना 'मानवशास्त्र' व 'समाजशास्त्र' या दोन शाखांमधून आली.

जागतिक पातळीवर इंग्लंडमध्ये 'Folklore Society' उदयास आली आणि लोकसाहित्य अभ्यासाला चालना मिळाली. **जी. एल. गोम्मे** यांचा सन. १९०९ मध्ये प्रकाशित झालेला 'Folklore Is Historical Science' या ग्रंथाचा प्रभाव अभ्यासाकांवर फार झाला. भारतात लोकसाहित्याच्या चर्चेला साधारणतः इ.स १८५० नंतर सुरू झाली.[2] राजारामशास्त्री भागवतांनी शास्त्रीय दृष्टिकोनातून लेखन कार्य केले. निबंधमालेमध्ये लोकसाहित्याला विशेष स्थान विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी दिले. तद्नंतर विसाव्या शतकात **दुर्गा भागवत, वि. का. राजवाडे, ना. गो. चाफेकर, प्रभाकर मांडे, नामदेव व्हरटकर, गंगाधर मोरजे, सरोजनी बाबर** इत्यादि अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या अंतरंगाचा वेध घेतला.

'Folklore' मधील 'Folk' या शब्दासाठी 'लोक' आणि 'Lore' या शब्दासाठी 'साहित्य' अशा दोन पदांच्या एकत्रीकरणातून 'लोकसाहित्य' या शब्दाची निर्मिती झाली. हिंदीमध्ये 'Folklore' साठी 'लोकवार्ता' हा शब्द वापरण्यात आला. **दत्तो वामन पोतदार** यांनी 'Folklore' साठीचे भाषांतर या अनुषंगाने 'लोकविद्या' हा शब्द सुचविला. पण हा शब्द तितका रूढ होवू शकला नाही. नंतर दुर्गा भागवतांचा 'लोकसाहित्य' हा शब्द सुचविला आणि तो रूढ झाला.[3]

१.३ लोकसाहित्याच्या व्याख्या

'लोकांनी लोकांसाठी तयार केलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य' अशी ढोबळ अर्थाने आपण लोकसाहित्याची व्याख्या करतो. तसेच विविध अभ्यासक आपल्या आकलनाच्या आधारे त्या विषयीचे मत मांडत असताना लोकसाहित्य म्हणजे काय? याचे विवेचन करून साच्यात बसविण्याचा प्रयत्न अभ्यासकांनी केलेला दिसतो.

१.३.१ पाश्चात्य अभ्यासकांच्या व्याख्या

१) “लोकजीवनातील पारंपरिक व्यवसायाचे ज्ञान व कौशल्य, लोकजीवनातील रुढी- प्रथा, मौखिक परंपरेने प्रचलित असलेली गीते, कथा, लोकोक्ती, नृत्ये- खेळगीते व उत्सव इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात करता येतो.” [4]

मरियस बार्डो

२) “लोकसाहित्याची निर्मिती आदिम जीवनात झालेली असून ते परंपरेने पुढच्या पिढीस प्राप्त होत असते. ही निर्मिती ध्वनी आणि शब्द यांच्याबरोबर लोकविश्वास, लोकभ्रम, रुढी - प्रथा, लोककला, नृत्य- नाट्य इत्यादि स्वरूपाची असते. लोकसमुहाचा पारंपरिक लोकजीवनाचा आविष्कार म्हणजे लोकसाहित्य.” [5]

जोनास बॅलिस

३) “मिथ्या, म्हणी, लोकगीते, यासारखे कलात्मक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य.” [6] याचाच अर्थ असा की, भाषेच्या माध्यमातून मौखिक रूपातील शब्दाविष्करातून अभिव्यक्त होणाऱ्या पारंपरिक कलात्मक आविष्काराना बॅस्कम लोकसाहित्य म्हणतात.

विलियम बॅस्कम

४) “लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्वाचा घटक असून तो लोकांकडून विचारपूर्वक किंवा अजाणता संरक्षिला जातो. लोकसाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचा सर्वसांग्रहाक असा घटक असते. लोकसाहित्य हे कला व वाङ्मय यांचा स्रोत असते.” [7]

थिओडोर एच गास्टर

५) “लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. त्याचा निर्माता अज्ञात असतो. त्याची निर्मिती कुणीतरी एका व्यक्तीकडून झालेली असली तरी निश्चितपणे त्या व्यक्तीचे नाव सांगता येत नाही. त्या रचनेचे स्वरूपही बदलते असते.” [8]

आर्चर टायलर

वरील पाश्चात्य अभ्यासकांच्या व्याख्या पडताळताना **जोनास बॅलिस, थिओडोर एच गास्टर, आर्चर टायलर** यांनी मांडलेल्या व्याख्या एकसारख्याच वाटतात. तसेच त्यांनी लोकसाहित्य म्हणजे काय? हे सरळ व साध्या शब्दात मांडले आहे. **मरियस बार्डो** यांची व्याख्यातून एकूण लोकसाहित्यात येणाऱ्या बाबींना न्सामावून घेतले आहे. **विलियम बॅस्कम** यांनी इथे ‘शब्दाविष्काराला’ जास्त महत्त्व दिलेले आहे. एकंदरीत व्याख्याद्वारे असे लक्षात येते की लोकसाहित्यातून लोकजीवनाचे प्रतिबिंब दिसते.

१.३.२. भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या

१) “हम अपनी दृष्टिसे कह सकते है कि लोक मनुष्य समाज का वह वर्ग है, और जो एक परंपरा के प्रवास में जिवित रहता है, ऐसे लोक की अभिव्यक्ति में जो तत्त्व मिलते है वे लोकतत्त्व कहलाते है। ऐसे लोक या साहित्य ही लोकसहित्य है”। [9]

डॉ. सत्येंद्र

२) “लोकसंकृति के अंतर्गत जनजीवन से संबंधित जितने आचार-विचार विधि निषेध, विश्वास, प्रथा, परंपरा, धर्म, मुढग्रह, अनुष्ठान आदि है वे सभी आते है फोकलोअर के अंतर्गत भी ये ही विषय समाविष्ट है। अंत: लोकसंकृती पद फोकलोअर के व्यापक तथा विस्तृत अर्थ को प्रकाशित करने मे सर्वथा समर्थ है”[10]

डॉ. कृष्णदेव उपाध्याय

३) लोकसहित्यची व्यापकता स्पष्ट करताना म्हणतात ‘‘लोकवार्ता एक जीवितशास्त्र है। लोक मैं बसनेवाली जन, जन की भूमि और भौतिक जीवन तथा तीसरे स्थान में उन जन को संकृति, इन तीनों क्षेत्र में लोक के पुरे ज्ञान का अंतर्भाव होता है और लोकवार्ता का संबंध भी उन्ही के साथ है’’[11]

डॉ. वासुदेव शरण अग्रवाल

४) ‘भारतीय लोकसाहित्य’ या ग्रंथात लोकसहित्याची व्यापकता मांडली आहे. ते म्हणतात, ‘‘लोक ही अपरिमित शक्ति, साहस, मनोमान, मान्यताएं, विश्वास, रोगद्वेष, परंपराएं, अड़ाके, टोने टोनके, अनुष्ठान रितिरिवाज, गति कथाएं, वेशभूषा, आदि संयुक्त रूप से लोकवार्ता के चेतन अस्तित्त्व की घोषणा करते है, लोकवार्ता केवल प्राचीन अवशेषमात्र रूढ़ियों का अध्ययन ही प्रस्तुत नही करता वरना जीवीत लोकभावों लोकाभिव्यक्तियॉ एवं उनकी प्रवाहमान प्रक्रियाओं का भी अध्ययन करता है’’ [12]

डॉ. शाम परमार

भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या गोंधळात टाकणाऱ्या आहेत. सर्वांच्या व्याख्या एक सारख्याच वाटत असल्या तरी त्या भिन्न आहेत. **डॉ. वासुदेव शरण अग्रवाल** यांनी लोकसाहित्याला जीवितशास्त्र मानले आहे. भारतीय लोकसाहित्याची व्यापकता **शाम परमार** यांनी आपल्या व्याखेत मांडली असली तरी लोकगीते, म्हणी,वाक्प्रचार, उखाणे या लोकोक्तीचा उल्लेख आढळत नाही.

१.३.३ मराठी भाषिक लोकसाहित्य अभ्यासकांच्या व्याख्या

१) अनेक शास्त्राप्रमाणे लोकसाहित्य हे पाश्चात्य अभ्यासकांनी एक अभ्यासनीय शास्त्र बनविले आहे. असे लोकसाहित्याच्या संदर्भात चिं. ग. कर्वे पुढील प्रमाणे नमूद करतात, ‘‘पुरातन काळापासून चालत आलेले व बहुधा तोंडी असलेले वाङ्मय , गाणी, म्हणी, कोडी, यांना लोकसाहित्य असे म्हणता येईल,’’[13]

चिं. ग. कर्वे

२) “विविध प्रकारांच्या जातिवंत स्वरविलासानी शिणगारलेले व अशिक्षितानी कित्येक वर्षांमागे रचले असताही केवळ पाठांतराच्या बळावर पिढ्यानपिढ्या अपल्या नव-नवोन्मेषशलिनी तेजाने पुढच्या पिढीला उत्तेजित करणारे ते लोकसाहित्य.” [14]

डॉ. सरोजिनी बाबर

३) “लोकसाहित्य लोकप्रतिभेचा आविष्कार असतो. तसेच लोकांच्या पारंपरिक जीवनाचा संदर्भ दडलेला असतो. लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते. त्यातून समाजमानस अभिव्यक्त होते.” [15]

डॉ. प्रभाकर मांडे

४) “लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्याच होणारे बदल यांचे निरीक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे. मानव व त्याच्या सभोवारची चराचर सृष्टी हिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासानंतर विशेष लक्षात येते.” [16] असे मत मांडले आहे.

दुर्गा भागवत

५) लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असले तरी लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती नव्हे. लोकसाहित्याशिवाय इतरही अनेक आविष्कारतून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते ते म्हणतात, “लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे हे खरेच, परंतु लोकसाहित्येतरवाङ्मयीन सामग्रीतून लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ प्रवाहाचे दर्शन घेता येते.” [17]

डॉ. रा. चिं. ढेरे

सरोजिनी बाबर यांनी 'पाठांतराला महत्व दिले आहे. लोकसाहित्य हे लिखित स्वरुपात नसते. पाठांतर हेच प्रमुख माध्यम असते. त्यामुळे वरील विधान लागू पडण्यासारखे आहे. मानवी जीवन आणि लोकसाहित्याचा संबंध इथे **रा. चिं. ढेरे** स्पष्ट करताना म्हणतात कि 'मानव व सृष्टी यांचे नाते लोकसाहित्यातून उलघडते'. वरील अभ्यासकांच्या व्याख्या विचारात घेताना दिसून येते की, मानवी जीवनाशी निगडीत उद्भवणाऱ्या 'शब्द' आणि 'शब्देत्तर' कलांना सामावून घेत मौखिक आविष्कार आविष्कृत होते.

१.४ 'लोकसाहित्य' पदाची पुर्वपरंपरा

'लोकसाहित्य' हा शब्द 'लोक' आणि 'साहित्य' अशा दोन पदापासून बनलेला आहे. हा शब्द इंग्रजीतील 'Folklore' या पदासाठी वापरला जातो. महाराष्ट्रामध्ये लोकसाहित्य संकलनाची व लेखनाची सुरुवात इ. स १८५८ पासून सुरु झाली असली तरी, इ. स १९१५ पासून 'लोकसाहित्य' ही संज्ञा वापरण्यास सुरुवात केली. त्यानंतरच इ. स १९१६ पासूनच लोकसाहित्याच्या अभ्यासाला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. सुरुवातीला लोकसाहित्य म्हणजे लोकांचे साहित्य असे ढोबळ अर्थाने ओळखले जायचे. पुढे अभ्यासकांनी त्याचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला व विशेष नोंदी घेऊन संकल्पना पुढे आणल्या. स्वरुपाची निश्चिती झाली व पुढे व्याख्यांची मांडणी केली. लोकसाहित्याच्या कक्षा, आधार आणि महत्त्व लोकांच्या मनावर कोरण्याचे काम कै. वि. का. राजवाडे यांनी इ. स १९२० मध्ये केले. 'सज्जनगडावरचे एक लोकगीत' या लेखात त्यांनी 'लोकगीत' हा शब्द वापरला. तसेच लोककथा हा ही शब्द सर्वप्रथम त्यांनीच वापरला. १९३० साली 'लोककथा' हे शं. गो. दाते यांचे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यांच्या प्रस्तावनेत द. वा. पोतदार यांनी 'Folklore' चे भाषांतर म्हणून 'लोकविद्या' शब्द वापरला. 'विद्या' या शब्दापेक्षा 'साहित्य' हे पद व्याप्तीने बलदंड असल्यामुळे 'लोकसाहित्य' हा शब्द रूढ झाला.[18]

१.५ लोकसाहित्याची लक्षणे

"'Standard Dictionary of folklore, Mythology And Legend' या कोशातील पुढील लोकसाहित्याची एकूण चौदा लक्षणे मांडलेली आहेत.

- लोकसाहित्य मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.
- लोकसाहित्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते.
- पारंपरिकता हा लोकसाहित्याचा एक महत्वाचा विशेष असतो.
- पूर्वकालीन संस्कृतीच्या अवशेषरूपाने ते समाजजीवनात प्रचलित आहे. हे संस्कृतीचे किंवा पूर्वकालीन जीवनाचे अवशेष असले तरी मृत अवशेष नसतात, तर वर्तमानकालीन जीवनाच्या संदर्भात त्याला अर्थपूर्णता असते. त्यामूळे या अवशेषांना सजीव अवशेष मानण्यात येते.
- ते लोकसमुहाचे किंवा समाजगटाचे असते. ती समूहाची निर्मिती असते. व्यक्तीने निर्माण केलेले असले तरी त्याला असे स्वरुप प्राप्त होते की, ती व्यक्तीची निर्मिती न रहता सर्व समूहाची बनते. त्याचा मूळ निर्माता हा अज्ञात असतो. व्यक्तीचे व्यक्तीविशिष्टत्त्व व्यक्त होते.
- लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचा आविष्कार होतो. त्यामुळे ते लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे एक महत्त्वपूर्ण साधन असते. मौखिक संस्कृतीत सर्व काही लोकसाहित्यच असते.
- लोकसाहित्य हे लोकमानसाचा आविष्कार असते.
- लोकसाहित्य हे भौतिक किंवा मनोमय स्वरूपात असते.
- लोकसाहित्यातून परंपरा टिकविणे आणि पुनरुज्जिवित करणे या क्रिया घडतात. त्यात पारंपरिकता आणि परिवर्तनशीलता असते.
- लोकसाहित्य हे लोकसमूहाच्या भ्रमातून किंवा आभाससृष्टीतून निर्माण झालेले असते.
- लोकसाहित्य हे लौकिकज्ञान असते. ते मानवाचे युगानुयुग घेतलेल्या अनुभवांचे साररूप असते. ते पारंपरिक ज्ञान असते.

- लोकसाहित्य हे कला, वाङ्मय यांचे स्रोत असते.
- लोकसाहित्याचे संपादन, विकसन आणि एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंतचे संक्रमण स्वाभाविकपणे व सहजपणे होत असते.
- लोकसाहित्याच्या अभ्यासाचा समावेशही लोकसाहित्यात होतो. इतिहासात ज्याप्रमाणे सामग्री आणि त्याचे अध्ययन या दोहोंचा समावेश असतो; त्याचप्रमाणे लोकसाहित्य या संकल्पनेत पारंपरिक लोकजीवनाचा विविध माध्यमांतून झालेला आविष्कार आणि त्यांचे अध्ययन या दोहोंचा अंतर्भाव होतो. म्हणजेच अध्ययन – सामग्री आणि अध्ययन या दोहोंना लोकसाहित्य असे म्हणतात." [19]

१.६ लोकसाहित्याची व्याप्ती

लोकसाहित्याची व्याप्ती अभ्यासात घेताना समाजाचा विविध अंगाने विचार करावा लागतो. **शरद व्यवहारे** लोकसाहित्याच्या व्याप्तीबद्दल असे म्हणतात की "लोकसाहित्य हे लोकजीवनाची नाडी ओळखणारे उत्तम साहित्य आहे".[20] लोकसाहित्यामध्ये चालत आलेल्या लोकजीवनाच्या प्रमुख चार विभागात समावेश होतो. ते पुढीलप्रमाणे -

मौखिक आविष्कार (Oral Expression)

मौखिक परंपरेत येणारे अर्थात लोककथा, कथागीत, लोकगीते, स्त्रीगीते, म्हणी, उखाणे इत्यादि गोष्टींचा समावेश होतो. वरील गोष्टी परंपरेने चालत आलेल्या असतात. त्यांचा कर्ता कोण हे सांगता येत नाही. याची निर्मिती एकाकडून न होता ती समाजगटाकडून होते.

भौतिक संस्कृती (material culture)

भौतिक संस्कृती ही मौखिक आविष्कारपासून वेगळी असते. त्यात समाजातील पारंपरिक व्यवसाय, वेगवेगळी कौशल्ये, विविध कला, विधी विधान, कळी लावणे, तोडगे, यंत्रतंत्र, या गोष्टी समाविष्ट केल्या आहेत. हे शाब्दिक नसून प्रत्यक्ष कार्यातून घडणारे असते.

विधी,लोकविश्वास, समजुती, लोककला

या प्रकारात विधीपरंपरा, धार्मिक विधी, संस्कार विधी, लोकपरंपरा, श्रद्धा, लोकविश्वास, अंधश्रद्धा, बारसे, सटी, लग्नकार्य, दृष्ट काढणे, पशु बळी देणे, पाडवा, होळी, दसरा, इत्यादी गोष्टींचा समावेश लोकसाहित्याच्या अभ्यासात केला आहे.

प्रयोगसिद्ध लोककला (performing Arts)

प्रयोगसिद्ध लोककला हे प्रायोगिक असतात, जे सादर होतात, प्रयोगात्मक असतात. लोकसंगीत, लोकनृत्य, विधीनाट्य, लोकनाट्य, या गोष्टीनुरुप नृत्य, खेळ, इत्यादी तसेच नागपंचमी, गौरी पूजन अशा सणानिमित्ताने होणारी सर्व प्रयोगरूपांचा सामावेश झालेला आहे.

१.७ लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती

लोकसाहित्यातून संपुर्ण विश्वाच्या संस्कृतीचे दर्शन घडते. आधुनिक विचारसरणीपासून लोकसाहित्य खूप दूर आहे. लोकसाहित्याला निरंतर अशी परंपरा लाभलेली असते. लोकसाहित्याचा आणि लोकसंस्कृतीचा घनिष्ट संबंध असलेला दिसतो. कारण लोकजीवनाचे प्रतिबिंब त्यातून आढळते. काही अभ्यासकांच्या मते लोकसाहित्याला लोकसंस्कृतीचा आविष्कार मानलेला आहे. 'लोकसाहित्य' म्हटले की 'लोक' या संकल्पनेच्या विचाराशिवाय आपण पुढेच जावू शकत नाही.

लोक या संज्ञेचा उगम हा लोकसमुहातून झालेला आहे. लोकमनाचे संदर्भ त्यातून व्यक्त होताना दिसतात. याबद्दल **मॅक्झिम गार्की** म्हणतात "लोकसाहित्य हे या लोकांच्या सृजनात्मक शक्तीचे सुंदर प्रतीक आहे. हेच लोक या सृष्टीचे प्रथम दार्शनिक व आदि कवीही होते." [21] लोकसाहित्याविषयी विविध अंगाने अभ्यास करणारा अमेरिकन अभ्यासक **अलेक्सेंडर क्रॉप** याने आपल्या 'The science of folklore' या ग्रंथातून विस्ताराने चर्चा केलेली आहे. त्यामधे "वनस्पती, प्राणी, नक्षत्र, खनिज, विद्या, लोकभ्रम, विधी, जादूटोणा, लोकविश्र्वास, परिकथा, प्राणीकथा, रंजककथा, स्थानिक कथा, वीरकथा, लोकगीते, कोडी, म्हणी, लोकनाट्य, लोकनृत्य, इत्यादींचा समावेश केलेला आहे" [22]

एकंदर लोकसमुहाच्या मानसिकतेद्वारे ज्या निर्मिति झाल्या त्या सर्वांना लोकसाहित्याच्या क्षेत्रात सामावून घेण्यात आले आहे. मुळात लोकसाहित्य हा बदलत्या लोकसंस्कृतीचा एक प्रवाह असल्यामुळे एखाद्या समूहाची लोकसंस्कृती, आचारविचार श्रद्धा, रुढ परंपरा, चालीरिती, कथा, नाट्य, गीत- संगीत, कौशल्य, कला इत्यादीच्या पारंपरिकतेतून अभिव्यक्त होतो. त्याखेरीज त्यांना लोकसाहित्याचे रूप प्राप्त झालेले असते.

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीला वेगळे करता येत नाही. लोकसाहित्याचा अभ्यास करतो म्हणजे आपण लोकसंस्कृतीचा अभ्यास करत असतो. समाजाची दैनंदिन जीवन पद्धती म्हणजे लोकसाहित्य होय. तसेच एखाद्या समाजगटाला चाली-रितीत, आचार-विचारात, संस्कारात बांधून ठेवण्याचे काम संस्कृती करते. लोकसाहित्याप्रमाणे लोकसंस्कृती ही शब्दरचना 'लोक' आणि 'संस्कृती' अशीच आहे. लोकसंस्कृतीचे गाढे अभ्यासक **रा. चिं. ढेरे** यांनी लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा परस्पर संबंध स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, "लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक आणि प्रमुख साधन आहे हे खरेच, परंतु लोकसाहित्यत्येतर वाङ्मयीन सामग्रीतून प्रदीर्घ प्रवाहाचे समग्र दर्शन घेता येते. विद्यमान लोकसाहित्य आणि लोकाचार यांची आधारशिला प्रदीर्घ परंपरेची असते यात शंका नाही. परंतु या आधारशिलेचे साक्षात दर्शन घडविणारे कितीतरी लोकसाहित्य कालौघात नाहीसे होत असते. मानवाच्या जन्मापासून मृत्यपर्यंत जे संस्कार होत असतात समाजाने स्वीकारलेले व आचरणात आणलेल्या संस्कृतीला आपण लोकसंस्कृती म्हणतो." [23]

मानवाच्या मूलभूत गरजा अन्न, वस्त्र, निवारा, यांची पूर्तता समुहगटामुळे होत असते. सांस्कृतिक व्यवस्थेच्या चौकटीत मानवी जीवन आकाराला येते. लोकसाहित्यातील कथागीते, शब्दरचनेबरोबर समूहातील कला, खेळ, लोकरुढी, लोकभ्रम, लोकविद्या, लोकधर्म हे घटकही त्यात सामावलेले असतात. आपण परंपरेनुसार एक विशिष्ट पद्धतीचा आहार घेत असतो, वस्त्र परिधान करतो, सवयी, राहणीमान विशिष्ट पद्धतीची असते. यालाच आपण आपल्या संस्कृतीच्या नजरेने पाहतो या चालीरिती कालांतराने बदलत असतात. **एडवर्ड बी टायलर** म्हणतात की "संस्कृती ही अशी एक संकीर्ण समग्रता आहे की, ज्यात ज्ञान, श्रद्धा, नीती, कायदा; रुढी आणि सवयी यांचा समावेश होतो आणि या गोष्टी समाजात घटक म्हणून व्यक्तीने

संपादित केलेल्या आसतात."[24] यावरून असे लक्षात येते की लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती ही वेगळी नसून ती एकच आहे. त्यामधे खूप साम्यता आढळतात. आपल्यावर जी परंपरा लादली गेली आहे ती फिरून पुन्हा संस्कृती या संकल्पनेवर येऊन थांबते. यानुरुप टायलर यांचे मत परिपूर्ण वाटते.

मनुष्याच्या जन्मापूर्वी संस्कृतीची नाळ जोडली गेलेली असते. जन्म, लग्न, आणि मृत्यू हे तीन माणसाच्या जीवनातील महत्वाचे संस्कार आहेत. वेगवेगळया समाजागटाच्या आदन प्रदानातून संस्कृतीचे संस्कार समाजाला घडवितात. **इरावती कर्वे** आपल्या व्याख्येतून संस्कृतीचा अर्थ अधिक स्पष्ट होतो. त्या म्हणतात "संस्कारपुर्ण आणि संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ठ रीत म्हणजे संस्कृती" [25] त्यामूळे लोकसाहित्य व लोकसंस्कृतीचा अभ्यास हा एकच आहे. लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे प्रथम साधन या अनुषंगाने लोकसाहित्याला प्राधान्य द्यावे लागते.

१.८ गोमंतकीय लोकसाहित्य

संस्कृतीचे मूळ हे लोकसाहित्यातून दिसते. संस्कृतीचा शोध घेण्यासाठी सर्वप्रथम लोकसाहित्य शोधावे लागते. गोमंतकातील लोकसाहित्य अभ्यासकांची नावे घेताना सर्वप्रथम **पद्मश्री विनायक खेडेकरांचे** नाव आवर्जून घ्यावे लागते. त्यांची आजवर अनेक पुस्तके, ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. गोमंतकीय माणसाच्या चाली -रिती, खाणे- पिणे, रूढी, परंपरा, सण-उत्सव इत्यादी मिळून लोकसमुहाची जीवन जगण्याची पद्धत बनते. गोमंतकातील कित्येक उत्सवातून गोव्याचे लोकसाहित्य समोर आलेले दिसते. कालोत्सव व त्यामध्ये गायली जाणारी गीते ही लोकसाहित्य या संकल्पनेत येतात. तीथे केला जाणारा विधी लोकसाहित्याचाच एक भाग असतो. लग्न म्हटले की जात्यावरच्या ओव्या, हळदी गीते, लग्न गीते, इत्यादी येतात. तसेच प्रत्येक गावात होणारे सण, उत्सव आणि दैवतावर असलेला दृढ विश्वास हा लोकांनी एकजूट करुन ठेवत असतो. कोणतेही कार्य करण्यापूर्वी लोक आपल्या दैवतांना आव्हान करतात. अशा ठिकाणी आपल्याला लोकसाहित्याचे संदर्भ दिसतात.

गोमंतकातील लोककथा, लोकगीते, लोकनृत्ये, आणि लोकवाद्ये या बाबी परंपरेने आलेल्या आहेत. उखाणे, म्हणी, वाक्प्रचार, इतर रचना, तसेच लोकश्रद्धा, विधी-विधाने आणि अन्य लोककला या घटकांचा

समावेश करावा लागतो. गोमंतकातील वेगवेगळ्या प्रदेशात सांगितल्या जाणाऱ्या कथांमध्ये लोकमानस आणि काळातील संदर्भ लागलेला असतो. त्यात समान गुण आणि सांस्कृतिक दृष्टी समान असते. भिन्न प्रदेशानुसार व्यक्तिनामे, श्रद्धा-अंधश्रद्धा, ग्रामनामे या तपशिलामुळे त्या प्रदेशातील लोककथांना नाविन्यता निर्माण होते. गोमंतकीय लोकगीतांमध्ये जात्यावरील ओव्या, श्रमगीते, लग्नगीते, फुगडी, धालो, शिमगोत्सवातील गीते असे अनेक प्रकार आढळतात. लोकगीतांच्या आविष्कारात स्त्रियांचा मोलाचा वाटा आहे. लोकगीतांतून दैनंदिन जीवनाचे चित्र रेखाटलेले असते. तसेच स्त्रियांच्या भावनाही लोकगीतांतून आविष्कृत झालेल्या आहेत.

१.८.१ गोमंतकीय लोकसाहित्याचे वर्गीकरण

गोमंतकीय लोकसाहित्य हे खूप विस्तारलेले आहे. त्यांचा अभ्यास करायचा झाल्यास त्यांचे सर्वप्रथम वर्गीकरण करून पुढील मांडणी करणे आवश्यक आहे. वर्गीकरण केल्यामुळे विश्लेषण करणे सोपे जाते व त्यांना त्यांची चौकट प्राप्त होते.

गोमंतकीय लोकवाङ्मय	**लोकनृत्य**	**लोकोत्सव**	**लोकक्रीडा**	**लोकवाद्य**
लोककथा	धालो	जागर	व्हीरानी	घुमट
लोक कथागीते	फुगडी	शिगमो	ताबलानी	शेमेळ
लोकगीते	तोणीयामेळ	कालो	फातऱ्हानी	तासो
म्हणी	तालगडी	गाड्यांची जत्रा	लीपचानी	झांज
लोकनाट्य	मोरुल्लो	शेणी उजो		ताळ
कोडी	गोफ	शिर्षारांनी		चामड्याचा ढोल
उखाणे	देखणी	पेरणी जागर		
शिवड	समई नृत्य	गडे		
गाऱ्हाणे	घोडे मोडणी			

तक्ता क्र:१.८.१ गोमंतकीय लोकसाहित्य

१.९ ‘लोकगीत’ म्हणजे काय?

एका विशिष्ट समाजगटाकडून निर्माण झालेली तसेच मौखिक परंपरेने पिढ्यान् पिढ्या संक्रमित होत असलेल्या गीतांना लोकगीते म्हणतात. लोकगीते ही कालांतराने तशीच न राहता ती काही प्रमाणात बदलताना दिसतात. बदलत्या काळाला सामावून पुढे सरकतात. ती एका समूहाकडून उदयास येत असल्यामुळे लोकगीते लोकबोलीच्या वैशिष्ट्यातून उमटतात. त्यामुळे त्यांचा संवेदनेत व अभिव्यक्तीवर प्रभाव पडतो. लोकगीते ही प्रयोगशील असतात. धार्मिक विधी, मनोरंजन, कष्ट हलके व्हावे यासाठी लोकगीते असतात. लोकगीतांचा निर्माता हा कोणी एक असा सांगू शकत नाही. पूर्वी लोक स्वतःच्या मनोरंजन साधन म्हणून गीतांकडे पाहिले जायचे. पुढे ती परंपरा बनून संक्रमित होत राहिली आणि त्यालाच आपण लोकगीते म्हणतो.

१.९.१ लोकगीतांच्या व्याख्या

१) “लोकगीत हे भावगीत असून लोकगीतांचा उगम निरक्षरात होऊन त्याचा कर्ता अनामिक असतो. लोकगीतांची निर्मिती भूतकाळातील असून शतकांची परंपरा या गीतांना लाभलेला असते.” [26]

अलेक्झांडर क्रॉप

२) “सामान्य लोकजीवनाच्या पार्श्वभूमीवर सहजरुपाची मनोभावांच्या झालेली लयात्मक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत.” [27]

चिंतामणी उपाध्याय

३) “अमूक एका व्यक्तीची कारागिरी त्याच्यात दिसणे शक्य नसते, लोकगीते उत्सवप्रसंगी भक्तिभावाने तल्लीनता प्राप्त झाली असता व सामाजिक मन एकतान झाले असता निर्माण होतात, अर्थात कोणत्याही एका व्यक्तीला असा गीतांवर हक्क सांगता येत नाही.” [28]

वि. का. राजवाडे

वरील व्याख्यांद्वारे असे लक्षात येते की लोकगीते ही माणसांच्या जीवनाचा एक भाग असून या गीतांना अति प्राचीन परंपरा लाभलेली आहे. ती सहजरित्या जीवनात आलेली आहेत. तसेच ती प्रयोरूपाने समोर आल्यामुळे ती जास्त संक्रमित होताना दिसतात. **क्रोप**च्या मतानुसार लोकगीतांना प्राचीनत्व लाभलेले लक्षात येते. सामाजिक मन व भक्तीभावाची सांगड हे लोकगीतांच्या निर्मितीमागचे कारण **राजवाडे** सांगतात.

१.९.२ लोकगीताच्या प्रेरणा

लोकगीतांची निर्मिती हेतूजन्य असते. कोणत्याही गोष्टीच्या मागे त्यांच्या प्रेरणा दडलेल्या असतात. त्यांच्या निर्मितीमागे स्त्रिया व पुरुष यांच्या प्रेरणा समान तत्त्वाने जाणाऱ्या असतात.

लोकगीतांमागील प्रेरणा संमिश्र स्वरूपाच्या असतात त्यात व्यक्तिगत सामाजिक आणि कलात्मक या प्रेरणांचा संयोग असतो. व्यक्तिगत आणि कलात्मक प्रेरणांनी काही लोकगीतांची निर्मिती होत असली तरी समाजजीवनातील त्यांच्या दीर्घ आणि मौखिक स्वरूपांतील अस्तित्वामागे प्रामुख्याने सामाजिक स्वरूपाच्या प्रेरणा असतात. त्यातून सामूहिक जीवनाचा आविष्कार होतो. याचा अर्थ हाच की, ज्या लोकसमूहात लोकगीत मौखिक परंपरेने प्रचलित असते त्या समूहाच्या माणसाची आणि जीवनविशेषांची त्यात अभिव्यक्ती होते. मानवी जीवनाच्या सर्व अंगांच्या संदर्भासह लोकगीत अवतरते. म्हणूनच त्यातून विशिष्ट लोकसंस्कृतीचे दर्शन घडते समाजजीवनाच्या विविध अंगांशी संबंधित असलेल्या कार्याशी लोकगीते निगडित असतात. [29]

१.१० गोमंतकीय लोकगीतांचे प्रकार

लोकसाहित्यातील एक कलाप्रकार म्हणजे लोकगीत. इतर प्रदेशाप्रमाणे गोमंतकातही लोकगीतांचे दालन समृद्ध आहे. त्यामुळे त्याची वर्गवारी करून अभ्यास करणे काळाची गरज आहे. गोमंतकीय लोकगीते उत्सवप्रसंगी गायली जातात. गोमंतकातील परिसरात सादर होणारी लोकगीते ही वैशिष्ट्ये घेवून आलेली असतात. त्यातील काही गोमंतकातील लोकगीतांचे प्रकार खाली अधोरेखित केलेले आहेत.



तक्ता क्र: १.१० गोमंतकीय लोकगीतांचे प्रकार

१.११ गोमंतकीय लोकसंस्कृती

लोकसंस्कृती ही परंपरांवर आधारलेली आहे. विधी, दैवत संकल्पना, अन्न, आहारपद्धती, भाषा अशा जीवनातील यच्चयावत घटकांचा समुच्चय; तो प्रदेश, तेथील परिसर निसर्ग यांच्याशी समन्वय, लोकांची, समुहाची जीवन पद्धती आणि समूहमनाची भावाभिव्यक्ती यावर अधिष्ठित धारणा येथे अभिप्रेत आहे. निरनिराळी सांस्कृतिक रूपे आज गोव्यात दिसतात, हा प्रदेश पोर्तुगीज राजसत्तेखाली असला तरीही, या प्रदेशात आढळणारे सांस्कृतिक रूप कोकण, महाराष्ट्र व कर्नाटकाचे आहे. तद्वत अस्सल भारतीयही आहे. 'गोमंतक' हा शब्द 'गोधन' सूचित करतो असे मानले जाते. 'गोपराष्ट्र', 'गौवराष्ट्र' अशी नावे संबोधली जायची. महाभारतकालीन प्रभासपट्टणावरील यादवी संहारतून वाचून या प्रदेशात राज्य करणाऱ्या भोजनंतर आली. कुळमी–वेळीप, गावकर ही जमात या प्रदेशात सर्वप्रथम स्थिरावली. या जमातीतील लोकसमुहातुन मौखिक स्वरूपात आल्या. निरनिराळ्या सांस्कृतिक रूपांनी गोवा नटलेला आहे. काही वर्षांपूर्वी हा प्रदेश पोर्तुगीजांच्या सत्तेखाली होता [30]

गोमंतकीय संस्कृतिविशेष, सांस्कृतिक दर्शन, गोमंतकीय अस्मिता स्पष्ट करताना काही घटक इथे नमूद करणे आवश्यक आहे. 'घुमट' हे गोमंतकीय वाद्य आहे. हिंदू आणि ख्रिचन या वाद्यांचा वापर करताना

दिसतात, ‘मांड’ ही संस्था धार्मिक व सांस्कृतिक संकल्पना पहायला मिळते. ‘शिगमा’ जसा गोमंतकातील पुरुषांचा लोकोत्सव त्याप्रमाणे ‘धालो’ हा स्त्रियांचा लोकोत्सव आहे. गोमंतकात ‘नागडो बेताळ’ पाहायला मिळतात त्याला लोकदैवत मनाले गेले आहे. मोठ्या श्रद्धेने इथले लोक ‘वारुळाची’ पूजा ‘सातेरी माता’ म्हणून करतात. ‘तरंगोत्सव’ गोमंतकात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो; ‘दसरा’, शिगमा अशा सणामध्ये ‘तरंग’ नाचविली जातात. त्यांना देवाचे प्रतिक मानले जाते.[31]

१.११.१ गोमंतकीय सांस्कृतिक सीमारेषा

वास्तविक कुठल्याही प्रदेशाच्या राजकीय किंवा भौगोलिक सीमारेषा या सांस्कृतिक सीमारेषा कधीच नसतात. प्राचीन गोमंतकच्या शेजारील महाराष्ट्र, कर्नाटक अशा दोन्हीं राज्यातील अनेक गावांचा समुच्चय आहे. गोमंतकाच्या दक्षिणेला अंकोला व गोकर्ण यामधे गंगावळळी (गंगोळी) नदी व उत्तरेकडे कुडाळ व कणकवली येथील आजरा नदी; पूर्वेला सह्याद्रीच्या रांगा व पश्चिमेला अरबी समुद्र अशी गोमंतकीय भौगोलिकता आहे. घाटात असलेल्या प्रदेशातील कारवार जिल्ह्याच्या जोयडा तालुक्यातील काही गावे व बेळगाव जिल्ह्याच्या खानापूर तालुक्यातील काही गावातून गोमंतकीय संस्कृतीच्या अनेक खुणा सापडतात. *पुढे गोमंतकातही दक्षिण गोवा आणि उत्तर गोवा असे दोन जिल्हे आहेत. यातील दक्षिण गोव्यावर द्रविडी संस्कृती आणि उत्तर गोव्यावर आर्य किंवा मराठी संस्कृतीचा प्रभाव दिसतो.*[32] हे विधान योग्य वाटत नाही कारण आपण तर्कानुसार कोणतेच विधान स्पष्टपणे करू शकत नाही.

१.११.२ परिसराचा प्रभाव

लोकसंस्कृतीवर इतर गोष्टींप्रमाणे परिसराचा देखील तितकाच परिणाम होत असतो. परिसरप्रभाव हे संस्कृतीचे प्रमुख लक्षण आहे. अन्न, खाद्य व आहार प्रमुख घटक म्हणुन आपण पहातो. जे प्रदेशात उत्पन्न होते ते त्या प्रदेशाचे अन्न ठरते. बर्फाळ प्रदेशात शेती उत्पन्न होणार नाही, तसेच काश्मीर खोऱ्यात उत्पन्न होणारे सफरचंद डोंगराळ किंवा समुद्री प्रदेशात उत्पन्न होणार नाहीत. गोमंतकात नारळाचा जास्त प्रमाणात वापर केला जातो. कारण गोव्यात नारळाची कमतरता भासत नाही, तसेच गोवा म्हणताच ‘शीत कडी’ असा सहज उच्चार होताना दिसतो. गोव्याचा माणूस नाचण्याची आंबील किंवा तांदळाची पेज पिणारा आहे.

गोव्यात कुमेरी शेतीपद्धत असल्याने शेतीची नासाडी करणाऱ्या जनावरांना मारण्यासाठी शेतकरी बंदूक बाळगत असत. तिथून ग्रामीण भागात आपल्याला एखाद्याला धमकी द्यायची झाल्यास 'कानाखाली वाजविन' असे न म्हणता 'फरान मारतलो' असे ऐकायला मिळते. पूजा, विधी, दैवते यांच्या आचरणातून आपण जीवन जगत असतो. त्यासाठी साधन सामग्री यांचा विचारही महत्त्वाचा ठरतो. इथे पूजेसाठी तांदूळ, नारळ, व सुपारी आवश्यक असे साधन आहे. विड्यांसाठी पाने आणि सुपारी हा देवाचा विडा असतो. तसेच लग्न समारंभासाठी पूर्वी आमंत्रण देण्यासाठी पानाचा विडा द्यायचे. तसेच कुळमी ही जमात 'चुन्ना' या रानटी वनस्पतीची पाने वापरायचे. [33]

आपला गोमंतक हा प्रादेशिक लोकसंस्कृतीने नटलेला आहे. गोव्यात लोकनृत्याचे सादरीकरण इथल्या लोकगीतांतून होते. कलेद्वारे गोमंतकीय परंपरेचे जतन होताना दिसते. काला, पेरणी जागर, जागर, रणामाले मुसळ नृत्य घोडेमोंडणी इत्यादी. पोर्तुगीजांच्या आक्रमणानंतर तर येथील लोकनृत्याच्या आविष्कार पद्धतीवर परिणाम झाला. संस्कृती संस्कारातून निर्माण झालेली 'देखणी' हा नृत्य प्रकार आहे. हे विधान लोकसाहित्याचे गाढे अभ्यासक **विनायक खेडेकरांचे** मत आहे पोर्तुगीज राजवटीनंतर 'मांडो' आणि 'धुलपद' हे नृत्यप्रकार गोव्यात रूढ झाले. तसेच शेजारच्या राज्याच्या प्रभावही गोमंतकीय लोकसाहित्यावर झालेला दिसतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'वीरभद्र' होय. [34]

दर ठिकाणी एकाच प्रकारच्या आख्यायिका कथा सांगितल्या जातात. आख्यायिकेचा गाभा तसाच असतो, पण काहीप्रमाणात बदल झालेले दिसतात. गोमंतकात सण-उत्सवांच्या निमित्ताने गावात काही खेळातून, गीतातून अनेक प्रश्नांना वाचा फुटते, त्यातून आपल्या संस्कृतीचे वैशिष्ट्य व्यक्त होताना दिसते.

१.१२ समारोप

प्रस्तुत पहिल्या प्रकरणात आपण लोकसाहित्य म्हणजे काय? हे पहात असताना लोकसाहित्याच्या संकल्पनाची चर्चा केली. लोकसाहित्याच्या प्रेरणा, लोकसाहित्याची लक्षणे कोणती हे पाहिले. विविध अभ्यासकांनी लोकसाहित्य म्हणजे काय? हे त्यांच्या व्याख्याद्वारे समजते. लोकसाहित्याची व्याप्ती समजुन घेताना असे लक्षात येते. लोकसाहित्य ही खूप आदिम संकल्पना आहे. तसेच गोव्यातील लोकसंस्कृतीचा

पडताळा इथे केलेला आहे. एकंदरीत गोमंतकातील लोकसाहित्याचा आढावा सदर उप-प्रकरणात करून घेण्यात आला आहे.

मारिया लीच यांच्या 'Standard Dictionary Of Folklore Mythology And Legend' या कोषातील एकूण १४ लक्षणांची सदर प्रकरणात मांडणी केली आहे लोकसाहित्य हे व्यापक संकल्पना असल्याने लोकसाहित्याच्या प्रमुख चार व्याप्तीचा विचार इथे झालेला आहे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीचे विवेचन करताना **मॅक्झिम गार्की**, **क्रोप**, **टायलर**, **कर्वे** यांच्या मतांच्या आधारे विवेचन करण्यात आले आहे. गोमंतकीय लोकसाहित्य आणि लोकसंकृती यांचाही इथे उल्लेख करताना गोमंतकीय संस्कृतीमध्ये पोर्तुगीजांचा प्रभाव आपल्याला दिसतो.

१.१३ निष्कर्ष

१) लोकसाहित्य हे एकट्याचे नसून ते सर्व लोकांचे आहे व त्यातून समाज जीवनाचे दर्शन घडते.

२) 'पारंपरिकता' हा लोकसाहित्याचा केंद्रबिंदू असतो.

३) परिसराचा प्रभाव हा अपरिहार्यपणे तिथल्या संस्कृतीवर जाणवतो आणि त्याचे प्रतिबिंब लोकासाहित्यावर पडतो.

४) 'सहाजिकता' आणि 'अनामिकता' ही लोकसाहित्याची प्रमुख लक्षणे आहे.

५) लोकसाहित्य हे व्यापक असल्यामुळे वर्गीकरणानुरुप त्याचा अभ्यास होणे आवश्यक आहे.

६) गोमंतकीय लोकासाहीत्यावर बाहेरच्या राज्याकार्तांचा प्रभाव दिसून येतो.

१.१४ संदर्भ

---

[1] कुबल, रमेश. *लोकसाहित्याचे अतरंग*. मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृ. क्र १७

[2] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *'लोकसाहित्य व लोककला'*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ११.

[3] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ११.

[4] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ३.

[5] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ३

[6] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ३

[7] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ४

[8] संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ५

[9]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ५

[10]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ६

[11]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ६

[12]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. '*लोकसाहित्य व लोककला*'. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ६

[13]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ६

[14]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ६

[15]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ७

[16]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ७

[17]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ७

[18]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. ८,९

[19] संपादक. मांडे, प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*. गोदावरी प्रकाशन, अहमदनगर,पृ. ३०

[20] व्यवहारे, शरद .*लोकसाहित्य.उद्गम आणि विकास :* विश्वभारती प्रकाशन नागपूरप्रथम आवृत्ती ,. पृ. २०

[21]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. १२

[22]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. १२

[23]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *‘लोकसाहित्य व लोककला’*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. १२

[24]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *'लोकसाहित्य व लोककला'*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. १४

[25]संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *'लोकसाहित्य व लोककला'*. एम. ए. भाग १: मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, पृ. १४

[26] शिंदे, विश्वनाथ. *लोकसाहित्यमिमांसा भाग १*, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती, पृ. ६०

[27]संपादक मांडे, प्रभाकर. *'लोकसाहित्याचे स्वरूप'*, सविता प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९७८. पृ. २२८

[28] संपादक. मांडे प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*, सविता प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९७८, पृ. २२८

[29] संपादक.मांडे प्रभाकर, *'लोकसाहित्याचे स्वरूप'*, सविता प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९७८, पृ. २२९

[30] संपादक, भोसले, द. ता. *'लोकजीवन आणि लोकसंस्कृती'*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, दादार (पूर्व) मुंबई, पृ.१९८

[31]संपादक, भोसले, द. ता. *'लोकजीवन आणि लोकसंस्कृती'*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, दादार (पूर्व) मुंबई, पृ. १९९

[32]संपादक, भोसले, द. ता. *'लोकजीवन आणि लोकसंस्कृती'*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, दादार (पूर्व) मुंबई, पृ. १९८,१९९

[33] संपादक, भोसले, द. ता. *'लोकजीवन आणि लोकसंस्कृती'*. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, दादार (पूर्व) मुंबई, पृ.२०४ ,२०५

[34] व्यवहारे, शरद. *'लोकपरंपरा लोकधाटी'*, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००२. पृ १२५

प्रकरण २

नेत्रावळी परिसराचा सामजिक आणि सांस्कृतिक परिचय

प्रास्ताविक 33

२.१ नेत्रावळी: ग्रामनाम उत्पत्ती...34

२.२ नेत्रावळीच का? 36

२.३ नेत्रावळी परिसराची भौगोलिक रचना 36

२.३.२ शैक्षणिक सुविधा 37

२.३.३ वैद्यकीय सुविधा 37

२.३.४ उत्पादन 37

२.३.५ संपर्क व दळण वळण 38

२.३.६ बाजारपेठ...38

२.३.७ ग्रामपंचायत संदर्भातील माहिती...39

२.४ नेत्रावळी परिसरातील समाज 40

२.४.१ कुळमी 40

२.४.२ महार/ म्हार..40

२.४.३ धनगर 41

२.४.४ मडवळ..42

२.४.५ सतरकर 42

२.४.६ देवळी किंवा देविदास...42

२.४.७ क्षत्रीय मराठा (प्रभू देसाई) 43

२.५ नेत्रावळी परिसरातील लोकांची जीवनशैली...43

२.५.१ राहणीमान 44

२.५.२ खानपान 44

२.५.३ पेहराव 45

२.५.३ गृह बांधणी 45

२.६ नेत्रावळी परिसरातील सण उत्सव आणि लोकपरंपरा 45

२.६.१ आषाढी एकादशी (आसडी परब) 45

२.६.२ नारळी पौर्णिमा (सुता पुनव) 46

२.६.३ नाग पंचम 46

२.६.४ नञा पंचम 46

२.६.४ नवरात्र उत्सव 47

२.६.५ दसरा 47

२.६.६ दिवाळी 48

२.६.७ तुलसी विवाह 49

२.६.८ शिगमा 49

२.७ समारोप 50

२.८ निष्कर्ष 50

संदर्भ 51

प्रकरण २

नेत्रावळी परिसराचा सामजिक आणि सांस्कृतिक परिचय

प्रास्ताविक

पहिल्या प्रकरणात लोकसाहित्याची सैद्धांतिक मांडणी केल्यानंतर सदर प्रकरणात प्रस्तुत संशोधन कार्य ज्या परिसरात केले जाणार आहे त्या नेत्रावळी परिसराचा सांस्कृतिक आणि सामाजिक परिचय करून घेणे आवश्यक आहे. कोणत्याही लोकसाहित्याला तेथील स्थलवैशिष्ट्य लाभलेले असते. त्या परिसरातील भौगोलिकतेचा प्रभाव लोकसाहित्यावर पडलेला जाणवतो. "गोमंत देशाच्या सांगे तालुक्याचे १७६० च्या पूर्वी दोन महाल होते. एकाला 'अष्टग्रहर' अथवा दक्षिण सांगे व दुसऱ्याला 'हेमाडबार्से' किंवा उत्तर सांगे या नावाने संबोधले जायचे. दोहोंपैकी उत्तरेकडचा भाग क्षेत्रफळाने मोठा असल्यामुळे त्याचे पुन्हा दोन उप महाल पाडले होते. त्यांना अनुक्रमे 'आठबार्से' व 'लाटबार्से' संबोधले जाई. आठबार्सेची राजधानी सावर्डे तर लाटबार्सेचे केंद्र सकोर्डा येथे होते. त्याचप्रमाणे अष्टग्रहराचे एक केंद्र ऋषिवानला तर दुसरे नेत्रावळ्ळीच्या चावडीवर होते." [i] असे उल्हास प्रभुदेसाई यांनी आपल्या '*गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी*' या पुस्तकात मांडले आहे. यावरून असे समजते की 'नेत्रावळी' हा परिसर एकेकाळी भौगोलिक दृष्ट्या किती महत्त्वाचा होता हे लक्षात येते. प्रस्तुत प्रकरणाद्वारे 'नेत्रावळी' या ग्रामनामाचा अर्थ इथे समजून घेणार आहोत, नेत्रावळी परिसराची भौगोलिक रचना, नेत्रावळी परिसराच्या सीमारेषा, तिथली लोकसंख्या, नेत्रावळी परिसरात समाज, नेत्रावळी परिसरातील लोकांची जीवनशैली, व्यवसाय, सण उत्सव आणि लोकपरंपरा अशा विषयांची चिकित्सक मांडणी इथे केली जाणार आहे.

नकाशा क्र २.१: गोमंतकातील नेत्रावळी परिसर

२.१ नेत्रावळी: ग्रामनाम उत्पत्ती

प्रत्येकी ग्राम नामामध्ये काही ना काही अर्थ दडलेला असतोच त्याच शोध घेणे इथे अपेक्षित आहे. एखाद्या परिसराला त्या नावाने का ओळखले जाते? त्याची अनेक कारणे असू शकतात. त्याला भूतकालीन संदर्भ दडलेला असू शकतो, एखाद्या वस्तू, घटना, व्यक्तीचे नाम, अशा अनेक बाबतीत असू शकते तर इथे नेत्रावळी या परिसराला नाव कसे पडले असेल ते पाहणार आहोत.

हळ्ळी (अली, अळी, आळी, वली, हळ्ळी, ली)

"कर्नाटकातील एक इतिहास संशोधक श्री. शं. बा. जोशी (मराठी संस्कृती काही समस्या, संपादक वसंत स. जोशी) ह्यांच्या मते अली, अळी, आळी, वली, हळ्ळी, ली या सर्व उत्तरपदांचा अर्थ 'गाव' असाच आहे. त्यांच्या मते गेल्या हजारो वर्षात पट्टी, हट्टी या उत्तरपदाची रूपे बदलत गेली. राज्य, बाजार, वस्ती असे या शब्दांचे अर्थ आहेत. उदा.

१) पट्टी > पाडी > पाळी > हळळी

२) पट्टी > हट्टी

३) पट्टी > पळळी > वाळळी > वाळी > वलि

४) पट्टी > पळळी > वाळळी > वाळी वली > ली

५) पट्टी > पळळी > वाळळी वाळी वली > अली

६) पट्टी > पळळी > वाळळी वाळी वली > अली > अळी

सौजन्य: गोवा स्थलनामांची जडणघडण. पृ. १६

तक्ता क्र २.१ 'हळळी' शब्दाचा अपभ्रंश

गोव्यातील स्थलनामांवर आर्य संस्कृती बरोबर द्रविड संस्कृतीचा प्रभाव असल्याचे आढळते. भारताच्या दक्षिणेकडील प्रदेशात 'हळळी' या उत्तरपदाशी निर्देशित बहुसंखी स्थलनामे आढळतात. उत्तर कोकणातही डोंबिवली, मळवली, खडवली अशा प्रकारची स्थलनामे आढळतात. शिरोडकर यांच्या मते गोव्यातील करमळी हे गाव पूर्वी कदंब हळळी या नावाने संबोधले जात असावेत. तसेच आजचे बाणावली > बणावली > बणेली > बणहळळी, म्हणजे वनाने आच्छादित प्रदेश असे असावे." [ii] "कदंब राजा शिवचित्त याने ही बुडबुडीतळी बांधल्याचा गोवा कदंब इतिहासात नोंद सापडते. या तळयेची रचना अशा प्रकारे केलेली आहे की बाराही महिने तिचे पाणी समतल असते. तिच्या उत्तर टोकाला एक छिद्र (भोक) असून त्यातून पाणी वाहून जाते. मध्यभागी तुळशी वृंदावनात पांढरा शुभ्र ॲनाईटसारखा एक चौकोनी दगड असून त्यावर सर्वत्र नेत्रासारख्या खुणा आहेत. त्यांचा आकार शिवलिंगासारखा आहे. म्हणून या गावाला 'नेत्रावळळी' हे सार्थ नाव पडल्याचे सांगतात." [iii]

वरील विधानावरून असे समजते की 'हळळी' हा कानडी शब्द आहे. आणि नेत्रावळी हा परिसर कर्नाटकला जवळ आहे. 'हल्ली' म्हणजे गाव उल्हास प्रभू यांनी मांडलेल्या विधानात 'नेत्र' या अवयवातून शब्दाची उत्पत्ती अधोरेखित होते, त्यामुळे या दोन्ही पदांचा सामासिक शब्द होऊन नेत्र + हळळी = नेत्रावळी असा शब्द पुढे आला असावा.

२.२ नेत्रावळीच का?

परंपरागत जीवन जगत असलेले लोक म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक'. या संकल्पनेत तंतोतन सामावणारा असा हा नेत्रावळी परिसर आहे. त्यामुळे या परिसरातील लोकगीतांचा अभ्यास होणे आवश्यक असल्याने या परिसराची निवड केली. सांगे तालुक्यातील इतर परीसरापेक्षा नेत्रावळी परिसरातील लोकगीतामध्ये कोणते वैशिष्ट्य आहे हे पाहणे. नेत्रावळी परिसरातील लोकसाहित्यात येणारि मौखिक परंपरा, आचार विचार, जीवनशैली, लोकपरंपरा, लोकरुढी या गोष्टी तपासून पाहणे. जो परिसर संशोधन कार्यासाठी निवडला आहे तो परिचयाचा असल्याने तसेच तेथील रहिवासी असल्याने परिसराच्या आत्मियतेने कार्य हाती घेतले आहे. लहानपणापासून जे संस्कार माझ्यावर झाले त्यामध्ये 'लोकासंकृतीचा' महत्त्वाचा वाटा आहे. त्याचा संबंध 'लोकसाहित्य' या विषयांतर्गत होत असल्याने मनात कुतूहल निर्माण झाले. त्यामुळे या परिसरावर अभ्यास करण्याचे ठरविले.

२.३ नेत्रावळी परिसराची भौगोलिक रचना

गोमंतकाच्या आग्नेय दिशेकडचा 'सांगे' तालुका हा गोमंतकाचा सर्वात मोठा तालुका आहे. या तालुक्यात 'नेत्रावळी' परिसर येतो. हा परिसर सांगे बाजारापासून साधारणतः २८.५ कि. मि च्या अंतरावर आहे. "चारही बाजूनी डोंगर कपारीनी व्यापलेला; बारा उपगाव असलेला व अश्मयुगीन संस्कृतीच्या खाणाखुणानी, अवशेषानी भरलेला 'नेत्रावल्ली'. व्यवहारात 'नेतर्ले' म्हणून ओळखला जाणारा; एक खास ऐतिहासिक, सांस्कृतिक नि धार्मिक वारसा लाभलेला एक गाव. अष्टग्रहराच्या उत्तरेकडे असल्यामुळे तो पूर्णतयः डोंगरदऱ्यानी; उंच उंच शिखरानी व्यापलेला आहे. त्यावरील आकाशाला भिडू पाहणाऱ्या जंगली तरुलतानी डोलणारा".[iv] अशा शब्दात उल्हास प्रभुदेसाई यांनी आपल्या *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'* या पुस्तकात लिहिले आहेत. या परिसरात साळजिणी, 'वेर्ले', 'तुडव', 'जांबुखडप', 'सावरी', 'पाट', 'नुने', 'जाके', 'बांधवाडा', 'वर्गणी', 'देवरे', 'विचुंद्रे', 'मार्गवाडा', ही उप गावे येतात. ही एकुण तेरा उप गाव असून उल्हास प्रभू देसाई यांनी आपल्या पुस्तकात १२ उप गावांचा उल्लेख केलेला आहे. वरील विधानातून असे दिसून येते की त्यांनी 'साळजिणी' या गावाचा उल्लेख न केल्याने ती १२ अशी संख्या सांगितली गेली आहे. उल्हास प्रभूंनी *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'* या पुस्तकात तिसऱ्या विभागाची सुरुवात 'वेर्ले' या गावापासून केली आहे. खरेतर ती 'साळजिणी' या गावापासून व्हायला पाहिजे होती. नेत्रावळी परिसराचा भौगोलिक रचना मांडताना हे इथे सांगणे मला उचित वाटते. नेत्रावळी परिसराचा भौगोलिक क्षेत्रफळ ४०.७५

चौ. कि. मी. आहे. “Neturlim is a Village in Sanguem Taluka in South Goa District of Goa State, India”.[v] “Netorlim Pincode is 403704 With 15.0911558 Latitude and 74.2296633 Longitude”.[vi]

२.३.२ शैक्षणिक सुविधा

परिसरात एकूण आठ शासकीय प्राथमिक शाळा आहेत. एक शासकीय माध्यमिक शाळा आहे. जे त्या परिसरात स्थानिकासाठी महत्त्वाची आहे. परिसराहून जवळ असलेल्या ‘उच्च माध्यमिक विद्यालय सांगे’ येथे आहे. त्या परिसरातील मुले सांगे तसेच सावर्डेला ११ वी, १२ वी चे शिक्षण घेण्यासाठी जातात. ‘सरकारी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय केपे’ इथे पदवी महाविद्यालयात जावे लागते. नेत्रावळी परिसरात ‘केशव सेवा साधना’ संस्थेचे उभारलेले ‘दुर्गामाता विद्यार्थी वसतिगृह’ उभारलेले आहे. हे वसतिगृह तिथल्या स्थानिकासाठी खूपच आवश्यक आहे. कारण ‘नेत्रावळी’ परिसरात काही डोंगराळ भाग असल्यामुळे बस सेवा जास्त नसतात ‘वेर्ले’, ‘साळजिणी’, ‘तूडव’ या भागातील फक्त एकच बस सेवा असल्यामुळे तिथली जास्तीत जास्त मुले ही वसतिगृहात आश्रय घेताना दिसतात.

२.३.३ वैद्यकीय सुविधा

नेत्रावळी परिसर हा वैद्यकीयदृष्ट्या फारच मागे आहे, कारण तिथे एकच प्राथमिक आरोग्य उपकेंद्र आहे. औषढलय तिथे नाहीच त्यामूळे लोकांनी सांगे बाजारात यावे लागते. एक पशु वैद्यकीय केंद्र तिथे उपलब्ध आहे. हल्ली प्रत्येक गावात महिन्यातून एकदा आरोग्य बस जात असल्याने सोयीस्कर बनले आहे. लहान-सहान आजारावर तिथल्या लोकांकडे झाडपाल्याचे औषधोपचार घरीच होतात. हीच एक खेड्यातील लोकांचे वैशिष्टे असतात. मोठ्या आजार असल्यास सांगे, सावर्डे, मडगाव जाण्याची वेळ लोकांवर येते.

२.३.४ उत्पादन

“बाराही मास इथल्या झऱ्या, नद्या तोयामृताने खळखळत असतात. त्यामुळे इथे रब्बी वायंगण शेती, उस, माड, पोफळीची उपवने; पावसाळी कुमेरी बागायत, काजू, आंबे, फणस, केळी आदि पिकांवर इथली कष्टकरी जमात आपली उपजिविका चालवीत आहे”.[vii] असे उल्हास प्रभुदेसाई आपल्या पुस्तकात नेत्रावळीचा उल्लेख करतात. ‘नेत्रावळी’

परिसरात अनेक उत्पादन काही प्रमाणात होताना दिसतात. काजूची लागवड प्रत्येकी ठिकाणी पहायला मिळते. त्यामूळे काजुपासून बनवलेली देशी दारू इथे हमखास तयार होताना दिसते. सुपारीच्या बागायती माडांच्या बागायती इथे आढळतात. नेत्रावळी परिसरात काही प्रमाणात उसाची लागवड केलेली आहे. 'पाट', 'बांधवाडा', 'वर्गणी', 'सावरी', 'नेत्रावळी' अशा भागात उसाची लागवड पाहायला मिळते. 'वर्गणी', 'सावरी', 'पाट' या गावात 'गूळ' तयार केले जाते. जेव्हा महामारी आली होती तेव्हा 'नेत्रावळी' परिसरात 'साळजिणी' या गावात मिरची, भाज्यांची लागवड केली गेली होती आणि त्या काळात लोकांपर्यंत पोहोचविली जात होती. त्यामूळे भाज्यांची लागवडही येथे होताना दिसते. गोमंतकात सर्वप्रथम स्ट्रॉबेरीची लागवड याच परिसरातील 'वेर्ले' गावत पाच सहा वर्षापूर्वी 'अटल ग्राम' योजने अंतर्गत प्रयोग म्हणून केली होती. सद्यस्थितीकडे पाहता 'वेर्ले' गावाला 'स्ट्रॉबेरी गाव' किंवा 'मिनी महाबळेश्वर' असे ओळखले जात आहे. स्ट्रॉबेरीचे पीक डिसेंबर ते मार्च अखेरपर्यंत पहायला मिळते. थंड परिसर असल्यामुळे गावात अनेक प्रयोग करून पहात आहे. या वर्षी सफरचंदाचे एकूण १९ रोपे वेर्ले गावात प्रयोग म्हणून लावण्यात आली आहे. 'Tashinkar Spice Farm' नावाचे मसाले उत्पादनाचे farm आहे.

२.३.५ संपर्क व दळण वळण

नेत्रावळी परिसराशी संपर्क आणि दळण वळण बाबतीत सांगायचे झाल्यास तिथे गावा- गावात जाणारा रस्ता आहे. त्यामूळे त्या परिसरात एकूण तीन सरकारी कदंब महामंडळाच्या बसगाड्या धावतात. त्यातली एक इलेक्ट्रॉनिक बस (EV) चालते तसेच ८ खासगी बसगड्याही चालतात. त्यातील काही बस तीळामळ मार्गे कुडचडे बस स्थानकावर जातात तर काही सांगे बसस्थानकावरून कुडचडे बसस्थानकावर जातात. तर हल्लीच सरकारच्या योजने अंतर्गत सुरू झालेल्या 'माझी बस' या योजनेखाली एकूण २ बसगाड्या धावतात. इतक्या बसगाड्या या परिसरातून ये जा करत असल्याने पक्का रस्ते तिथे दिसतात. नेत्रावळी परिसरात पंचायतीत उप डाक घरची सोय उपलब्ध आहे. ज्याचा पिन कोड ४०३७०२ असा आहे. तसेच या परिसरात BSNL सोडून दुसरी कुठलीच मोबाईल सेवा मिळत नाही.

२.३.६ बाजारपेठ

नेत्रावळी परिसरातील बँकिंग सुविधा आहे. परिसरात एकूण तीन बँक आहेत. 'आर. बी. एल'. 'बँक, बँक ऑफ बडोदा', आणि 'क्रेडिट कोऑपरेटिव्ह सोसायटी'. या तिथल्या लोकांसाठी उपलब्ध आहेत. 'कृषी' हा या

गावातील मुख्य व्यवसाय असल्याकारणाने नेत्रावळी परिसरातील बहुतांशी कुटुंबात गुरे आहेत. नेत्रावळी परिसरातील एकूण सात ते आठ गावात 'दुग्ध सहकारी सोसायटी' आहे. तिथून ते दूध नेत्रावळी बाजारात असलेल्या दुग्ध सोसायटीत दररोज पोहचविले जाते. दर दिवशी एक टेंकर भरून दूध या परिसरातून नेले जाते. रेशनसाठी एक दुकान गावात उपलब्ध आहे. जे सोमावार ते शनिवार सकाळी ९:०० ते १२:३० व संध्याकाळी ३:०० ते ६:०० पर्यंत खुले असते. या परिसराची हळूहळू प्रगती होताना दिसते. पूर्वी लोकांनी काही हवे असेल तर 'सांगे' किंवा 'कुडचडेला' यावे लागते पण आता तिथे सर्व गोष्टी उपलब्ध झालेल्या आहेत.

२.३.७ ग्रामपंचायत संदर्भातील माहिती

तक्ता क्र:२.३.७ नेत्रावळीतील जमिनीचा वापर

सौजन्य:https://gom.m.wikipedia.org/wiki/%E0%A4

डोंगराळ परिसर असल्याकारणाने कृषी जीवनाशी निगडीत तिथे व्यवसाय पहायला मिळतो. तिथल्या बहुतांश लोक शेतीची लागवड करतात. डोंगर माथ्यावर असलेल्या गावात लोकांनी काजूची झाडे लावलेली आहेत. कुळागरातून नारळ, सुपारी, मीरी, यासारखी पीक तिथे मिळते.

२.४ नेत्रावळी परिसरातील समाज

एखाद्या परिसराचा अभ्यास करत असताना तिथल्या समाजाचा परिचय होणे आवश्यक आहे त्यासाठी सादर उपप्रकरण त्यावर आहे. नेत्रावळी परिसरात हिंदू आणि ख्रिश्चन असे दोन धर्माचे लोक रहातात. तसे पहायला गेल्यास ख्रिश्चन लोकांची संख्या जास्त नाही. एकूण १२ घरे ही ख्रिश्चन लोकांची आहे. हिंदू धर्माचे लोक जास्त प्रमाणात असल्याने तिथे अनेक जाती जमतीचे लोक पहायला मिळतात. तर सदर उपप्रकरणात स्थानिक लोकांच्या मदतीने परिसरातील समाजाचे विवेचन करून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२.४.१ कुळमी

सांगे तालुक्यात बहुतांशी लोक हे अनुसूचित जातीमधले आहे. त्यामध्ये येणारी कुळमी ही जमात आहे. नेत्रावळी परिसरातील ७०% टक्के लोक हे गावकर – वेळीप आहेत. "वेळीप व गावकर, नावे वेगळी असली तरी या दोन्ही उपजातीत कोणताही फरक आढळत नाही. यांच्यात रोटीबेटी व्यवहार होतो. स्वत:ला एकत्र सामजणार या दोन्ही उपजातीत वेळीप व गांवकार हे एका घराचे कधीही नसतात. म्हणजेच वेगळेपणा आहे तो फक्त कौटुंबिक पातळीवरचा. एकाच जमातीतील काही लोक बुध्दीची कामे करू लागले. लोकांच्या अडचणी सोडवू लागले ते गांवकार झाले. अशी माहिती हेच लोक देतात. आपली उपजमात मूळ व दुसरी कार्य-कारणपरले निर्माण झाल्याचा दावा दोन्हीकडून केला जातो. यातील वेळीप पूजा, देवकृत्ये करतात. तर गांवकार हे ग्रामसंस्थेचे सदस्य आहेत" [viii] नेत्रावळी परिसरातील 'वेर्ले', 'तुडव', 'साळजिणी', 'बांधवडा', 'वर्गणी' या गावात गावातील वेळीप लोकांचा मान गावकर लोकांनाही करतात. गावात 'वेळीप' लोकांना मोठा मान असतो. गावातील समूह कार्याचा पुढाकार हा त्याना असतो. 'वेर्ले' या गावात 'गावकर' लोक 'वेळीप' लोकांचे कार्यभार सांभाळताना दिसतो.

२.४.२ महार/ म्हार

"गोव्यात महारांच्या दोन जाती नसून एकच आहे व तिला 'सोमेशी' या नावाने संबोधिले जाते. सोमेशी म्हणजे सोमवंशी".[ix] 'गाव तेथे महारवाड' ही म्हण गोव्यालाही लागू पडते. पण हे विधान कुठेतरी नेत्रावळी परिसरातील येणाऱ्या गावांना लागू पडत नाही. कारण संपूर्ण 'नेत्रावळी' परिसरात फक्त दोन कुटुंबे पहायला मिळतात. एक 'वेर्ले' गावात आणि 'नेत्रावळीत'. गावगाड्यात महारांना महत्वाचे स्थान आहे. दसरा, शिगमा, नवरात्र या उत्सव प्रसंगी महारांचा

महत्वाचा वाट असतो. महारांची काठी ढोलावर बसत नाही तोवर गावातील उत्सव सुरु होत नाही. किंवा अवसर येत नाही. जर गावात 'महार' नसेल तर इतर ठिकाणीहून बोलावतात किंवा इतर ठिकाणाहून गावात आणून ठेवतात. नेत्रावळीत असणारे एक महारांचे कुटुंब हे मूळचे कर्नाटकातल्या 'गैरा' या ठिकाणचे आहेत. त्यांना राहायला जागा दिलेली आहे. वेर्ले गावातील असलेल्या महारांना मात्र देवस्थानाची शेत जमीन व देवस्थानाची जागा देण्यात आली आहे. त्यांचे पूर्वज शेती करायचे असे सर्वेक्षणाद्वरे लक्षात आले. यावरून शेती व्यवसायही ते करायच असे समजते.

२.४.३ धनगर

नेत्रावळी परीसरात 'देवरे' या गावात धनगरांची वस्ती आहे. तिथले स्थानिक लोक त्यांना 'गोवळी' (गवळी) असे संबोधतात. वरक, यमकर, पांढरमिसे, रेकडो अशी धनगर समाजातील आडनावे आहेत. 'धनगर' ही एक जात गोव्यासह महाराष्ट्रतही विस्तारलेली आहे. कानडीत या जातीचे नाव 'दनगार' (गोरे ढोरे पाळणारा) आजही हे धनगर गाई म्हशी पाळण्याचा व्यवसाय करतात मुख्यतः ते मेंढ्या पाळतात .

धनगराच्या उत्पत्ती विषयी एक कथा सांगतात, ती अशी ***पूर्वी एकदा वारुळातून शेळया- मेंढ्यांचे कळप निघाले आणि ते शेतीची नासाडी करू लागले. शेतकऱ्यांनी हा त्रास दुर होण्यासाठी महादेवाची प्रार्थना केली. तेव्हा महादेवाने त्या शेळ्या मेंढ्या राखण्यासाठी धनगर निर्माण केला.*** [x]

पूर्वी हे लोक जागा बदलायचे पण आता ते पक्की घरे बांधून राहतात पावसाळ्यात. वन्य पिकांचे उत्पादनही करतात. धनगरांचा प्रमुख मानकरी 'झोरो' आहे. मांडावर त्याला प्रमुख स्थान आहे. त्यांच्या जमातीतील देवकार्य करणारा तो भटजी असतो. धनगर लोक जी बोली बोलतात त्याला 'धनगरी बोली' असे म्हणतात. त्यांची भाषा ही मराठी, कोकणी मिश्रित अशी भाषा आहे. त्यांच्या बोलीच्या उच्चारणात अनेकदा मराठी भाषेतील शब्द असतात. उदारणार्थ:

धनगरी बोली	**मराठी भाषा**
त्येचीव	त्याच्यावर
जळाया	जळायला

आनाया	आणायला
तुझीव	तुझ्यावर

तक्ता २.४.३ धनगरी बोलीचा नमुना

२.४.४ मडवळ

वर्तमान काळात 'धोबी' म्हणून ओळखली जाणारी एक जमात गोमंतकात 'मडवळ' या नावाने संबोधले जाते नेत्रावळीत दोन कुटुंबे ही माडवलांची आहे. ती 'वेर्ले' गावातून खुप वर्षापूर्वी 'नेत्रावळीत' स्थयिक झाल्याचे समजते. पूर्वी वेर्लेच्या देवस्थानात देवाची वस्त्रे धुण्याचे काम करायचे, तसेच लग्न कार्यात अनेक कामांनाही त्यांचा हातभार असे. गावातील पालखी जेव्हा बाहेर येताना खाली पांढरे वस्त्र अंथरवण्याचे कार्य ते करतात.

२.४.५ सतरकर

नेत्रावळी परीसरात एकूण ६ घरे ही सतरकर कुटुंबाची आहे. त्यांचे मुख्य काम हे कुळागरात राबणे आहे. यावरूनच समजते की ती लोकं खुप कष्टाळू असतात. गावातली बारा वांगडी अर्थात बाराजण यामध्ये त्यांना स्थान दिलेले आहे.

२.४.६ देवळी किंवा देविदास

पूर्वी 'देविदास' किव्हा 'देविदासी' या संकल्पना वेगळया अर्थाने घेतल्या जायच्या 'देवळी' या संकल्पना त्यांना देवळाची सेवा करणारे लोक ते 'देवळी' अशी असू शकते. 'देवदासी' म्हणजे देवाला पूर्णपणे समर्पित केलेली स्त्रीला अनुसरून आलेली संकल्पना असू शकते. या समाजातील लग्न व्यवस्था नव्हती तर त्यांना देवाला अर्पण केले जायचे 'शेंस धरणे' स्थानिक भाषेत (शेंस धरोप) म्हणतात. वर्तमानात ही विधी लुप्त झालेली असुन आता इतर समाजाच्या लग्न विधी प्रमाणे रीतसर मागणी घालून लग्न होताना दिसते.

१) नेत्रावळी परिसरात काही देवदासी कुटुंबे 'देविदास' आडनावा ऐवजी 'वेर्लेकर', 'विचुंद्रेकर', 'कुर्डीकर' या ग्रामसंदर्भातील आडनाव पहायला मिळतात.

२.४.७ क्षत्रीय मराठा (प्रभू देसाई)

“वेळिप कुळंबी वसाहतदारानंतर इथे सर्वप्रथम स्थिरावले ते क्षत्रिय मराठे. अष्टग्रहारातील आठापैकी १) ऋषिवन-कोळंब; २) कुर्डी-कुर्पे; ३) नेत्रावळळी हा भाग प्रभू देसाईनी पुढे वसविला. प्रभू देसाई राजकर्ते कसे झाले याची एक आख्यायिका सांगितली आहे ती अशी सोळाव्या शतकाच्या मध्यास वर उल्लेख केलेले आठल्ये ब्राह्मण घराणे तीर्थयात्रेला जाताना एके रात्री चावडीवर मुक्कामाला राहिले. त्यांच्या खानपानाची, निवासाची सोय केली ती प्रभू देसायणीने (विधवा महिलेने). दुसऱ्या दिनी सदर घराणे पूर्वेकडील नदी-नाला पार करत आपल्या वाटेवर निघाले. तिकडे त्याना फणा उगारून उभा असलेला एक भला मोठा नाग दिसला. त्यानी आपल्या मार्गात अडथळा आणणाऱ्या सापाला डिवचण्याचा प्रयत्न केला पण तो पळू लागला. पुन्हा पुन्हा तेच. मंडळी मागे फिरली नि ती रात्र मुक्कामास काढली. दुसऱ्या दिनी देसायणीच्या विनंतीवरून त्यानी पश्चिम दिशेने प्रस्थान करण्याचे चालू केले तोच वाटेवर नागराज आपला सप्त फणा उभारून पुन्हा उभा! आता मात्र आठल्ये घराणे पुरते भांबावून गेले. त्यानी दरवटो देवाची क्षमा याचना केली “माफ करा देवा, आमच्या हातून काही चूक अपराध घडल्यास क्षम्य करा! पण आमचा मार्ग मोकळा करा”. त्याच वेळी विधवा देसायणीने करुणा वजा निरसन केले. ‘तुम्हांला आमच्या (दरवटो देवाचा, इथून पुढे जाण्याचा कौल निरोप नाही. या घडीपासून तुम्ही आमच्या नेत्रावळळी गावचे राजकर्ते, रक्षणकर्ते नि मालमत्ताधिकारी! आठल्ये ब्राम्हण घराणे पुढे प्रभु देसाई हे नाव धारण करून नेत्रावळीचा राजकारभार चालू लागले”.[xi] उल्हास प्रभुदेसाई यांनी आपल्या पुस्तकात नमूद केलेल्या वरील उताऱ्यातून नेत्रावळी परिसरात ‘प्रभुदेसाई’ कसे स्थिरावले हे समजते. नेत्रावळी गावाची देवकार्य आणि धार्मिक विधी ही प्रभू देसाई कडून होते. तर उरलेले गावातील वेळीप गावकर करतात. पन्नासापेक्षा अधिक दैवते असलेल्या सदर नेत्रावळळी गावातील मोजकीच दैवते ब्राह्मणांची आहेत. बंधनपुरुष, महालक्ष्मी, सती, ब्रह्मदेव ही फक्त प्रभू देसाईंची.

२.५ नेत्रावळी परिसरातील लोकांची जीवनशैली

जसा परिसर बदलतो तशी लोकांची जीवनशैली बदलत असते परिसराचा लोकजीवनावर बदल झाल्याचे जाणवते. तिथल्या परिसराचे वेगळेपण तिथल्या जीवनशैलीतून उलघडते. परिसरातील पर्यावरण भौगोलिकतेचा प्रभाव जीवनशैलीवर जणावतोच जाणवतो. तर इथे नेत्रावळी परिसरातील जीवनशैलीचे विवेचन केले जाणार आहे.

२.५.१ राहणीमान

'नेत्रावळी' हा डोंगराळ परिसर असल्यामुळे तिथले लोक आपल्या परंपरांना धरून चालणारे आहेत. घरातील पुरूष मंडळीच्या खांद्यावर घरची जबाबदारी असते. तेथील लोक आपली शेती करतात. दिवसाची सुरुवात ही साध्या काळ्या चहाने होते. तद्नंतर शेतात जाणे व संध्याकाळी घरी परतणे. शेतीबरोबरच ते भाज्यांची लागवड करतात. घरातील बायका शेताची लावणी, नडणी करण्यासाठी जातात. डोंगराळ भाग असल्याकारणाने शेताची नासाडी रानटी जनावराकडून होत असते. त्यासाठी पुरूष मंडळी शेताकडे एका झोपडीत रात्र घालवत असतात. त्याला स्थानिक भाषेत 'माळयाक रावोप' असे म्हटले जाते. जेवणानंतर थोडा आराम हा असतोच दुपारच्या वेळी वाडा शांत असतो कारण जेवण झाल्यानंतर लोकांच्या तोंडातून येणारी गोष्ट म्हणजे 'मास्सो आड पट्टा हा'. संध्याकाळी जंगलात जावून लाकूड काठ्या गोळा करण्याचे काम तिथल्या बायका करतात. वाड्यावरील बायकांचा पंगड संध्याकाळी जंगलात जातो. पुरुष मंडळीही कधी कधी जातात. मे महिन्यात सर्वजण आपआपल्या घराची मरम्मत करतात.

२.५.२ खानपान

जसा प्रदेश, परीसर बदलतो तसा त्याचा परिणाम खानपानावर होत असतो. जर समुद्र किनाराचा प्रदेश असेल तर त्यांच्या घरी जास्त मासेच असणार. तसे नेत्रावळी परिसरातील लोक जास्त शाकाहारी जेवण जेवतात. प्रत्येक हंगामात ते हंगामी फळे, भाज्या, मासे यांचा आहार घेतात. सकाळी साधी काळी चहा घेवून ते बाहेर पडतात. दहा-साडे दहाच्या सुमारास 'पेज' जेवतात आणि दुपारी एक किंवा दोन वाजता दुपारचे जेवण घेतात. तर काही वृध्द मंडळी सकाळचा चहा न घेता पेज जेवतात. संध्याकाळी घरी आल्यावर चहा त्यांना हवा असतो व रात्रीचे ९ पर्यंत जेवण करून झोपी जातात. तेथील परिसरातील पुरूष मंडळी दारू,विडी, पानाचे सेवन करतात. तर वृद्ध स्त्रिया पान सुपारी खातात. सणासुदीला तर सर्वांच्या घरी वाटाण्याचा 'रोस' हा हमखास असतो. पावसाळयातील रानभाज्या 'अळू', 'तेरो', 'तायकीळो' तर अहोळातील मासे पकडून खातात. व उन्हाळयाच्या दिवसात 'कणगा', 'चीरके' यासारखी कंदमुळे भाज्या यांचा आहार ते घेतात.

२.५.३ पेहराव

गोमंतकातील इतर परिसराप्रमाणे ‘नेत्रावळी’ परिसरातील पेहराव तसा वेगळा पहायला मिळत नाही. परिसरात अजूनही काही मंडळी आहेत जी अजूनही मूळ पेहराव परिधान करताना दिसतात. ‘नेत्रावळी’ परीसरात जास्त ‘कुणबी’ लोकांची वस्ती असल्याने काही वृध्द मंडळी त्यांच्या पेहरावात दिसतात. सर्वेक्षणाच्या निमित्ताने मी काही मोजकीच पुरूष मंडळी पाहिली जे अजूनही ‘लांगोटीत’ फिरतात. पण कुठेही जाताना मात्र ‘विजार’ परिधान करतात. तर वृध्द स्त्रिया ‘देटली’ नेसतात. तर आताच्या स्त्रिया ‘साडी’ व पुरूष ‘पेंट शर्ट’ परिधान करताना दिसतात.

२.५.३ गृह बांधणी

कोकणातील घर बांधणी आणि गोव्यातील घर बांधणी यात खुपच साम्यता आढळते. त्यामूळे 'नेत्रावळी’ परिसरातील घर बांधणी तशी वेगळी नाही. पूर्वी शेण-मातीने सारवलेली घरे होती. हल्ली सगळी घरे ही ‘चिरा’ दगडापासून पहायला मिळतात. अजूनही हाताच्या बोटावर मोजण्याइतकी मातीची घरे पहायला मिळतात. बहुतांशी घरे ही चिऱ्याची असली तरी काही घरापुढे शेणाने सरावलेले अंगण पहायला मिळते. दारात तुळस व अंगणात मंडप स्थानिक भाषेत त्याला ‘माटोव’ म्हणतात तोही माडांच्या चुडीतापासून असतो. घरात एका मधला चौक, पाडवी, एक देव घर, स्वयंपाक घर, शौचालय अशी बांधणी असते.

२.६ नेत्रावळी परिसरातील सण उत्सव आणि लोकपरंपरा

‘नेत्रावळी’ हा सांस्कृतिक दृष्ट्या प्रगत असा परिसर आहे. तिथले लोक आपली प्रथा, परंपरा, लोकसंस्कृतीचे जतन करतात. अनेक विधी पार पडले जातात. अनेक सण उत्सव ते साजरे करतात. गावाबाहेर शिक्षण, नोकरीच्या निमित्ताने असलेली मंडळी खास सणासुदीला आपल्या घरी येतात. तर सदर उप प्रकरणात आपण नेत्रावळी परीसरात साजरे होणारे सण-उत्सव याचा परिचय इथे करून घेणार आहोत.

२.६.१ आषाढी एकादशी (आसडी परब)

एकूण चार परब पैकी ही पहिली परब असते. त्या दिवशी घरातील मंडळी सकाळी लवकर उठून अंघोळ करून देवाला गंध फूल केले जाते व आपल्या दैवताला नैवेद दाखविला जातो त्याला स्थानिक भाषेत ‘वाडी’ म्हणतात. तो

नैवेद केळीच्या पानावर न ठेवता करमालाच्या पानावर ठेवला जातो. (जंगलात मिळणारे करमल नावाचे झाड) त्या दिवशी घरी गोड धोड पदार्थ बनवले जाते.

२.६.२ नारळी पौर्णिमा (सुता पुनव)

नारळी पौर्णिमेला तिथे '**सुता पूनव'** म्हणून ओळखले जाते. त्या दिवशी गावातील सर्व गावड्यातील मंडळी आपआपल्या देवाऱ्यातील 'पुरुष दैवताना' सुत (वस्त्र) परिधान करतात. आपली कुलदैवत स्थानिक 'कुळपुरुष', असे उच्चारतात यांना वस्त्र घातले जाते. हाच दिवस आपण 'रक्षाबंधन' हा भाऊ बहिणीच्या नात्याचे प्रतिक असलेला सण साजरा करतो. याच दिवशी गोव्यासह महाराष्ट्रातील 'कोळी' गोव्यात 'पागी' हा समाज समुद्राला सोन्याचा नारळ अर्पण करतात.

२.६.३ नाग पंचम

या दिवशी पुरुष मंडळी मातीपासून 'नाग' तयार करतात त्याला हळद, कुंकु, काजळाने रंगविले जाते. केळीच्या पानावर तो तयार करतात. हल्ली बाजारात नागाच्या मूर्ती आणून लोक पुजत असले तरी काही गावामध्ये घरी मातीचेच बनविले जातात. नंतर त्याची पूजा केली जाते व 'दुधाचा' व 'लाह्यांचा' नैवेद्य दाखवून संध्याकाळी वरुळाजवळ किंवा अळूच्या खाली ठेवला जातो.

२.६.४ नव्रा पंचम

या दिवशी सकाळी १२ च्या अगोदर देवाला नैवेद्य दाखवायचा असतो. सकाळी देवाची पुजा, गंध-फूल करून नैवेद्य दाखविला जातो व शेतातील नवीन धान्य आलेले कोंब घरी घेवून येतात आणि दरातल्या तुळशी वृंदावनाला एक बांधतात, दुसरे देवाऱ्यात बांधतात आणि समोरच्या दरवाज्यावर बांधले जाते. त्या दिवशी भाजी, खतखते, खीर वैगरे केले जाते.

२.६.४ नवरात्र उत्सव

गोव्यातील इतर परीसरात जासा नवरात्र उत्सव होतो तसाच नेत्रावळी परिसरातही होतो. नवरात्रीच्या नऊ दिवस दुपारी आरती केली जाते व रात्री भजन करतात. आता नवरात्री म्हटले की गरबा, दांडीया हा प्रकार गोमंतकात सद्या खूप पहायला मिळतो पण नेत्रावळी परीसरात २-३ ठिकाणी पहायला मिळतो. इतर गावात नसतो.

२.६.५ दसरा

"नेतुर्ली गावातील दुसरा एक उत्सव म्हणजे चावडीवरचा दसरा. दरवटो देवाकडे नवरात्रोत्सवात रोज पूजाविधी असते. नवमीच्या दिवशी इकडे गावकर-नाईकाकडून भूतबळी दिला जातो. खेत्र विधीने एके काळच्या क्षात्रतेजाची स्मृती उजाळून निघते. दशमी तिथीस खड्ग-तलवार-बंदुकीची पूजा केली जाते. सायंकाळी पेडाकडे निर्गमन केले जाते. तत्पूर्वी पारंपरिक ठिकाणी शमीपूजनाचे पठण केले जाते. सर्वांसमक्ष पठण केले जाणारे शमीपत्र असे. "१) श्री गणेशायनमः । श्री सरस्वत्यै नमः। श्री गुरुभ्योनमः । श्री महालक्ष्मी कुलदेवत्यै नमः । (हा श्लोक मागाहून जोडण्यात आला.) शुभं भवतुः । श्रीमन्महागणाधिपतये नमः । लक्ष्मीनारायणाभ्यं नमः। उमामहेश्वराभ्यं नमः। इष्टदेवताभ्यो नमः । ग्रामदेवताभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः । स्थानदेवताभ्यो नमः । वास्तुदेवताभ्यो नमः । आराध्यदेवताभ्यो नमः । आदित्यादि नवग्रहदेवताभ्यो नमः। सर्वेभ्यो देवेभ्यो नमः। सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः । सर्व ब्रह्म वेत्याना (ब्रह्म जाणणारे ब्राह्मण) एतद कर्म प्रधान देवताभ्यो नमो नमः ॥ २) प्रारंभकार्ये निर्विघ्नमस्तु । शुभं शोभनम मस्तु । "शमी शमयते पांप शमी शत्रु विनाशिनी । धरित्र्यर्जुन बाणांना रामस्य प्रियदर्शिनी । अश्मंतक महावृक्ष महादोष निवारणम् । इष्टानां दर्शनं देहि शत्रुनांच विनाशनम् ॥ आदिराज महाराज वनराजा वनस्पते । इष्ट दर्शन मिष्टान्त्रं देहि मे सुखसंपदाम् " शेवटी सुवर्ण लुटून उत्सवाची सांगता केली जाते". [xii]

वरील प्रभू देसाईंच्या विधानावरून नेत्रावळीतील २०-२२ वर्षामागाचा उल्लेख आढळतो. 'टका' वाचन कालांतराने बंद झालेला पाहायला मिळतो. नेत्रावळीत होणारा हा 'चावडीवर' 'दसरा' तसेच 'वेर्ले' गावातही 'दसरा' साजरा होतो. नवमीला 'रामनाथ' देवळात भजन असते आणि नंतर 'रामनाथ', 'कळपुरूष', 'चंद्रेश्वर', 'भूतनाथ' या देवाला पालखी एक फेरी पूर्ण करून गावातून तळीवर जायला निघते. वाटेत ३ ठिकाणी पालखी थांबून तिथे भजन केले जाते. नंतर पालखी तळीवर नेली जाते. पालखीची पाच फेरी मारली जाते, सांगणी केली जाते. गावातील 'भगत' असतो

त्यावर अवसर येतो तेव्हा त्याला चार जण उचलून वर धरतात आणि शहाळयाचे पाणी पाजले जाते व तो शुद्धीवर येतो. तद्नंतर गावाचे मानकरी 'वेळीप', 'गावकर' तळीच्या पाण्याने अंघोळ करतात आणि नंतर भक्तगणांनी आपल्याला हवे असेल तर पाणी अंगावर घ्यायचे असते. त्याला 'तीर्थ' असे म्हणतात. नंतर पालखी देवळाकडे वळविली जाते. पुन्हा भजन केले जाते ते सकाळ पर्यंत चालते.

दुसऱ्या दिवशी 'दसरा' असतो त्या दिवशी सकाळी 'खेत्र' करून म्हणजे कोंबडा, बोकड यांचे बळी दिल्यानंतर 'कौलाल' सुरुवात होते. पूर्वी रेड्याचा बळी दिले जायचे. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार हि प्रथा बंद पडून २५-३० वर्षे झाली. गावातील लोकांच्या सहमतीने ही प्रथा बंद पाडण्यात आली असे गावकरी सांगतात. 'कौल' म्हणजे वाईट शक्ती ज्यांच्या अंगात संचारते त्यांना तिथे आणून त्यांना निवारण केले जाते. अनेक गावातून लोक तिथे येतात. 'भगत' वर अवसार येतो तेव्हा वाईट शक्ती बाहेर फेकली जाते. व 'कौल' संपल्यानंतर 'भगत' तरंग घेवुन नाचतो लोकांना फूल पाकळी देतो त्याला 'कौल' देणे असे म्हणतात. नंतर एका स्थानावर जातो तिथे 'कोळंबा सडडा' म्हटले जाते. तिथे नारळ फोडला जातो, अवसर शांत केला जातो. संध्याकाळी दसऱ्याची सांगता होताना पुन्हा 'खेत्राने' होते म्हणजे कोंबड्याचा बळी दिला जातो. गेल्या वर्षी ज्यांनी 'नवस' सांगून घेतलेले लोक फेडण्यासाठी कोंबडा घेवुन येतात. तिथे मारले जाणारे बळी नंतरच वेळीप, गावकर, देवळी, महार यांना कोंबड्यांचा वाटा कडून दिला जातो. आशी दसऱ्याची सांगता होते.

१) 'खेत्र' च्या दिवशी पाहुण्यांनी आपल्या घरी जाण्याचा हट्ट धरू नये असे वृद्ध लोकांचे म्हणणे आहे. अर्थात गावाची सीमा ओलांडू नये.

२.६.६ दिवाळी

गोमंतकातील इतर परिसराप्रमाणे दिवाळीच्या आदल्या दिवशी म्हणजे 'नरक चतुर्थीच्या' दिवशी 'नेत्रावळीत' 'नरकासुर वध' स्पर्धा भरविल्या जातात. त्यासाठी प्रत्येकी गावातली लोक 'नरकासुर' तयार करतात. पाहटे नरकासुराचा वध करून सकाळी अंघोळ केली जाते. आंघोळीसाठी पाणी गरम करायला ठेवलेल्या भांड्याला स्थानिक भाषेत (भाण) म्हणतात. जंगली कडू फळ 'कारिट' 'झेंडूची फुले' भोवती बांधली जातात. त्या दिवशी नवीन वस्त्र लोक

परिधान करतात. पुरुष मंडळी उजव्या पायाच्या अंगट्याने 'कारिट' फोडले जाते. 'कारिट' हे नरकासुराचे प्रतिक आहे. घरातील स्त्रिया पुरुषांचे औक्षण करतात. त्यानंतर घरोघरी बनवलेले पोहे खातात.

२.६.७ तुलसी विवाह

'तुलसी विवाह' गोमंतकात 'तुळशी लग्न' तर स्थानिक बोलीत 'व्हाडली दिवाळी' मनतले जाते. नेत्रावळी परिसरातील तीन गावे सोडल्यास ती कार्तिक शुक्ल द्वादशीला होते. 'वेर्ले', 'साळजिणी' आणि 'तुडव' या तीन गावात पौर्णिमेला साजरी केली जाते. सर्वप्रथम गावातली ग्रामदैवताच्या प्रांगणात आसलेल्या तुळशीचे लग्न लावले जाते. नंतर सर्वजण आपल्या घरी तुळशीचे लग्न लावतात. गावातील ग्राम दैवतांच्या पटांगणात तुळशीचे लग्न लावल्याशिवाय घरातील तुळशीचे लग्न लावता येत नाही. रात्री तुळशीला दिवा लावून पाच फेऱ्या मारल्या जातात व फेरी मारताना गोविंदाss गोविंदाss असे म्हटले जाते. सुहासिनी बायका केळीच्या 'गोब्यावर' जोडवी 'वात' पेटवून पाच फेऱ्या लावतात. व 'सांगणी' केली जाते. गोमंतकातील इतर ठिकाणी जशी लग्न विधि पार पाडली जाते त्याप्रकारे तुळशी लग्न लावून दिले जाते. एखाद्या लग्नकार्याप्रमाणे तशी पद्धत नेत्रावळी परिसरात पहायला मिळत नाही.

२.६.८ शिगमा

नेत्रावळी परीसरात महत्वाचा असा हा लोकोत्सव म्हणजे 'शिगमा' मुळात 'शिगमा' की 'शिमगा' याचा काही शोध लागलेला नाही पण गोमंतकात 'शिगमा' असेच उच्चारले जाते. या दिवसात पुरूष मंडळीचा सहभाग या उत्सवात असतो. पण स्त्रियांचे स्थान शिगम्यात असते. कारण सर्वेक्षणादरम्यान असे लक्षात आले की पुरुषाला स्त्रीचे वेष करून नाचविले जाते. नेत्रावळीतील शिगमो हा फाल्गुन शुद्ध नवमीला सुरु होवून पौर्णिमेला संपतो. मांडावर नमन घालून शोगम्याला सुरुवात होते. मांड म्हणजे गावातील सामूहिक मालकी असलेले एक ठिकाण. एक पवित्र जागा. द्वादशीच्या दिवशी गावातील मेळ दुसऱ्या गावात जावून खेळतो. मेळ म्हणजे एक समूह/ पथक दुसऱ्या गावात जावून आपली कला सादर केली जाते या प्रक्रियेतून शेजारील गावांशी संबंध अधिक मजबूत होतात. शिगमा हा असा एक उत्सव आहे जो संपुर्ण गावातील लोकांनी एकत्र घेवुन येतो. गावकरी मोठ्या श्रध्देने उत्साहाने हा सण साजरा करतात. त्या दिवशी मुलांना गुडी लावणे आणि मुलींना दिवज लावणे अशी विधी केली जाते. तसेच नवीन लग्न होवून आलेल्या वधुलाही दीवज

लावले जाते. मुलांना गुडी लावणे म्हणजे देवकार्यासाठी रीतसर परवानगी असते तर नवीन वधूला दिवज लावल्यानंतर त्या गावातील किंवा कुळातील देवकार्यासाठी मोकळीक प्राप्त होत.

फाल्गुन महिन्याच्या तृतीयेला 'वेर्ले' गावात 'मळकर्णे' गावात होणाऱ्या या 'शेणी उजो' उत्सवाशी साम्य असलेला 'उजा जात्रा' होते. त्या जत्रेत स्त्रियांचा सहभाग नसतो. गावातील पुरुष मंडळी यामध्ये सहभाग घेतात. रात्री सहभागी पुरुष मंडळी 'कुळगत' आणि 'शिंयापुरुष' या देवाकडे जावून नारळ, अगरबत्ती ठेवून सांगणी सांगितली जाते. सर्वांच्या रक्षणासाठी आंब्याच्या पानाचे तुकडे करून प्रत्येकाजवळ ठेवायला देतात. व त्या ठिकाणाहून गवताची पेटविलेली चुडी अंगावरचे कपडे कडून शाबयs s शाबय s s असे म्हणत देवळाकडे येवून नाचत प्रदक्षिणा घालतात. याला ढोल ताशाची साथ लाभते.

२.७ समारोप

नेत्रावळी परिसराचा सामजिक आणि सांस्कृतिक परिचय करून घेत असताना अनेक गोष्टी उलघडत गेल्या. कुठल्याही स्थळाला मिळालेल्या नावामागे काहीतरी तथ्य असते त्यासाठी परिसराला नेत्रावळी हे नाव का बरे पडले असेल यांचा शोध घेण्यासाठी 'उल्हास प्रभू देसाई' यांचे पुस्तक आणि 'रत्नाकर देसाई' यांच्या पुस्तकांचा आधार घ्यावा लागला. संशोधनासाठी नेत्रावळीच का याचेही उत्तर इथे देण्यात आले आहे. एकूण नेत्रावळी परीसरात वावरत असल्याचे समाजाचे विवेचन सदर प्रकरणात आलेले आहे. परिसरानुरुप तिथल्या जीवनशैलीत बदल होतो. वातावरणाचा प्रभाव जाणवतो. एकंदर तिथल्या जीवनशैलीचा उल्लेख इथे आलेला आहे. तसेच तेथील साजरे होणारे सण-उत्सव, परंपरा यांचा पडताळ केला गेला आहे.

२.८ निष्कर्ष

१) 'नेत्रावळी' हा परिसर कर्नाटक राज्याच्या सीमा जवळ असल्याकारणाने अथवा पूर्वी परिसरात स्थायित झालेला द्रविडी ब्राह्मणामुळे 'हळळी' या कानडी शब्दामुळे नेत्रावळी या स्थलनामाचा उगम झालेला आहे.

२) सांगे तालुक्यातील नेत्रावळी परिसर पर्यटनाच्या क्षेत्रात महत्त्वाचा अग्रेसर ठरतो.

३) नेत्रावळी परिसरात उत्पादनाच्या क्षेत्रात अनेक प्रयोग होत असल्याने या परिसराला वेगळा आयाम प्राप्त झालेला आहे.

४) नेत्रावळी परिसरातील अनेक ग्रामनामे ही तेथील दैनंदिन बीलीला अनुसरून आलेली आहे.

५) गावगाड्यात येणाऱ्या जाती जमाती तेथील परिसरात आढळतात.

संदर्भ

---

[i] प्रभू देसाई उल्हास, *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक /कर्ता, प्रभुदेसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा,१ जानेवारी २००३, पृ. २००.

[ii] देसाई, रत्नाकर राघोबा. *'गोवा स्थलनामांची जडण घडण'* प्रकाशन,अक्षर जुळणी बी-३०२, शिवं सहकारी गृहनिर्माण संस्था, सेक्टर ४ आणीन पनवेल पूर्व रायगड. पृ, १६

[iii] प्रभू देसाई उल्हास, *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक /कर्ता, प्रभुदेसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा,१ जानेवारी २००३ पृ. २१४.

[iv] १ जानेवारी २००३ प्रभू देसाई उल्हास, *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक /कर्ता, प्रभुदेसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा,१ जानेवारी २००३. पृ. २१४.

[v] https://www.onefivenine.com/india/villages/South-Goa/Sanguem/Neturlim

[vi] https://indiamapia.com/South_Goa/Netorlim.html

[vii] प्रभू देसाई उल्हास, *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक /कर्ता, प्रभुदेसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा,१ जानेवारी २००३. पृ.२०१.

[viii] खेडेकर, विष्णू विनायक. *'गोवा कुळमी: पर्यावरण संस्कृतीचे जनक, रक्षक'*. संपर्क मध्यम, फेब्रुवारी २००४,पृ. १९४.

[ix] सातोस्कर, बाळकृष्ण. *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*, शारदीय प्रकाशन पणजी गोवा, खंड १ प्रथम आवृत्ती: १९७९ पृ. २१५.

[x] https://dhangar-articles.blogspot.com/2014/04/article-0037.html?m=1

[xi] प्रभू देसाई, उल्हास. *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक /कर्ता, प्रभुदेसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा,१ जानेवारी २००३ पृ. २०३

[xii] प्रभू देसाई उल्हास, *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक /कर्ता, प्रभुदेसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा,१ जानेवारी २००३. पृ. २१३

प्रकरण ३

नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मय: व्याप्ती आणि मर्यादा

प्रास्ताविक 54

३.१ नेत्रावळी परिसरातील लोकगीते..55

३.१.१ फुगडी गीत 55

३.१.२ धालो गीत 56

३.१.३ शिगमोत्सवतील नृत्यगीते 57

३.२ नेत्रावळी परिसरातील लोककथा..58

३.२.१ वंश कथा..58

३.३ लोककथागीत (गावन काणी)..59

३.३.१ कुष्णा कथा..60

३.३.२ पद्मावती आणि चंद्रिमबाण...61

३.३.३ दैवत विषयक लोककथा 63

३.४ नेत्रावळी परिसरातील म्हणी व वाक्प्रचार...64

३.४.१ म्हणी...64

३.४.२ वाक्प्रचार...65

समारोप 66

३.५ निष्कर्ष...66

संदर्भ...66

प्रकरण ३

नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मय: व्याप्ती आणि मर्यादा

प्रास्ताविक

"लोकवाङ्मयाद्वारे लोकजीवनाचे दर्शन घडते, तर लोकजीवन हेच लोकवाङ्याचे कारण ठरते. असा हा अतूट संबंध होय. असे असूनही लोकजीवनातील बारकावे पडताळण्यासाठी प्रथम सामग्री म्हणून मौखिक परंपरा अथवा लोकवाङ्मयाची निवड होते."[1] लोकजीवन आणि लोकवाङ्मय यांचा संबंध या विधनाद्वारे अधिक स्पष्ट होताना दिसतो.

सदर प्रकरणाद्वारे नेत्रावळी परिसरातील चा परामर्श इथे घेण्यात येणार आहे. सर्वप्रथम तिथे आसलेल्या लोकवाङ्मया वर्गीकरण केले जाणार आहे. त्यानुसार सदर प्रकरणाची मांडणी करून तिथे आसलेल्या लोकवांगमयाची अर्थात लोकगीते, लोककथा, लोककथागीते, म्हणी व वाक्प्रचार यांची उदहरणसहित लेखन केले जाणार आहे.



तक्ता क्र:३.१ नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मय

३.१ नेत्रावळी परिसरातील लोकगीते

माणूस सामूहिक जीवन जगायला लागला तेव्हापासून लोकगीतांची परंपरा पहायला मिळते. समुहमनाने उदयास आलेली लोकगीते ही एक विशिष्ट तालबद्धतेने पुढे आलेली असतात. येथील लोकगीतांमध्ये समाजाच्या अनेक गोष्टींचे चित्रण केले पाहायचा मिळते. दुःख, आनंद, व्यंग अशा अनेक घटकाचे प्रतिनिधित्व लोकगीते करताना दिसतात. लोकगीतांतून व्यक्ती स्वःताला व्यक्त करतो. लोकोत्सव, सण लग्न अशा ठिकाणी लोकगीते सादर होताना दिसतात. धालोच्या मांडावर, शिगम्याच्या मांडावर, चतुर्थीसारख्या सणानिमित्त उत्साह आनंद, तल्लीनतेने इथे लोक व्यक्त होतात.

उदाहरणार्थ

माडा वोयलो किर रे शेपडी हालयता
शेपडेच्या तालार गड्या नाचयता

एका वेगळया ढंगाने या गीतांचा उल्लेख आलेला आहे. स्थानिक भाषेत ‘किर’ अर्थात ‘पोपट’ असा आहे.

३.१.१ फुगडी गीत

‘फुगडी’ हा गोमंतकातील सर्वत्र सादर होणारा लोकनृत्य प्रकार आहे. गोमंतकातील स्त्रियांचा हा प्रकार आहे. पण पुरुषही फुगडी खेळताना दिसतात. गोमंतकातील इतर परिसरात जशा फुगड्या सादर होतात तशाच इथेही सादर होतात. साधारणतः सामूहिक सण-उत्सव निमीत्ताने या नृत्यप्रकार सादर होतो. सद्या ‘नेत्रावळी’ परिसरात गणेश चतुर्थी, लक्ष्मीपूजन, सरस्वती पूजनाच्या वेळी तिथल्या स्त्री व पुरुष फुगडी सादर करतात. फुगडी या नृत्य प्रकारचे अनेक प्रकार आहेत. त्यातील बस फुगडी, कळशी फुगडी हे प्रकार पाहायचा मिळतात. तिथल्या ‘नेत्रा गावकर’ या स्थानिक व्यक्तीने दिलेल्या माहितीनुसार ‘विचूंद्रे’ या गावात पूर्वी लोक ‘कळशी फुगडी’ हा नृत्यप्रकार सादर करायचे पण कालांतराने तो बंद झालेला आहे. फुगडी म्हटले की सर्वांना चतुर्थी आठवते. तर त्याच संबंध दर्शविणारे फुगडी गीत म्हणजे

गणपती देवा करीन तुजी सेवा
नमन करीन रे देवा नमन करीन रे
पाच फुलानी पाच फळांनी
दुर्वा वाहीन रे देवा दुर्वा वाहीन रे

कपलाचो कुकू दे जन्म भर
आनी काय मागीन रे देवा आनी काय मागीन रे
गणपती देवा करीन तुजी सेवा
नमन करीन रे देवा नमन करीन रे

अशी गणेशाला वंदन सदर फुगडीगीताद्वारे केली जाते. वरील गीतातून गणपतीला ती जन्मभर आपल्या सौभाग्याला जपण्याची विनंती स्त्री करताना दिसते.

३.१.२ धालो गीत

धालो हा महिलांचा उत्सव असून तो गोमंतकात अनेक ठिकाणी सदर होताना पाहायला मिळतो. पौष महिन्यात येणाऱ्या पौर्णिमेच्या आसपास गोमंतकात हा उत्सव पाहायला मिळतो. गावातील कुमारिका, सुहासिनी, आणि विधवा स्त्रियांचा सहभाग असतो. फुगडी बरोबर धालो हा लोकनृत्य प्रकारही स्त्रियांचा महत्वाचा असा आहे. कुळमी जमातीच्या स्त्रिया मांडवर धालो खेळतात. ज्या ठिकाणी धालो खेळतात त्याला धालांचा मांड म्हणतात. सुरुवातीला मांडाची मानकरी महिला समई प्रज्वलित करते. केळीच्या पानावर अगरबत्ती,तांदूळ, नारळ ठेवले जातात. मांडावर उपस्थित सर्व बायकांना गंध लावतात. मांडदेवताला प्रार्थना केली जाते. गाऱ्हाणे घातले जाते. नंतर मांडाच्या एका जागेवर खेळला सुरुवात होते. जिथे दोन्ही बाजूने एखादी जुगलबंदी सादर होते असे जेव्हा आपण धालो पहातो तेव्हा वाटते. मांडावर स्त्रिया दोन्ही बाजूने रांग करतात, हात कमरेला असतो साखळी सारखा व एका बाजूचा संघ गाणे म्हणत समोरच्या रांगे जवळ जातो व तिथे पोहचताच खाली कमरेकडून वाकून पुन्हा आपल्या जागेवर उलट्या पावलाने येतो नंतर पुढचा संघ तीच कृती करतो. गोमंतकात प्रचलित असलेले धालो गीत.

श्री धालो गे आमी धालानी खेळोया गे आमी धालानी खेळाया
आयल्या जाल्यार बरे जाले सखिया साद घाला गे
महालक्ष्मी देविचो रंभा आमी मांडार खेळोक आयल्या गे

या प्रकारे ज्या गावात धालो खेळल्या जातात त्या गावातील देव देवतांचा उल्लेख करून गीत एका अर्थाने गावातील दैवतांना प्रथम मान दिला जातो. म्हटले जाते.

३.१.३ शिगमोत्सवतील नृत्यगीते

शिगमोत्सव हा गोमंतकाचा महत्वाचा असा लोकोत्सव आहे. फाल्गुन महिन्यात तो सुरू होतो. हा उत्सव पुरुषप्रधान म्हणता येते कारण स्त्रियांचा सहभाग या उत्सवाला नसतो. भिन्न भिन्न पद्धतीने गोमंतकात हा सण साजरा होताना दिसतो. वादन आणि नृत्याच्या जोडीने हा उत्सव पार पाडला जातो. इतर गोमंतकातील परिसराप्रमाने नेत्रावळी परिसरात आढळणारा समान गुण वैशिष्ट्य म्हणजे मेळ हा मेळ म्हणजे एक समूह, गट असतो प्रत्येक गावातील असा एक गट असतो जो त्या गावचे प्रतिनिधित्व करत असतो. शिगम्याच्या दिवसात एका गावातील मेळ दुसऱ्या गावात जावून आपली कला सादर करतात. यालाच स्थानिक भाषेत मेळ खेळता असे म्हणतात. ज्या दिवशी नमन घातले जाते त्या दिवशी सर्व देव देवतांना आवाहन केले जाते. असे मानले जाते की या दिवसात सर्व देव देवतांना उठवले जाते. जोपर्यंत मांड उतरवला जात नाही तोपर्यंत जंगलात लाकडे आणण्यासाठी वैगरे लोक जात नाही. दशमीला गावातील मेळ बाहेर जातात. वर्षपद्धतीप्रमाणे मेळ आपल्या एका स्थानातून दुसऱ्या ठिकाणी जायला निघतात. होळीच्या आदल्या दिवशी बाहेर गेलेला मेळ आपल्या गावात येतो व गावात खेळून मांड उतरविला जातो. तिथल्या बहुतेक शिगमोत्सवाची सांगता जरी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी असली तरी नेत्रावळी परिसरातील ‘वेर्ले’ गावचा मेळ मात्र पौर्णिमेला उतरविला जातो. शिगमोत्सवातील नमन गीत पुढीप्रमाणे

ॐ करी या देवा ग नमन घालू
आनी पाताळीच्या शेष ग राया नमन घालू
आनी गावतरे माये गे नमन घालू
आनी धर्तरे माये गे नमन घालू
आनी तुळसाई माये गे नमन घालू
आनी सरस्वती माये गे नमन घालू
आनी चाना सुर्या देवा नमन घालू

असे नमन घालून शिगमोत्सवला सुरुवात होते. या नामनाद्वारे गावातील सर्व देव- देवताना आवाहन करून पुढच्या कार्याला सुरुवात होते.

३.२ नेत्रावळी परिसरातील लोककथा

"लोकवाङ्मयात लोककथांचे स्थान महत्त्वाचे आहे. लोककथांचे प्रमाण प्रचुर असून त्याला लोकप्रियताही विपुल लाभली आहे. आजही ज्या ठिकाणी मनोरंजनाची आधुनिक साधने उपलब्ध नाहीत तेथे परंपरेने चालत आलेल्या लोककथा हेच लोकानुरंजनाचे प्रधान माध्यम असते." [2] हे विधान तितकेच बरोबर आहे. आपल्या आयुष्यात घडलेल्या प्रसंगाचे एका शैलीने कथन करणे यालाच कथा म्हणता येते. कथा या केवळ मनोरंजनासाठीच नसुन बोध देणे, संस्कार देणे अशीही प्रयोजन आसतात. लोक कथेचे स्वरुप म्हणत असताना लोककथा तत्कालीन सामाजात चालीरीती कशा असतात याचे वर्णन करतात. तसेच समाजाचे नीती नियम यांचा उहापोह करतात. काही वेळा लोककथा विनोदी स्वरूपातही आढळतात. भौगिलिक स्थानुसार लोककथांमध्ये स्थानिक निसर्गाचे वर्णन किंवा सहभाग प्रामुख्याने आढळतो. उदाहरणार्थ नदी, डोंगर, जंगली प्राणी इत्यादी. नेत्रावळी परिसरातून पूर्वी अनेक जाणकार माणसे या गोष्टी सांगायच्या पण हल्ली त्या परीसरात हातावर मोजण्याइतकी मंडळी कुठेतरी पहायला मिळते.

३.२.१ वंश कथा

याच गावाची ही गोष्ट आसा. सोगळे गावांन बरे रावतले उमेदीन. एक दिस 'गावकर' आणि 'म्हार' ह्यांचा भितर वाद जालो. आणि एक दिस बाबा अशे जाले की गावकरांनी म्हाराचे सोगळे घराणे मारले. आमच्या गावतलो एक वेळीपाचो एकट्यान तेंच्या एक चेड्याक आपल्या घराक हाडून लिपोन दोवरले आणि दुसरे दिसा सायडिंच्या कर्नाटका एक गावान व्हरोन दोवराले. हॆ सगळे जावून एक दोन तीन वर्सान गावानं वायट घडपा लागले लोकाची 'गोरवा' गायब जावप लागली तशे म्हणून गावाचे सगळ्यानी देवाक प्रसाद लायलो. तेन्ना देवान सांगले की आपल्याक म्हाराचो जो मान मेळतालो तो मेळना तेन्ना लोक गावानं 'म्हार' सोडपा लागले तेन्ना वेळिपाचे ते लोकानी सांगले की आमी तेमचे कुळाचो एकट्या चेड्याक दोवरला आणि तेका हाडून गावानं घर बांदुन दिले.

या कथेला आपण वंश कथा असं म्हटलं तरी गैर वाटणार नाही कारण ही कथा तशीच आहे गावातील 'महार' घराण्यातील सर्व कुटुंबीय मारल्यानंतर गावातील एकाने त्यांच्या कुळातील एका मुलाला दुसऱ्या गावात नेऊन ठेवले जाते. काही वर्षांनी गावात वाईट घटना घडल्यानंतर प्रसादावर समजले की 'महार' लोकांकडून जी देवाची सेवा होत होती ती झाली नाही. त्यामुळे गावात अरिष्टे येत आहेत तेव्हा. ते शोध सुरू करतात. तेव्हा तो माणूस गावातील लोकाना सांगतो कि याच गावचा महार समाजातील एक मुलाला मी दुसऱ्या ठिकाणी नेऊन ठेवले होते. नंतर त्याला गावात बोलावून त्याच्याकडून त्याच्या देवकार्य केलं जाते.

लोक पयली सायकल घेवुन कामाक वयताले. आणि गावचो एक सत्यवान नावाचो एकटो कामाक आसलेलो तो सदांच राच्चो लेट घराक वयतालो. एक दिस किदे जाले तो रातीचो येतान फाटल्यान सायकल बसोन कोणतरी येतालो आणी तेजेकडे विडी मागतलो. तेजेकडे उलयत येतालो आणि घराकडे पावता तेन्ना गायब जातलो. तो आपले घरान येवून सांगतलो की अशे अशे जाता अशे खुप वेळार जाताले मागीर सोगळयाक कळे की तो राखणदार.

राखणदारांच्या अनेक कथा त्या त्या परिसरात ऐकायला मिळतात. तशीच ही कथा आहे. आपल्या गावातील जवळ आहे तिथे राखण देव असतो. असे आजही लोक म्हणतात. त्याचप्रमाणे या कथेमधून आपल्याला समजते की कोणीतरी त्याच्यासोबत येतो आणि अदृश्य होतो. तसेच तो त्याच्याजवळ विडी मागतो आहे. तो माणूस विडी ओढत नसल्याने तो देवू शकत नाही. सर्वेक्षण करताना कथा सांगणारा असे सांगत होता कि त्याची विडीची इच्छा जर त्याने पूर्ण केली असती तर त्याच्यावर खुश होवून गेला असता.

३.३ लोककथागीत (गावन काणी)

"प्राचीन भारतीय ग्रंथांत कथागीतांसाठी 'गाथा' असा शब्द वापरला असून वेद, पुराणे, ब्राह्मणग्रंथ, बौद्धसाहित्य, महाकाव्य, विदेशी यात्रिकानी लिहिलेली प्रवासवृत्ते यांवरून त्याची एक दीर्घ परंपरा असल्याचे सिद्ध होते. वैदिक काळात शुभप्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गीतांना गाथा म्हणत." [3] "जी. एल. किटरज या अभ्यासकाच्या मतानुसार गीताच्या माध्यमातून सांगितलेल्या कथेस लोककथागीत म्हणतात"[4] अगदी साधी व सरळ अशा व्याख्येतून त्यांनी समजविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हेमंत अय्या यांनी आपल्या प्रबंधात ‘गावन काणी’ ही एका उत्सव सादर करते त्याला ‘गुडुल्या काणी’ म्हटले जाते तसे एका उत्सवानिमित्त ‘गावन काणी’ सांगितली जात नाही. तेथील लोक ‘गावन काणी’ कधीही सादर करतात. जेव्हा कधीही काही माणसे एकत्र जमतात तेव्हा या कथा सांगितल्या जातात. जेव्हा तुडव या गावात. गेल्यानंतर स्थानिक सांगत होते की ‘गावन काणी’ सांगणारा शेजारच्या गावचा रात्री थांबला तर सर्वजण कोणा एकट्याच्या मंडपात ऐकायला यायचे.

३.३.१ कुष्णा कथा

लोककथा गीताची सुरुवात काहीवेळेला गीतातून होते,तर काहीवेळेला ती प्रस्तावनेपासून करतात. सदर लोककथा गीताची सुरुवात गीतातून झालेली आहे.

दोगे चोवगे मेलोनी ये रानी वनी गेल्यो

रानी वनी गेल्यो रे पुत्रा रानी वनी गेल्यो
रानी वनी वाचोनी कोडू पुनाईलो
कोडु पुनाईलो रे पुत्रा कोडु पुनाईलो
कोडु पुनावन घरात्यो येईल्यो घराशो येईल्यो रे पुत्रा
घराश्यो येईल्यो
रुपयाशी फातर सोन्याचो रे गुड्डा कोडु दोडाविलो रे
पुत्रा कोडु दोडाविलो
पुत्राच्या मातेन पुत्रा माणयेर सोडिलो
माणयेर सोडिलो रे पुत्रा श्री कुष्णा पुत्रा
कोडुचो दोडोवुनी पुत्रा बोतुशी पाजली
बोतु पाजवीली रे पुत्रा बोतु पाजविली
बोतुशी पाजना पुत्रान पोराण सोडिलो
पोराण सोडिलो रे पुत्रा श्री कुष्णा
पुत्रा श्री कुष्णाची माता एकटी करपता
एकटी करपता रे पुत्रा एकरी करपता
पुत्रा कमराचे रे जोक शेटी दिला जोक
आता कोणा घालु रे पुत्रा आता कोणा घालु
पुत्रा गळ्याचे रे जोक शेटी दिला जोक
आता कोणा घालु रे पुत्रा आता कोणा घालु
श्री कुष्णाची माता एकटी करपता
एकरी करपता रे पुत्रा एकटी करपता

पुत्रा आंगचे रे जोक दोरज्या दिला जोक
आता कोणा घालु रे पुत्रा श्री कुष्णा पुत्रा
एकादशी तिथी दुवादशी राती वाट पिरविता
रे पुत्रा वाट पिरवता
पुत्राच्या सायेर दंय वोतला तूप
ये काय रुप पोळो रे पुत्रा श्री कुष्णा पुत्रा
पुत्राच्या सायेर सुर्ये वोतला तेल
ये काय रुप पोळो रे पुत्रा श्री कुष्णा पुत्रा
सुडबुडी उटोनी मिरयाक धरील्यो
मिरयाक धरिल्यो रे पुत्रा श्री कुष्णा पुत्रा
सारये उज्जो लायतना सुडबुडी उटोलो
आवयल्या मिरयाक धरिल्लो रे पुत्रा मिरयाक धरिले
एकदशी तिथी दुवादशी राती वार पीरीवा रे पुत्रा वाट पिरवीता

या कथेत श्री कृष्णाच्या बालक्रीडा, उनाडक्या दर्शवितात. सदर कथेत कृष्णाची माता आणि सहकारी रानात जावून कडू आणतात आणि कृष्णाला पाजतात. कृष्ण खोडकर वृत्तीचा असल्याने शांत पडून राहतो. ते बघून आई रडायला लागते. कृष्णाला केलेले जोक आता कोणाला मी घालू असे दंगून माता रडते. जेव्हा माता स्वताच्या साडीला आग लावायला जाते तेव्हा कृष्ण उठतो व आईच्या पदारेला पकडतो. अशी या कथेचा अस्य थोडक्यात इथे स्पष्ट करण्यात आला आहे.

३.३.२ पद्मावती आणि चंद्रिमबाण

> एक राजा आसलो ते राज्या एक कन्या आसली आनी एकट्या राज्य कुवर आसलो कन्याक नाव पद्मावतीकन्या मंटगिर ती भितर आसता राज्या कुवर एक दिस शिकार करपाक वयता शिक्कार करपाक गेले कडेन तो कन्येच्या राज्याक पावना कन्या आपल्या माहालाच्या जनेलाल्या त्या राज कुवरा पयता आनी ती एका मेकाक पसंद पडटा त्याकुवराचे नाव चद्रीमबाण आसता दोगायच्या आवयक बापायक खबर आसना ती एका मेकाक पसंद करता म्हुण एकदिसा कन्येचे फुला घालुन वजन करपाचे ठरता तेन्ना ते बसना आनी तेका कयटा की हे कोणाच्या मोगान आसा तो चद्रीमबाण. आवय चोडवा म्हणटा.

एक राजाला कन्या असते. आणि त्याचाच महालात एक राजकुमार असतो. तो शिकारीला जातो तो आला नाही म्हणून खिडकीजवळ बसून राज कन्या वात बघत आहे. त्यांचे एकमेकावर प्रेक असते हे

त्यांच्या आई वडिलांना माहित नसते. जेव्हा त्यांना समजते कि आपली मुलगी कोणाच्या तरी प्रेमात आहे. असा कथेचा आशय सांगून पुढे कथा पुन्हा गीतातून सुरु होते.

माझ्या पद्मावती धुये गो
माझ्या पद्मावती धुये म्हु
तुका फुलास भार नाही ग
तुका फुलास भार नाही म्हु
तुका वेगळोस भार जाला गो
तुका वेगळोस भार जाला म्हु
धुये कोणूनी भेटला गो
धुये कोणूनी भेटला म्हु
असो चंद्रीमबाण पुत्र रे
असो चंद्रीमबाण पुत्र म्हु

इथे त्या कथेचा अर्थ पुन्हा गाद्यातून सांगण्यात आला आहे.

चंद्रीमबाण म्हणगीर आवयचेर काळ येता तो देवा सारखो आसता ती राज्याक कायत सागना चंद्रीमबाणा खबर आसता की ती आपली कन्या दिवपाना म्हूणोन तो तिका पोळोन वरपा येता

जेव्हा तो राजकुमार चंद्रीमबाण म्हणून समजते तेव्हा आईवर संकट ओढवतो. ती राजाला याविषयी काहीच सांगत नाही. राजकुमाराला माहित असते कि राजा मला स्वीकारणार नाही म्हणून तो तिला पळून न्यायला येतो.

माझ्या पद्मावती अस्तुरे गो
माझ्या पद्मावती अस्तुरे म्हु
काडकाड नीते जनेल गो
काडकाड नीते जनेल म्हु

घरा तेकोन पोळोन हाडता त्या पिपळा वयल्यान तो तिका आपल्या राज्या वोरता आनी कोणाक सागना आसतना लग्न जाता तो तिका लिपोन दोवरता एक दिस त्या कुवरा बयण विचारता तो सांगता

तो तिला पळवून आणून लग्न होतो आणि त्याला घरात लपवून ठेवतो. तेव्हा बहिण त्याला विचारे तो संवाद पुढीलप्रमाणे.

माझे बायू दोनो बहीणी गो
माझे बायू दोनो बहीणी म्हू
माका निंद अशी येता गो
माका निंद अशी येता म्हू
माझ्या बनवा न्हू न बनवा
माझ्या बनवा न्हू न बनवा म्हू
तु राती निंदना रे
तु राती निंदना म्हू
तुका जाळे किरमुस खाता रे
तुका जाळे किरमुस खाता म्हू

आनी मागीर सगल्याक खरे किते ते कयटा आनी सगली बरे बशेन रावता.

शेवटी सर्व हकीगत सर्वाना समजते.अशी ही कथा आहे.

३.३.३ दैवत विषयक लोककथा

एक दिसा दोन गावाचे भूरगे एक गावांन जात्रेक या म्हणून गेले वाट आसलेली रानाची ते सकाळी भायर सरले ते वाटेन पाच वरा लागता ते गावानं पावपा ते सोवका गेले कारण जात्रेक नाटक लेट सुरू जावपाचे आसलेले aआणि सांत वरा जाली काळोक आसलो वाट चलता चलता खय पावले ते कळकच ना थोड़े फुडें पावले एक न्हय मेळळी उदक पीले आणि तशे या म्हण गेले परत वाट चुकले मागीर तेमी देवाक उलो मारलो आणि म्हटले की ह्या जाग्याचे राखण देवा आमका पाव रे तेन्ना काही वेळान ते दोगाक एक ज़ाग मेळळी एक दादलो आवाज आयलो आणि तेनी तुमी हांगा किदे करता चला या नाटक सुरू जातले आणि तो तेंका घेवुन गेलो. आणि जशे देवूळ दिसपा लागले तेन्ना त्या दादल्यान सांगले की हाव पाय धुवोन येता चला फुडे आणि तो गायब जालो.

आपल्या वाटारात किंवा अन्य वाटारामध्ये अनेक लहान मोठे मंदिर किंवा असं काहीतरी पुजलेला आपण बघत असतो, ते त्या वाटारातील राखण देव असतात. त्यांची नावे ही वेगळीच असतात. म्हणजे नेत्रावळीहून 'वेर्ले' गावात जाताना एक आहे तो 'नासदेव' म्हणजेच राखणदेव त्याचप्रमाणे या कथेमध्ये आपल्याला समजते की जेव्हा ते दोघे जंगलामध्ये अडकून पडतात त्यांना जायचा रस्ता माहित नसतो. तेव्हा ते आपण आपल्या देवाला किंवा त्या जागेवर असलेल्या देवाला हक देतात. त्याबरोबर त्यांच्यासमोर एक माणूस येतो आणि तो त्यांना सरळ त्यांच्या ठिकाणापर्यंत येऊन पोहोचवतो आणि न सांगताच कुठेतरी अदृश्य होतो हे आजही आपण कितीतरी गावांमध्ये अशा कथा ऐकलेली असणार .

३.४ नेत्रावळी परिसरातील म्हणी व वाक्प्रचार

"म्हणी म्हणजे अनुभवाच्या खाणी' ही उक्ती यथार्थ आहे. 'लोक'च्या मौखिक परंपरांतील आणि लोकभाषेतील अविभाज्य अंग म्हणून म्हणी व वाक्प्रचार यांचा विचार महत्त्वपूर्ण ठरतो." [5]इतर गोमंतकातील परिसराप्रमाने नेत्रावळी परिसरात अनेक लोकांच्या तोंडून दैनंदिन व्यवहारात त्या सहजपणे उच्चारताना दिसतात. लोकसाहित्यातील ही मौखिक परंपरा माणसांच्या जीवनातील एक महत्त्वाचा भाग बनून आहेत. म्हणी व वाक्प्रचार हे सहज न येता ते अनुभवातून व्यक्त झालेले आसतात.

३.४.१ म्हणी

दैनंदिन जीवनात नकळतपणे प्रतीके, प्रतिमांचा वापर होवून म्हणी आलेल्या असतात. लोकोक्तीमध्ये येणारा हा प्रकार आहे.

आपल्या समाजात आजूबाजूला अनेक जण कितीही सांगितले तर न ऐकणारे असतात. अशावेळी लोकांच्या तोंडून सहज येणारि म्हण म्हणजे ***पेट्या शेपडी वाकडी ती वाकडीच*** अर्थात कुत्र्याचे शेपूत जसे वाकडे असते ते सरळ कधीच होत नसते तसे कधीही न ऐकणार्याची गत असते. ***कावळ्या शापान गाय केन्ना मोन्ना,*** जर कोणी चांगले कार्य करायला कि समाजातील काही लोकांना ते पचात नसते. अशावेळी जो शांत माणूस आहे तो अशाप्रकारे म्हणीचा उपयोग करताना दिसतो. ***कोंब्यान साद घातलो ना म्हण दीस जावपा रावता?*** आपले आयुष्य हे देवाने जसे लिहिले आहे तसे असणार असे आपण मानतो अशावेळी कोणतीही गोष्ट व्हायची ती होणारच. कोंब आरवला नाही म्हणून दिवस होत नाही का?

असे त्याचे शब्दशः भाषांतर आहे. तसेच धावपळीच्या दैनंदिन जीवनात आपण अनेक गोष्टी विसरतो. एखाद्यावेळी जवळ असलेली वस्तू मिळत नाही तेव्हा या म्हणीचा वापर त्याला उद्देशून होत असतो. ***खाणीर चेडो पूण सोद्ता गावबर*** याला मराठीत असलेल्या **'खाकेत कळसा गावाला वळसा'** असे म्हणतात तर दोन्ही म्हणी पाहताना इथे 'स्त्रीला' उद्देशून आलेल्या दिसतात. ***वाकड्या मेडिक खुय वाकडेच मेडी*** , ***मुकाल्ले जोत सारके गेल्यार फाटले वयता***

घरात जेव्हा मोठी माणसे वागतात ताशी जर लहान मुळे वागायला लागली कि काही जाणकार माणसांच्या तोंडून अशा म्हणी येतात. अनेकदा तर मोठ्या भाऊ-बहिणीला अशा म्हणी ऐकायला मिळतात. अति शहाण्या माणसांची खेचण्यासाठी ***शिता फुडे मीट खाता*** अशा म्हणीचा उपयोग करतात. ***देवान दिल्ले नाका आणि देवचारान दिल्ले जाय, आपल्या पायार कुदळ मारली*** यासारख्या म्हणी आपल्याला समाजात आढळतात. इथे देव हा चांगल्याचे प्रतिक आहे, तर 'देवचार' अर्थात असुर यांना वाईट गुणांचे प्रतिक मानतात. त्यानुसार चांगली गोष्ट वाट्याला असूनदेखील वाईट गोष्टींशी संबंध येतो तेव्हा याचा प्रत्यय आपल्याला येतो. गरम जीवनाचे उदाहरणातील दुसरी म्हण असून कुदळ हे अवजाराचा उल्लेख आलेला आहे. अर्थात स्वतःवरचा संकट ओढून घेणे असा आहे. खालील म्हणीद्वारे आळशी माणसाची वृत्ती दिसून येते ***आळश्याक भिकणा भाजून खा सांगले जाल्यार आळश्यान खय जितेली खाली*** भिकणा हा शब्द स्थानिक बोली भाषेतील असून त्याचा अर्थ फुटाणे असा आहे.

३.४.२ वाक्प्रचार

म्हणी प्रमाणे वाक्प्रचारांचा वापर लोक नकळतपणे करतात. व्यक्तीला नेमकेपणे निर्देश वाक्प्रचारतून करताना आढळतो. उपरोधात्मक शब्द त्यामध्ये असतात. जीवन निगडीत असलेल्या वस्तूनिर्देशांचा वापर त्यातून होत असतो. खोटे बोलणाऱ्याला तू खोटारडा आहेत. किंवा त्याचे म्हणणे खोटे आहे हे दाखवून देण्यासाठी ***कापटीकार*** असे संबोधतात तसेच कोल्हा हा हुशार प्राणी असून खोट्या गोष्टी सांगून तो इतर प्राण्यांना फसवतो अशा कथा लहानपणात ऐकलेल्या आहेत त्यावरून ***पोके खोबर, कोल्या कणियो*** बंडलबाज असा त्याचा अर्थ आहे. ***कट्यान काटो काडटा*** मराठीत आपण जशास तसे म्हणतो त्याप्रकारे या म्हणीचा मतितार्थ आहे. जो जसा वागतो त्याच्याशी तसेच वागावे एकप्रकारे हे उद्देशजनक

वाटतात. खटके उडविण्याची वृत्ती आपल्या समाजात दिसून येते. तसाच एक वाक्प्रचार ***सुकले बोंबिल*** सडपातळ व्यक्तीला अशा शब्दात त्यांची खिल्ली उडविली जाते. ***टोपी घालोप, शेणी लवोप, चुनो लावोप*** याचा सरळ अर्थ फसवणे असा आहे. मानवाच्या अवयवाला निर्देशून आलेले वाक्प्रचार असून जवळचा माणूस गोड बोलून आपला विश्वासघात करतो त्याला ***केसान गळो कापता*** असे म्हणतात. *अनेकदा शाळेत, कामाला असणाऱ्यांना हे* वाक्प्रचार *जवळचे असते*. ***दांडी मरोप*** सुट्टी घेणाऱ्याला दांडी मारणारा असे म्हणतात.

समारोप

नेत्रावळी परीसरात सर्वेक्षण करत असताना मिळालेल्या संकलनाच्या आधारे सदर प्रकरणाची मांडणी केली गेली आहे. सुरुवातीला नेत्रावळी परिसरातील लोकगीते, लोककथा, लोककथागीते, म्हणी, वाक्प्रचार असे विभाग पाडून त्यावर भाष्य केले आहे.

हेमंत अय्या यांच्या प्रबंधाचा आधार सदर प्रकरणामध्ये घेण्यात आला आहे. एकंदरीत प्रकरणात नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मयाचा इथे परामर्श घेण्यात आला आहे.

३.५ निष्कर्ष

१) नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्मयातून येथील लोकजीवनाचे चित्रण समोर येते.
२) इतर परिसराप्रमाणे नेत्रावळी परिसरातील लोककथांचा आशय ग्राम संबंधी आहे.
३) लोककथांतून येथील पर्यावरणाचा संदर्भ आढळतो.
४) स्थानिक देव दैवतांचा सहसंबंध ग्राम जीवनाशी येतो.
५) लोककथागीतात पौराणिक देव दैवतांचा उल्लेख येथील कथांमध्ये आढळतो.

संदर्भ

[1]अय्या, हेमंत. *गोमंतकातील काणकोण तालुक्यातील लोकसाहित्य:चिकित्सक अभ्यास* पृ.१५३
[2] मांडे प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पृ.१७४
[3] मांडे प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पृ.२५९
[4] मांडे प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, पृ.२५६
[5] अय्या, हेमंत. *गोमंतकातील काणकोण तालुक्यातील लोकसाहित्य:चिकित्सक अभ्यास* पृ.२६१

प्रकरण चौथे

नेत्रावळी परिसरातील लोकगीते आणि प्रकार

४.१ स्त्रीगीते 69

४.१.१ फुगडी गीत 69

४.२ पुरूषगीते 78

४.२.१ नमन 79

४.२.३ रामा आणि हनुमंत 81

४.२.४ गणेश 82

४.२.५ स्थानिक देव दैवत 83

४.२.६ श्री कृष्ण 83

४.२.७ प्राणी 83

४.२.९ स्थलाचा उल्लेख 84

४.२.१० मोगरा 85

४.२.११ हनुमंताचा जन्म 85

समारोप 86

५.१ निष्कर्ष 87

संदर्भ 87

प्रकरण चौथे

नेत्रावळी परिसरातील लोकगीते आणि प्रकार

प्रस्तावना

मौखिक परंपरा आणि लोकवाङ्मयात येणारा एक प्रकार म्हणजे लोकगीते. पहिल्या प्रकरणात आपण लोकगीतांच्या सैद्धांतिक मांडणी करून लोकगीत म्हणजे काय?, लोकगीतांची संकल्पना, लोकगीतांच्या प्रेरणा, व्याख्या, अशी विषयाची मांडणी केली गेली आहे.

सदर प्रकरणाद्वारे नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा अभ्यास करण्याचे ठरविले आहे. नेत्रावळी परिसरातील लोकगीतांचा इथे अभ्यास होणार आहे. लोकगीतांचा आशय, लोकगीतांतून व्यक्त होणारे विषय, लोकगीतांतून आलेली भाषा, लोकगीतांतून दिसणाऱ्या स्त्रीच्या भावना, लोकगीतांतून येणारा निसर्ग, अशा अनेक विषयांची पडताळणी इथे केली जाणार आहे. लोकगीतांच्या प्रकारानुरुप इथे मांडणी आहे. प्रबंधिकेच्या प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे स्त्रीगीते आणि पुरूषगीते असे दोन विभाग पाडलेले आहेत.

४.१ स्त्रीगीते

इतर गोमंतकीय परिसराप्रमाणे नेत्रावळी परिसरातील स्त्रीगीते ही उत्सवप्रसंगी सादर केली जातात. गोमंतकात मौखिक परंपरेत स्त्रिगीतांचा वाटा महत्त्वाचा वाटतो कारण पुरुषगीते काही मोजक्याच ठिकाणी पाहायला मिळतात.

४.१.१ फुगडी गीत

गोमंतकातील स्त्रीगीतांमध्ये प्रचलित अशी लोकगीत म्हणजे फुगडी गीते होय. गणेश चतुर्थीमध्ये गोमंतकात मोठ्या प्रमाणात फुगडी खेळताना दिसतात. तसेच इतर सामुहिक प्रसंगाच्या वेळी अर्थात सरस्वती पूजन, लक्ष्मी पूजन अशा ठिकाणीही फुगडी खेळताना दिसतात. गीतांतून व्यक्तीच्या नामाचा उल्लेख करून फुगडी घातली जाते.

१.

चाप्यार कोण रे चडला, चप्यार कोण रे चडला
चप्यार वैभव चडला २
देव देव वैभव वेळ झाला चापी सदानंदाची २
गळ्या शामेळी बरी वाजता २
कांता ताळयेर बरो उदक् नावता २
दिसी शाबन तुवालो घेवुन धवता २

वरील गीतांतून व्यक्तीच्या नामाचा उल्लेख आलेला आहे. दुसऱ्याच्या बागेत किंवा घराशेजारील आसलेला चाफा तोडतो व उशीर झाल्याकारणाने सहकारी त्याला खालून लवकर येण्यास सांगतो आहे कारण चाफ्याचे झाड दुसऱ्याचे आहे. हे आपण गावात जास्त अनुभवत असतो. तसेच भाऊ, नवरा, प्रियकर यांची नावे घेवून वरील गीत सादर केले जाते. तसेच पुरूष झाडावर चडू शकातो या अर्थाने वरील गीतात पुरुषाची नावे उच्चारताना आढळतात.

गोमंतकीय फुगडी गीतात देवांचा उल्लेख अनेकदा आढळतो. तशाच प्रकारचे पुढील फुगडी गीत सदर फुगडी खेळताना वाकून घालावी लागते. एकेरी टाळीने फुगडीला सुरुवात होते.

२.

गाई नि गाई एक मौजेच्या माझे रंगले गो मन s s
पहिला अवतार सूर्याचा, सूर्य चालेल दिवसाचा
गाई नि गाई एक मौजेच्या माझे रंगले गो मन
दुसरा अवतार चंद्राचा, चंद्र चालेल रात्रीचा
गाई नि गाई एक मौजेच्या माझे रंगले गो मन
तिसरा अवतार रामाचा राम चालला हो वनवासा
गाई नि गाई एक मौजेच्या माझे रंगले गो मन
चौथा अवतार कृष्णाचा पदर धरिला राधेचा
गाई नि गाई एक मौजेच्या माझे रंगले गो मन

सदर गीतातून दोन गायीना पाहण्यात दंग झालेलाआहे. पुढे गीतांतून पुराणातील विष्णूचे दहा अवतार सांगितले. आहेत त्यतील काही मोजक्याच अवतारांचा उल्लेख गीतात आलेला आहे. तसेच त्या अवतारांचा आलेला संबंध दर्शविण्यात आला आहे.

सदर गीतातून यमक जुळविलेले आहे. दैनंदिन वरील गीतात आढळते बहिणभाऊ यांचे नातेही इथे दर्शविण्यात आला आहे.

३.

जाई-जुई फुलल्या रानात २
शब्द पडला बहिणीच्या कानात २
पणजी होड्यान भरला मीठ २
बहिणीन भावा धाडला चीठ २
जाई-जुई फुलल्या रानात २
पणजी होडी भरली साखर २
बहिणीची भावावर मायेची पाखर २
जाई-जुई फुलल्या रानात २
पणजी होडीत भरले तूप २
हिणीची भावाचेर माया खूप २

पूर्वीच्या गोमंतक कसा होता ते इथे गीताद्वारे सजते त्यावेळी होडीतून लोक प्रवास करायचे. त्यामुळे इथे होडीचा संदर्भ आलेला आहे. तसेच भावाची आठवण काढणाऱ्या बहिणीची काळजी, प्रेम या गीताद्वारे व्यक्त होते.

हिंदू धर्मात अनेक युगपुरुष होवून गेले. त्यांचे महात्म्य आजही आपण गात आहोत.त्यातील एक म्हणजे श्री राम. रामाचा भक्त आपल्या देवाची स्तुती करताना सदर गीतातून दिसून येते.

४.

रामाचे देवुळ भासे नित्य करू
नमस्कार मजला अवडे रामाचे ध्यान
खांद्यावर कुदळ मत्यात मुकुट
हातात धनुष्य बाण मजला आवढे रामाचे ध्यान
चंदन पाट रूप्याचे ताट
घालीन माळ रुंबडा मजला आवढे रामाचे ध्यान
डाव्या हाती साळी उजव्या टाळी
घालीन माळ तुळशी मजला आवढे रामाचे ध्यान

वरील गीताद्वारे श्री रामाचे वर्णन अलेले आहेत. प्रथम त्याला रामाचे मंदिर चांगले वाटते,

मानुस्त्याचे वर्णन करताना रामच असल्याचा भास होतो आहे. खांद्यावर कुदळ घेतलेला धनुष्यधारी राम वाटतो. असे अनेक वस्तूचा उल्लेक यात आढळतो.

ग्रामदैवत आणि लोकांचे नाते हे अतुट असते. आपापल्या गावातील दैवतांची नावे घेवून हे फुगडी गीत म्हटले जाते. यांचा नमूना पुढील गीतांमधून आपल्या दिसतो.

३.

आंब्या तुजो टाळो टाळो मोडून रथ घडयेला
कुणा देवाचा रथ घडयेला
लक्ष्मी देवीची रथ घडयेला
लक्ष्मी देवीची झाली सगुणा
लक्ष्मी देवीला जावू शरणा

वरील फुगडी गीतांतून नमुद केल्याप्रमाणे नेत्रावळी गावातील आलेल्या या गीतांमध्ये 'लक्ष्मी' देवीचा उल्लेख आलेला आहे. संवादात्मक किंवा प्रश्नोत्तरी पद्धतीचे असे हे गीत आहे. पहिल्या ओळीत आंब्याच्या झाडाला तुझी पाने तोडून रथाला बांधलेली आहे असे सांगण्यात येत आहे. तर दुसरी ओळ ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे. तर तिसऱ्या ओळीत त्या प्रश्नाचे उत्तर दिले गेले आहे. शेवटी तिला शरण जावूया असे सांगितले आहे.

राधाकृष्ण हे प्रेमाचे प्रतिक आहे असे आपण मानतो. 'नटखट' असे म्हणून आपण श्री कृष्णाला म्हणतो. त्याचे अनेक बालक्रिडा आपण वाचले, ऐकले, पाहिले असेलच. तर हा नटखटपणाचा एक नामुना या अर्थाने हे पुढील गीत आहे.

४.

राधा गवळण ताक चाळी
ग राधा गवळण ताक चाळी
कृष्णाने धरली तिची वेणी
रे कृष्णाने धरली तिची वेणी
सोड सोड रे माझी वेणी
तुला खायाला देते लोणी
कृष्णा खायाला देते लोणी

राधा गवळण ताक चाळी
ग राधा गवळण ताक चाळी
कृष्णाने धरिला तिचा हात
रे कृष्णाने धरिला तिचा हात
सोड सोड रे माझा हात
तुला खायाला देते भात
कृष्णा खायाला देते भात
राधा गवळण ताक चाळी
ग राधा गवळण ताक चाळी
कृष्णाने धरिला तिचा पदर
रे कृष्णाने धरिला तिचा पदर
सोड सोड रे माझा पदर
तुला खायाला देते भाकर
कृष्णा खायाला देते भाकर.

इथे राधा आणि कृष्णाचा संवाद या गीतात आलेला आहे. जेव्हा राधा 'ताक' चाळीत असते तेव्हा कृष्ण तीला सतावतो आहे. तो तिची वेणी धरतो त्यावर ती त्याला वेणी सोडायला सांगते जर वेणी सोडली तर खायला लोणी देणार असे म्हणते. तो तिचा हात धरतो तेव्हा भात देईन असे सांगते, कृष्णा तिचा पदर धरतो तेव्हा भाकर खायाला देते असे सांगून ती कृष्णाकडे विनवणी करताना दिसते.

घरातील स्त्री आणि अंगणातील तुळस यांचा संबंध खूप दृढ आहे. कुंकू, पायातील वेढ्या, हातातला चुडा, गळयातला मणी हे सर्व एका बाईच्या सौभाग्याचे प्रतिक असते. पुढील गीतात स्त्री आपले सौभाग्य मागत आहे.

५.

दारातल्या तुळशी गे पावन् पान फुलशी गे
कपाळाच्या कुकुमासाठी किती लोक वनवासी गे किती लोक वनवासी
दारातल्या तुळशी गे पानन्पान फुलशी
पायाच्या वेढणासाठी किती लोक वनवासी गे किती लोक वनवासी
दारातल्या तुळशी गे पानन्पान फुलशी
माथ्याच्या फुलासाठी किती लोक वनवासी गे किती लोक वनवासी
दारातल्या तुळशी गे पानन्पान फुलशी
हाताच्या चुड्यासाठी किती लोक वनवासी गे किती लोक वनवासी

दारातल्या तुळशी गे पानन्पान फुलशी
गळ्यातल्या मण्यासाठी किती लोक वनवासी गे किती लोक वनवासी

या गीताद्वारे स्त्रीची आपल्या अंगणातील तुळशीबरोबर संवाद करताना दिसते. ती तुळशीला अशीच बहरत रहा व आपल्या सौभाग्या हे रक्षण कर असे म्हणते. इथे स्त्री अपाल्या सौभाग्याची काळजी करताना दिसते. स्त्री जीवनाचे चित्रण इथल्या गीतांमधून अनेकदा पहायला मिळते. पुढील गीत नेत्रावळी परिसराबरोबर गोमंतकातील अनेक ठिकाणी थोड्याफार बदल करून पहायला मिळते. फुगडी प्रकारात आढळणारा हा प्रकार म्हणजे ‘झेमाडो’.

८.

झेम झेम झेमाडो
माझ्या दारान आमाडो
शेजान बाय माचे हांगा यो
माका मात्सो झाडू दी
झाडू माजो झरातलो गे
माय माका उलयतली गे
झेम झेम झेमाडो

या गीतातून शेजारी राहणाऱ्या दोन स्त्रियांचा संवाद आपल्याला दिसतो. एक स्त्री शेजारच्या बाईकडून झाडू मागते. झाडू झिझणार व आपली सासू आपल्याला बोलणार म्हणून झाडू देण्यास नकारते.

मनोरंजन, विनोदी ढंगाने इथे फुगडी गीते गायली जातात. देव दैवतांबरोबर मनोरंजन हा ही तितकाच महत्त्वपूर्ण आहे. याप्रकारच्या फुगडीला ‘बस फुगडी’ असे म्हणतात.

९.

अजीताची बायल दिसता कशी
अशी गे अशी अशी गे अशी
अजीताची बायल हासता कशी
अशी गे अशी अशी गे अशी
अजीताची बायल नाचना कशी
अशी गे अशी अशी गे अशी फु फु फु

१०.

हातात भरला हिरवा चुडा

चुडा ग लग्नाचा हा चुडा ग लग्नाचा
नवरीन बाई उपास धरला
उपास गं हळदीचा हा उपास गं हळदीचा
आई माझी दोन दिसाची सासू ग जन्माची
ही सासू गं जन्माची फु फु फु

वरील दोन्ही फुगडी गीतात स्त्रीचे वर्णन करताना दिसते. पहिल्या गीताद्वारे कोणत्याही वैवाहिक पुरूषाचे नाव घेवून त्याच्या बायकोला उद्देशून अशी गीते गायली जातात. तसेच दुसऱ्या गीतातून वधूला अनुसरुन गीत आलेले आहे. दुसरे फुगडी गीत हे 'बस फुगडी' या प्रकारात येते.

पूर्वी मुली जन्मताच सर्वात आधी आई – वडिलांना लग्नाचा प्रश्न सतावत होता. असाच एक प्रश्न तीच्या कुटुंबांना पडलेला आहे. या गीतातून नायकाच्या, बामणांच्या, मेस्ताच्या, अशा जाती विषयक नामाचा संदर्भ तिसऱ्या ओळीत येतो.

११.
सावताच्या तळयेर जल्मले साळू गो जल्मले साळु २
साळु गो बाळू दिवचे कोणा घरी गो दिवचे कोणा घरी २
दिवचे दिवचे नायकाच्या घरी गोॅ नायकाच्या घरी २
नायकपण करताना जलम नाही गो जलम नही २

उपरोक्त गीतातून कुटुंबीयांना पडलेल्या प्रश्नाला उत्तर शोधताना दिसतात. तसेच अनेक पर्याय ते बघतात. नायक, ब्राम्हण, सुतार इत्यादि.

स्थलनाम विशेष शब्दांच्या आधारे लोकगीते आपल्याला नेत्रावळी परिसरात आढळतात. हे गीताने कालांतराने स्वरूप घेतलेले आहे. यामध्ये अलेली 'बस' ग्रामीण जीवनावर पडलेल्या आधुनिकीकरणाचा प्रभाव दिसतो. नेत्रावळी लोकांसाठी बाजार हा सावर्डेचा आहे. त्यामुळे इथे सावर्डेचा उल्लेख पहायला मिळतो.

१२.
सावर्डे साकुन बस येता गरगरता
आवाजान जीव म्हाजो तळमळता
बसी वयलो दामु माका बसीर आपयता
केन्ना केन्ना माका पिक्चरा या म्हणता

सदर गीत सद्यस्थितीवर भाष्य करताना दिसते. बसचे किलिंडर आणि तरुण मुलीची जवळीक या गीतातून स्पष्ट होताना दिसते.

जीवन व्यक्त करणारे असे हे गीत आहे. सद्य परिस्थिती पाहता हे गीत त्यावर आधारलेले आहे. तिथे व्यवहारातील पैसा याबाबतीत येणाऱ्या फुगड्या ही म्हणतात.

१३.
कीतली म्हार्गाय गे सायबिणी, कीतली म्हार्गाय गे सायबिणी
सवसार कशो करचो आमी, सवसार कशो करचो आमी
बाजारात गेल्यावर दुड्डु पावना, बाजारात गेल्यावर दुड्डु पावना
हजाराच्या नोटीक आता मोल ना, हजाराच्या नोटीक आता मोल ना..

महागाई वाढल्याने त्रस्त स्त्रीची भावना इथे व्यक्त होताना दिसते. पूर्वी हजाराची नोटीला जास्त किंमत होती आता हजाराची नोट शंभर रुपयाच्या किंमती एवढी झालेली आहे. आशा महागाईत जीवन कसे जगावे हा प्रश्न तीला पडलेला आहे.

प्रत्येकाच्या घरापुढे लहानसे का असेना पण बाग ही असतेच. त्या बागेतील आसलेल्या मेथीच रोपाचे उल्लेख या गीतात आलेला आहे.

१४.
माझा दाराची बाई मेथी २
मेथी वाऱ्यान झाडपली झाडपली ग २
आई आई ती दूर गावी २
आई पाडीना नजरेस नजरेस ग २

या गीताची रचना लयबद्धतीने आलेली आहे. इथे मुलगी आपली मेथी वाऱ्याने त्याची पाने गळून गेल्याचे दुःख सांगत आहे. तसेच आपली आई दूर गावी गेल्याने ती नजरेत पडत नाही हे ही दुःख तिच्या वाट्याला आहे.

नेत्रावळी परिसरात ‘चावडीवर’ दत्त गुफा मंदिर आहे. त्यामूळे या फुगडी गीतात ‘दत्तात्रय’ देवाचा उल्लेख आलेला असावा.

१५.

दत्ता जगत्गुरू राया २
दरी फुलाला एक चाफा २
चाफा फुलुनी गांधळीला २
फुललेला चाफा देवक घालू या २
मोनेली कळीयो अमी माळूया २

१६.

देवा दत्तात्रय दिगंबर गुरुराया
जायेचो जायो काढ म्हणून सांगल्या
सुये दोरार घाल म्हणून सांगल्या
देवा दत्तात्रय.....
मोगारीचो मोगरी काढ म्हणून सांगल्या
रामनाथ देवा घाल म्हणून सांगगल्या
देवा दत्तात्रय.....

वरीप्रमाणे दोन्ही गीतांमध्ये ‘दत्तात्रय’ देवाचा उल्लेख आलेला आहे. पहिल्या गीतातून दारात चाफा फुललेला आहे तो देवाला घालूया आणि न फुललेले कळे स्वतः मळूया असे सांगण्यात आले आहे. दुसऱ्या गीतातून फुले गुंतून देवाला अर्पण करण्यात आलेल्या आहे. तिथे आसलेल्या दैवतांच्या उल्लेख करुन वरील गीत गायले जाते.

धालो हा नृत्यप्रकार नेत्रावळी परिसरात पहायला मिळतो. वेर्ले, बांधवाडा, वीचुंद्रे, सावरी या भागात धालो खेळल्या जातात. स्त्रीला व्यक्त व्हायला मिळणारे असे साधन म्हणजे हा ‘धालो’ आहे.

१७.

ओळी बाई ओळी गे यो
हळदिचो ओळी गे यो २
दातीकातरी माया बळी गे यो
आ खेळोक दिल्या मळी गे यो
मका खेळोक दिल्या मळी १
दुर्गे माये माया बळी गे यो
आ खेळोक दिल्या मळी गे यो
मका खेळोक दिल्या मळी २

१८.

आयल्या ओळी रंभा पायल्या ओळी रंभा
चरणी लागलो गे ss चरणी लागलो
चरणीच्या बायानो तुम्ही कशानी रानावळ दिलो गे
तुम्ही कशानी रानावळ दिलो गे

१९.

आयल्यान गाटी पयल्यान गाटी
उपर गाटी रे दानू उपर गाटी
दातीकात्री माया भायर सरला साखर वाटी रे दानू साखर वाटी
काणका पुता मणभर माती रे दानी मणभर माती
दातकातारे देवूळ बांधला मध्यानराती रे बांधला मध्यानराती
दुर्गेमाये देवूळ बांधला मध्यानराती रे बांधला मध्यानराती

नेतुर्ले आमच्या गाव गे सये
वाकडो तीकडो बीजी गे सये
वाकडो तीकडो बीजी
महालक्ष्मी माया भायर सरला
पालखी येत तेजी गे सये
पालखी येत तेजी गे सये

वरील गीतांमध्ये आपल्याला स्थानिक देव दैवतांचा उल्लेख दिसून येतो. दुर्गा माये, कणका पुता, महालक्ष्मी माया. तर ज्या परिसरात ती धालो म्हटली जातात त्या परिसराचा, गावाचा, स्थलाचा उल्लेख आढळतो जसे की वरील गीतांमध्ये आलेला ‘नेतूर्ले’ अर्थात नेत्रावळी. स्थानिक भाषेत तेथील लोक ‘नेतूर्ले’ म्हणतात.

४.२ पुरूषगीते

नेत्रावळी परिसरातील बहूतेक पुरूष गीते ही शिगमोत्सवानिमित्त गायली जातात. पुरूष गीतात नमन, तोणिया मेळ, आरत, गोफ इत्यादी.

४.२.१ नमन

कोणत्याही कार्याची सुरुवात ही गणेश वंदनाने होते. तसेच नेत्रावळी परिसरातील गावांमध्ये शिगमोत्सवाची सुरुवात अशीच केली गेली आहे.

२०.

ॐ करी या देवा ग नमन घालू
आनी पाताळीच्या शेष ग राया नमन घालू
आनी गवतरे माये गे नमन घालू
आनी धर्तरे माये गे नमन घालू
आनी तुळसाई माये गे नमन घालू
आनी सरस्वती माये गे नमन घालू
आनी चानासुर्या देवा नमन घालू
तय
आनी रामनाथा देवा तुका नमन घालू
आनी कळपुरुषा देवा नमन घालू
आनी चंद्रेश्वरा देवा ग नमन घालू
आनी भूतनाथा देवा ग नमन घालू
आनी पायका देवाक नमन घालू
आनी समेस्त देवा ग नमन घालू

वरील गीताद्वारे सुरुवातीला 'ॐ करी' देवा गा नमन घालू अशी सुरूवात आहे. 'ॐ करी' देव म्हणजे 'गणेश' तसेच शेष नागाला, धरती मायेला, तुळशीला, सरस्वती मातेला, चंद्राला, सूर्याला, सर्वप्रथम नमन केले गेले आहे.

वेर्ले गावातील हे नमन गीत असल्याने तिथे असलेल्या दैवतांचा उल्लेख करून पुढील गीत गायले आहे. एकंदर सुरूवात करून नंतर आपापल्या दैवतांना नमन केले जाते.

४.२.२ आरत

आरत या पौराणिक कथावर आधारलेल्या असतात. पौराणिक कथेचा एखादा प्रसंग घेवून ही गीते गायली जातात. रामायण, महाभारत, यासारख्या कथेचा संदर्भ त्या गीतातून आलेला असतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पुढील गीत.

२१.

अयोदे नगरी दर्शरत राजा बा
ये राजाच्या अवश्या नाही पुत्र फळ बा
ये पुत्र फळा विण राज्या बहु जाला दुखी बा
ये उटूनि दर्शरत गेला गुरु घरी बा
ये सप्न सांगे विशिष्ट गुरु बा
ये वीन जाऊन वंध स्वा पति बा
ये उटून दर्शरत आला आपल्या घरी बा
ये धनुष्य बाण राज्यान काडून घेतिला बा
ये बाणाचे भरन राज्यान फाटी मारीला बा
ये उटोनि दर्शरत गेला परदेशि बा
ये पर्वत विणता सुर्य मावळाला बा
ये सुर्य मावळलो थंय काळोक जालो बा
ये तळ्याच्या दड्यावर चालून गेलो बा
ये तळ्याच्या पाण्या येता स्वपती बा
ये वडाच्या वृक्ष्यावर दडूनी बसला बा
ये आई बाबाची कवळ श्रवणाच्या घरी बा
ये आईन बाबा त्यांनी कावडी बसविली बा
ये कावड घेतली खान्यावर श्रवणा
ये दिसान वर्णीवत भारी ग रावते रातीन चाल करीता बा
आईन बाबा त्यांच्या तान लागली बा
ये कवड ठेविले भूमिवर श्रवण
ये जारी घेऊन श्रवण चालला पाणी यासी बा
ये तळ्याच्या तड्यावर चालून गेलो बा
ये जारी बुडविली पाणीयासी बा रावजे
ये सराव पडला दर्शरता कानी बा
ये नियोणी बाण राज्यान सोडून दिला बा
ये सोडला रे बाण वोतला श्रवण त्या वेळे राम राम स्वारिला

या गीतांमधून दशरथ राजाची कथा सांगितली गेली आहे. श्रावण बाळाचा मृत्यु दशरथाच्या हातून कसा झाला ते या गीतातून समजते. राजाला मुले नव्हती त्यामूळे राजा दुःखी होता अशी या गीताची सुरुवात झालेली आहे. श्रावण बाळाच्या मृत्युनंतर त्याच्या आई- वडिलांनी दशरथ राजाला शाप दिला होता की ‘तूही असाच

पुत्रशोकाने मरण पावेल’ आणि झालेही तसेच राम वनवासाला असताना पुत्राच्या वियोगाने दशरथ राजाचा मृत्यू होतो. असे पौराणिक कथांचा आधार गीतांना येतो.

बारा वर्षानी ब्रम्ह देवाने होम मांडलेला आहे. त्या होमकुंडात जी सामग्री वापरलेली आहे याचा आढावा या गीतद्वारे घेण्यात आलेला आहे.

२२.
ये बारा वर्सा ब्रम्ह देव यवजण करे
आनी यवजण येवण ब्रम्हा लंके चालला
आनी लंके ब्रम्ह्यान चौक धरीला
आनी चौका ब्रम्ह्यान हुम माडीला
आनी रुमडीचे फळ रे ब्रम्ह्यान हुमा ठेविला
आनी बतीस पानाचो विडो ब्रम्ह्यान हुमा ठेविला
आनी तीळ रे तानुळ ब्रम्ह्यान हुमा ठेविला
आनी गंदचे गंद ब्रम्ह्यान हुमा ठेविला
आनी सुमडीचे काड ब्रम्ह्यान हुमा ठेविला
आनी गर्भाचे गर्भ कड्या ब्रम्ह्यान हुमा ठेविला
आनी बाऱ्या म्हूणोन ब्रम्ह्यान हुम जाळिलो
आनी तेरा म्हणोन तूप रे ब्रम्ह्यान हुम जाळिलो
आनी आकाशितले मोग तुप ब्रम्ह्यान हुमा जाळिला
आनी तेला रे तुपाच रे ब्रम्ह्यान धारो धीरला
आनी ब्रम्हा देवाच हुम सुकाळ जाल

मघाशी सांगितल्या प्रमाणे वरील गीत होमकुंडात जे जे ब्रम्ह देवाने घातलेले आहे याचा आढावा समग्रतेने इथे आढळतो. चौकोनी होमकुंड तयार करण्यापासून ते तूप आगीत घालण्यापर्यंत क्रम इथे दिसून येतो. शेवटी ब्रम्ह देवाचा यज्ञ सुखाळ होतो. असे वर्णन या गीतातून होते.

४.२.३ रामा आणि हनुमंत

२३.
सोड रे रावणा रामासिता
ना सोडिना राम लके येता
२४.
रामाच्या उतरा ताळे गेला
सोन्याच्या लके घातला वेडा

२५.

राम तुजो हनुमत बळी रे,
लंका जाळून केली होळी रे
अंजनिच्या सुता तुला रामाचं वरदान
एक मुखाने बोला बोला जय जय हनुमान जय राम

२६.

आंब्याची सावली चिचेवर
राम तुझे ध्यान मन सितेवर
बले बले बले बले शाबय

२७.

चान्येच्या पोरा तुका तिन गो पाट
रावणान सीते व्हेला दाखय वाट
बले बले बले बले
शाबय

शिगमोत्सवातील लोकगीतामध्ये येणारे हे वरील ताळ आहेत. या ताळ पौराणिक कथेतील पराक्रम, जयघोष व्यक्त करणारे आहेत. पहिल्या ताळात रावणाला उद्देशून म्हटले आहे की रामाच्या सीतेला सोडले नाही तर राम लंकेमध्ये येणार असे खडकावून सांगण्यात आले आहे. तसेच रामाच्या आदेशावर हनुमंताने सोन्याच्या लंकेला वेढा घातला आहे इथे त्याचा पराक्रम दर्शविण्यात आला आहे. जेव्हा हनुमंतला लंकेमध्ये रावण पकडतो आणि त्याच्या शेपटीला आग लावतो त्यावेळी हनुमंत त्याच्या लंकेला जाळून टाकतो या पराक्रमाचे महात्म्य गाणारे ते गीत आहे. एका वेगळया ढंगाने राम आणि सितेबद्दल प्रेम व्यक्त करणारे शेवटचे गीत आहे.

४.२.४ गणेश

२८.

हतीस सोणास रे गणेस पुजला
तेतीस कोटी देवा पुढे मान भोगला

वरील गीतातून गणेशाचे गुणगान गायले आहे. हत्तीच्या सोणीचा गणेश पुजलेला आहे. हिंदू धर्मात एकूण तेहत्तीस कोटी देव आहे असे म्हणतात त्या तेहत्तीस कोटी देवामध्ये त्याला पहिला मान दिलेला आहे. असा या गीताचा अर्थ आहे.

४.२.५ स्थानिक देव दैवत

२९.
देवळा भोवती ताबंडी माती
देविच्या देवळा जयटा वाती

इथे या गीताद्वारे स्थळातील देवीचा उल्लेख अडळतो. सदर गावातील देव दैवतांच्या नावाने वरील गीत सादर केले जाते.

४.२.६ श्री कृष्ण

३०.
गोविंदा रे गोपाळा, यशोदेच्या तान्ह्या बाळा
गोपाळा गोपाळा, देवकी नंदन गोपाळा

गोविंदा अर्थात श्री कृष्ण या गीतामध्ये श्रीकृष्णाच्या दोन्ही मातेचा एक जन्म देणारी देवकी माता आणि पालन करणारी माता यशोदा असा उल्लेख आलेला आहे.

४.२.७ प्राणी

३१.
बिली बिली माजरा वरशे दोळे
वर्साचो मेळ येऊन खेळून गेले

या गीतात शिगमोत्सवातील येणाऱ्या ‘मेळ’ वर्षातून एकदा येतो त्यामूळे या गीताची रचाना झाली आहे.

ग्रामीण भागातील लोकांचे जीवन हे कष्टमय असते. तेथील लोकांचा उल्लेख सदर गीतातून आलेला आहे. तसेच या गीतातून ग्रामजीवनातील राहणीमान लक्षात येतो.

३२.

दोंपराचो भार झाला धूल तापला
तासणी कुऱ्हाड घेवुन भायर सरला

गावातील लोकांचे जीवन प्रतित करणारे हे गीत असून दुपार झाल्याने उष्णतेमुळे माती गरम झालेली आहे अशावेळी एक इसम कुऱ्हाडी तासनी घेवून निघतो आहे. असा याचा अर्थ आहे.

४.२.८ विठ्ठल

३३.

जलमाक येवचे पांढरी जावचे
दर्शन घेवचे विठ्ठलाचे

३४.

हाणा एक कुदळ काढा एक धेपा
त्यात रोवया रोपा हो तुळशीचे
त्या तुळशीचे रे दोन चार खूर
पांडुरंग देर हो तुळशीचा
चला जाऊ चला जाऊ पांडुरंग भेटे
पांडूरंग भेटला हो अर्ध्या वाटे

या गीतातून माणसाने जन्माला येवून एकदातरी पंढरपूरला जावून विठ्ठलाचे दर्शन घ्यावे असे सांगण्यात आले आहे. तसे दुसऱ्या गीतातून पंढरीच्या वारीचे वर्णन दिसून येते. वारीला जातांना स्त्रिया डोक्यावर तुळस घेवुन पायी चालत जातात. त्यामूळे या गीतातून तुळशीचा उल्लेख आलेला आहे.

४.२.९ स्थलाचा उल्लेख

३५.

पातु कणस रे करमलाचें दांव
लहानाचे व्हड जांव वेर्लेकारा नाव

आपल्या गावाबद्दल सर्वांना एक आत्मीयता, आपुलकी असते तसेच एक गीत ज्यामध्ये ग्राम नामाचा उल्लेख येतो. हे गीत लोक आपापल्या गावाचा उच्चर करुन गातात.

४.२.१० मोगरा

३६.
वयल्या वयल्या डोंगरार फुलला मोगरा
देवा तुझ्या नगरा उत्सव झाला
बले बले बले बले
शाबय

३७.
फुलला मोगरा फुलला मोगरा
रामनाथ देवा तुझ्या अंगणी फुलला मोगरा
चंद्रेश्वर देवा तुझ्या अंगणी फुलला मोगरा

ग्रामीण भागातील गीत असल्याने ईथे ‘डोंगरा’असा उल्लेख दिसतो. म्हणजे ‘डोंगराळ भाग’ असा आहे. ‘नगरा’ असा शब्द परिसरासाठी वापरण्यात आला आहे. दुसऱ्या गीतात गावातील दैवतांचा उल्लेख आहे.

४.२.११ हनुमंताचा जन्म

३९.
असे कैकयीचा पिंड एक घारीने नेला बा,
कैकयीचा पिंड एक घारीने नेला
घारीने नेला पिंड अंजनी मिळाला बा,
घारीने नेला पिंड अंजनी मिळाला
अंजनी राणीयेन भक्षण केला बा,
अंजनी राणीयेन भक्षण केला
भक्षण करता राणीयेन गर्भ सांभाळीला बा
भक्षण करता राणीयेन गर्भ सांभाळीला

गर्भ सांभाळीता राणीयेक नऊ मास गेले बा
गर्म सांभाळीता राणीयेक नऊ मास गेले
नऊ मासाने राणी प्रसूत जाली बा
नऊ मासाने राणी प्रसूत झाली
असे जनमला हनुमंत राजा रे देवानो बा
जनमला हनुमंत राजा रे देवानो

हनुमंत ही रामायणातील महत्त्वाची अशी व्यक्तीरेखा आहे. वरील गीततून रामायणाचा संदर्भ आलेला आहे. सदर गीताच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत या गीतातून हनुमंताचा जन्माचे चित्रण आलेले आहे. ***"एका आख्यायिकेनुसार, त्रेतायुगात दशरथ राजाच्या तीन राण्या होत्या मात्र काही केल्या त्यांना संतानप्राप्ती होत नव्हती. मग पुत्रप्राप्तीसाठी हवन करण्यात आला. हवन संपल्यानंतर गुरुदेवांनी राजा दशरथाच्या तीन राण्या कौशल्या, सुभद्रा आणि कैकेयी यांना प्रसादाच्या खीरीचं वाटप केलं. त्यावेळी खीरीचा थोडासा भाग एका पक्ष्याने पळवून नेला होता.***

तो पक्षी उडत अंजनीच्या आश्रमात गेला.माता अंजना जिथे तपश्चर्या करत होती तिथेच त्या पक्ष्याच्या चोचीतली ती खीर माता अंजनीच्या हातात सांडली. ती खीर भोलेनाथाचा प्रसाद आहे असं मानून अंजनीने ती खीर खाल्ली आणि त्यातून शिवाचा अंश असलेल्या हनुमानाचा जन्म झाला असं सांगण्यात येतं. तो दिवस चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या पौर्णिमेचा दिवस होता म्हणून या दिवशी हनुमान जयंती साजरी केली जाते"[1].

समारोप

सदर प्रकरणामध्ये नेत्रावळी परिसरातील लोकगीतांच्या इथे अभ्यास झालेला आहे. इथे पुरुषगीते आणि स्त्रिगीते असे दोन भाग पडण्यात आले आहे. संकलनाच्या आधारे मिळालेल्या गीतांची पुढे मांडणी केली गेली आहे. ती गीते कोणत्या अनुषंगाने आलेली आहे याचा पडताळा इथे झालेला आहे.

सर्वेक्षणावतून असे समजले की जी लोकगीते तेथील लोक म्हणतात ती त्यांच्या आधीच्या पिढीपासून आलेली आहे. त्यामूळे लोकगीते ही पिढ्यान् पिढ्या संक्रमित होत असतात या वाक्याचा इथे प्रत्यय येतो सर्वेक्षणातून संकलित केलेल्या लोकगीतांचा अभ्यास सदर प्रकरणात झालेला आहे. वरील गीतांचा आशय इथे मांडण्यात आला आहे.

५.१ निष्कर्ष

१) लोकगीतातून तेथील स्थलवैशिष्ट्य दिसून येतात.

२) नेत्रावळी परीसरातील लोकगीतातून स्त्री जीवन विविध संदर्भात आढळतात.

३) नेत्रावळी परिसरातील लोकगीतांमधून संवादात्मक शैली दिसते.

४) नेत्रावळी परिसरातील लोकागीतामधून जीवनाचे अनेक पडसाद उमटलेले आहेत.

५) नेत्रावळी परिसरात येणाऱ्या लोकगीतांतून स्थानिक देव दैवतांचे उल्लेख आढळतात

६) शिगमोत्सवातील गीतांमध्ये येणारी ‘आरत’ यात पौराणिक कथेचा संदर्भातून आलेला आहे

संदर्भ

[1] https://marathi.hindustantimes.com/amp/religion/hanuman-birth-story-141680410938748.html

प्रकरण ५

निष्कर्ष

लोकसाहित्य या विषयी अभ्यास करत असताना लोकगीत हा त्यामधला प्रमुख असा प्रकार आहे हे समजून येते. तसेच नेत्रावळी या परिसरातील एकूण आढावा दुसऱ्या प्रकरणात घेतलेला आहे.तसेच नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्ग्याची पडताळणी केलेली आहे. एकूण प्रबंधिकेतील प्रमुख चार प्रकरणांच्या मांडणी दरम्यान आकलना आलेल्या निष्कर्षाची मांडणी सदर प्रकरणामध्ये मांडण्यात आली आहे.

१) लोकसाहित्य हे एकट्याचे नसून ते सर्व लोकांचे आहे व त्यातून समाज जीवनाचे दर्शन घडते.

२) 'पारंपरिकता' हा लोकसाहित्याचा केंद्रबिंदू असतो.

३) परिसराचा प्रभाव हा अपरिहार्यपणे तिथल्या संस्कृतीवर जाणवतो आणि त्याचे प्रतिबिंब लोकासाहित्यातून दिसते.

४) 'सहाजिकता' आणि 'अनामिकता' ही लोकसाहित्याची प्रमुख लक्षणे आहे.

५) लोकसाहित्य हे व्यापक असल्यामुळे वर्गीकरणानूरुप त्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

६) गोमंतकीय लोकासाहीत्यावर बाहेरच्या राज्यकर्त्यांचा प्रभाव दिसून येतो.

७) 'नेत्रावळी' हा परिसर कर्नाटक राज्याच्या सीमा जवळ असल्याकारणाने अथवा पूर्वी परिसरात स्थायित झालेला द्रविडी ब्राह्मणामुळे 'हळ्ळी' या कानडी शब्दामुळे नेत्रावळी या स्थलनामाचा उगम झालेला आहे.

८) सांगे तालुक्यातील नेत्रावळी परिसर पर्यटनाच्या क्षेत्रात महत्त्वाचाअग्रेसर ठरतो.

९) नेत्रावळी परिसरात उत्पादनाच्या क्षेत्रात अनेक प्रयोग होत असल्याने या परिसराला वेगळा आयाम प्राप्त झालेला आहे.

१०) गावगाड्यात येणाऱ्या जाती जमाती तेथील परिसरात आढळतात.

११) नेत्रावळी परिसरातील लोकवाङ्ग्यातून येथील लोकजीवनाचे चित्रण समोर येते.

१२) इतर परिसराप्रमाणे नेत्रावळी परिसरातील लोककथांचा आशय ग्राम संबंधी आणि ग्रामकेंद्री आहे.

१३) लोककथांतून येथील पर्यावरणाचा संदर्भ आढळतो.

१४) स्थानिक देव दैवतांचा सहसंबंध ग्राम जीवनाशी येतो.

१५) नेत्रावळी परीसरातील लोकगीतातून स्त्री जीवनाचे पडसाद उमटलेले आहेत.

१६) नेत्रावळी परिसरातील लोकगीतांमधून संवादात्मक शैली दिसते

१७) नेत्रावळी परिसरात येणाऱ्या लोकगीतांतून स्थानिक देव दैवतांचे उल्लेख आढळतो.

१८) शिगमोत्सवातील गीतांमध्ये येणारी 'आरत' ही पौराणिक कथेचा संदर्भातून आलेला आहे.

१९) नेत्रावळी परिसरातील लोकगीते ही नाते संबंध, खट्याळपण या संदर्भातून येतात.

२०) लोकसाहित्य हे स्थिर नसून ते परिवर्तनशील असते

२१) अनुभव' आणि 'पारंपरिकता' हा लोकसाहित्यातील लौकिकतेचा महत्वाचा घटक असतो.

२२) लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती हे साम्यदर्शी असून मानवी जीवनाचे प्रतिबिंब त्यातून उमटते.

२३) 'मांड' ही सामूहिक वैशिष्ट्य लाभलेली जागा असून गोमंतकीय लोकसंस्कृतीत तिला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

२४) नेत्रावळी परिसरात धार्मिक कार्यात 'कुळमी' ही जमात महत्त्वाची ठरते.

२५) 'महार' या जातीला येथील समाजात महत्त्वाचे स्थान असून त्यांच्याशिवाय येथील उत्सवाला प्रारंभ होत नसतो.

२६) सांगे तालुक्यातील इतर परीसराप्रमाणे येथील परिसरात असलेला धनगर समाज हा आपली वेगळी संस्कृती जपत आहे.

२७) आधुनिकतेचे आकर्षण येथील लोकांमध्ये असले तरी परंपरा टिकविण्याचे कार्यही समाजाकडून होते.

२८) 'निसर्ग' हा नेत्रावळी परिसरातील समाजाचे महत्वाचे दैवत आणि श्रद्धास्थान आहे.

२९) ग्रामनुरुप काही लोकागीतामध्ये बदल येथील परिसरात दिसून येतात.

परिशिष्ट

परिशिष्ट १ 92

गोमंतकाचा प्रशासकीय नकाशा 92

परिशिष्ट २ 93

नेत्रावळी परिसराचा नकाशा 93

३.१ वेर्ले गावाची गृहिणी चुलीवर चहा बनवताना 94

३.२ गृह बांधणी 95

परिशिष्ट ३ 94

छायाचित्रे 94

३.३ वेर्लेचे ग्रामदैवत रामनाथ 95

३.४ वेर्ले गावची शेती लागवड 96

३.५ 'नुने' गावात साजरा होणारा सामुहिक गुडीपाडवा 96

३.६ नुने गावातील छत्री 97

३.७ वेर्ले गावातील गुलालोत्सव 97

३.८ नुने गावातील दिवज लावताना कुमारिका 98

३.९ वेर्ले गावातील वेळीपांच्या देवताला वंदन करताना 98

३.१० वेर्ले गावातील दिवज लावताना कुमारिका 99

३.११ वेर्ले गावातील दसऱ्याच्या दिवशी सजवलेली तळी 99

३.१२ वेर्ले गावची दसऱ्याच्या दिवशी पालखी ताळीवर घेऊन जाताना 100

३.१३ वेर्लेचे ग्रामदैवत रामनाथ मंदिरात दसऱ्याला भजन करताना 100

३.१४ नुने गावातील तुलसी विवाह 101

३.१५ वेर्लेची उजा जत्रा 102

३.१६ वेर्ले गावातील रामनाथ मंदिराच्या पाटांगणातील तुळस 102

३.१७ नेत्रावालीतील दत्त गुफा मंदिर....103
३.१८ नेत्रावळीतील बुडबुड तळी....103
३.१९ वर्गणीचे सप्तकोतेश्वर मंदिर....104
३.२० वेर्ले गावातील स्ट्रॉबेरीची लागवड....104
३.२१ नेत्रावळीतील सिद्धेश्वर मंदिर....105
३.२२ वेर्लेचे रामनाथ मंदिर....106
३.२३ वेर्ले गावातील वेळीप दिवज प्रज्वलित करताना....106
३.२४ नुनेचा जल्मी देव....106
३.२५ नुनेची महामाया....107
३.२६ वेर्लेचा भूतनाथ....108
३.२७ वेर्लेचा रामनाथ....108
३.२८ वेर्लेचा चंद्रेश्वर....109
३.२९ वेर्लेचा कळपुरुष....109
परिशिष्ट ४....110
प्रबंधिकेतील कठीण शब्द....110

परिशिष्ट १
गोमंतकाचा प्रशासकीय नकाशा

सौजन्य:- https://en.m.wikipedia.org/wiki/Sanguem_taluka

परिशिष्ट २

नेत्रावळी परिसराचा नकाशा



सौजन्य:- https://tcp.goa.gov.in/wp-content/uploads/2019/02/land-use-plan/Sangue

परिशिष्ट ३
छायाचित्रे

३.१ वेर्ले गावाची गृहिणी चुलीवर चहा बनवताना

३.२ गृह बांधणी

३.३ वेर्लेंचे ग्रामदैवत रामनाथ

३.४ वेर्ले गावची शेती लागवड

३.५ ‘नुने’ गावात साजरा होणारा सामुहिक गुडीपाडवा

३.६ नुने गावातील छत्री

३.७ वेर्ले गावातील गुलालोत्सव

३.८ नुने गावातील दिवज लावताना कुमारिका



३.९ वेर्ले गावातील वेळीपांच्या देवताला वंदन करताना

३.१० वेर्ले गावातील दिवज लावताना कुमारिका

३.११ वेर्ले गावातील दसाऱ्याच्या दिवशी सजवलेली तळी

३.१२ वेर्ले गावची दसऱ्याच्या दिवशी पालखी ताळीवर घेऊन जाताना

३.१३ वेर्लेचे ग्रामदैवत रामनाथ मंदिरात दसऱ्याला भजन करताना

३.१४ नुने गावातील तुलसी विवाह

३.१५ वेर्लेची उजा जत्रा

३.१६ वेर्ले गावातील रामनाथ मंदिराच्या पाटांगणातील तुळस

३.१७ नेत्रावालीतील दत्त गुफा मंदिर

३.१८ नेत्रावळीतील बुडबुड तळी

३.१९ वर्गणीचे सप्तकोतेश्वर मंदिर

३.२० वेर्ले गावातील स्ट्रॉबेरीची लागवड

A peek into South Goa's strawberry farm

Goa gets its own share of fresh strawberries from a farm in Netravali, run by the community from Verlem

Flexcia.Dsouza@timesgroup.com

While you may think of Mahabaleshwar when you think of strawberries, South Goa has its own strawberry farm. Located in the village of Verlem, in Netravali, the farm sees around 10 local women engaged in it. Though not popular among tourists yet, the farm is frequented by people from all parts of Goa, who visit and even buy fresh strawberries from there.

Laxmi Gaonkar, one of the ladies involved in the project, tells us. "In 2013, some of the villagers took up strawberry farming. But they got a good crop only in the first few years, which is why they discontinued. When members of farmers help group, Atal Gram Development Agency, reached out to us, we decided to try it out. They helped us set it up."

With help from experts, the villagers procured saplings from Mahabaleshwar and have been successfully running the farm. "We went to Mahabaleshwar for training for a week. And learnt how to tend to these plants properly so it can yield good fruit," she tells us, adding, "We usually pluck fresh fruits and it gets sold out within hours since most visitors buy it here itself."

Ten women are a part of the strawberry farm in South Goa; (left) the berries grown on the farm in Verlem

३.२१ नेत्रावळीतील सिद्धेश्वर मंदिर

३.२२ वेर्लेचे रामनाथ मंदिर

३.२३ वेर्ले गावातील वेळीप दिवज प्रज्वलित करताना

३.२४ नुनेचा जल्मी देव

३.२५ नुनेची महामाया



३.२६ वेर्लेचा भूतनाथ

३.२७ वेर्लेचा रामनाथ

३.२८ वेर्लेचा चंद्रेश्वर

३.२९ वेर्लेचा कळपुरुष

परिशिष्ट ४

प्रबंधिकेतील कठीण शब्द

- माटोव – मंडप
- कीर – पोपटाला स्थानिक भाषेत कीर म्हणतात
- खेत्र – ज्या दिवशी गावात प्राण्यांचे बळी देऊन देवाला अर्पण करतात तो दिवस
- चाना सूर्या –चंद्र सूर्य
- राच्चो – रात्रीचा
- फाटल्यान –पाठीमागे
- तेजेकडे –तिच्याकडे/ त्याच्याकडे
- तेन्ना – तेव्हा
- गोरवा – गुरे
- सायडिंच्या- बाजूच्या
- राच्चो- रात्रीचा
- चोवगे- चार जण
- पुनाईलो गोळा करणे
- पोराण- प्राण
- तेकोन- जवळ
- साकुन - हून

- कुदळ - खणण्यासाठी वापरीले जाणारे लोखंडी अवजार
- माळ्याक रावोप - शेतात उभारलेली उंच माचण ज्यामध्ये शेतकरी रात्री थांबून पहारा देतो.
- मास्सो - जरासा/ थोडासा
- वोयलो -वरचा
- घराश्यो - घरी
- धुये – मुलगी (कोंकणीत मुलीला धु म्हणतात.
- खाणीर – काखेत घेणे
- मुकाल्ले – समोरचे
- चापी – चाफ्याचे फुल
- तुवलो – टावेल
- दुद्डू – पैसा
- पर्वत विणता – पर्वत चालता
- वर्णीवत – इथे गीतामध्ये याचा अर्थ उष्णता /दुपारची वेळ या अनुषंगाने आलेला आहे.
- सरांव – आवाज
- गर्भाचे गर्भ कड्या – इथे गीतांत त्याचा अर्थ केळीचे मुंडे असा आहे.जे होमकुंड मांडण्यासाठी वापरले जाते.
- कुऱ्हाड – लाकडे तोडण्यासाठी वापरण्यात येणारे लोखंडी अवजार
- दांव – झाडाचे मुळ

संदर्भग्रंथ

(अ) संदर्भसूची

१) कुबल, रमेश. *लोकसाहित्याचे अतरंग*. मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर

२) देसाई, रत्नाकर राघोबा. *'गोवा स्थलनामांची जडण घडण'* प्रकाशन,अक्षर जुळणी बी-३०२, शिवं सहकारी गृहनिर्माण संस्था, सेक्टर ४ आणीन पनवेल पूर्व रायगड.

३) सातोस्कर बाळकृष्ण, *'गोमंतक: प्रकृती आणि संस्कृती'*, शारदीय प्रकाशन पणजी गोवा, खंड १ प्रथम आवृत्ती

४) संपादक जोशी, नीला गिरीश, लटके, सागर अशोक. *लोकसाहित्य व लोककला*. एम. ए. भाग १ :मराठी. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

५) संपादक. भोसले. द. ता. *लोकजीवन आणि लोक संस्कृती*

६) प्रभू देसाई उल्हास, *'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी'*. प्रकाशक/कर्ता, प्रभू देसाई, उल्हास. टाकी शेल्डे, केपे गोवा, १ जानेवारी २००३.

७) मांडे, प्रभाकर. *लोकसाहित्याचे स्वरूप*, गोदावरी प्रकाशन, अहमदनगर, सौ वृशाली अविनाश मांडे १२३, साधना हौसिंग सोसायटी,प्रोफेसर चौक, सावेडी अहमदनगर,२०१७.

८) व्यवहारे, शरद. *लोकसाहित्य: उद्गम आणि विकास*. विश्वभारती प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती

९) प्रभू देसाई, उल्हास, *'लोकवेदांचे कूळ नि मूळ'*. प्रकाशक, गोमंतक मराठी अकादमी, ४ था मजला, राणी प्रमिला अकेंड १८ जून मार्ग, पणजी गोवा.

१० संपादक, मडगावकर, विनय. *'लोकसाहित्याचा अभ्यास :संशोधन व आव्हाने'* प्रकाशक, गोवा विद्यापीठ, मराठी विभाग, २१ फेब्रुवारी २०१९.

११ मांडे, प्रभाकर. *'लोकसाहित्याचे स्वरूप'* गोदावरी प्रकाशन, 'मंगलप्रभा' १०९ , एन -५ दक्षिण, सिडको औरंगाबाद,१९५६.

१२ मोरजे, गंगाधर. *'इतिहास आणि लोकसाहित्य'*, प्रकाशक, दास्ताने रामचंद्र आणि कं. ८३०, सदाशिव पेठ पुणे.१९९९.

१३ शिंदे, विश्वनाथ. *लोकसाहित्यमिमांसा भाग १*, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस पुणे, प्रथम आवृत्ती

१४ व्यवहारे, शरद. *लोकपरंपरा लोकधाटी*, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २००२.

१५ खेडेकर, विनायक. गोवा कुळमी: पर्यावरण संस्कृतीचे जनक, रक्षक. संपर्क मध्यम, फेब्रुवारी २००४

१६ संपादक, भोसले, द. ता. लोकजीवन आणि लोकसंस्कृती. सचिव, महाराष्ट्र साहित्य मंडळ, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत, तिसरा मजला, १७२, म्दादार (पूर्व) मुंबई.

(ब) प्रबंध

१) माजिक चंद्रकांत दुर्गेश. गोमंतकीय लोकनाट्याच्या अनुषंगाने 'रणमाले' चा चिकित्सात्मक अभ्यास. (प्रबंध) गोवा विद्यापीठ, गोवा, २०२१.

२) हेमंत बाळकृष्ण अय्या. गोमंतकातील काणकोण तालुक्यातील लोकसाहित्य:चिकित्सक अभ्यास. (प्रबंध) गोवा विद्यापीठ, गोवा, २०२३

(क) वृत्तपत्रातील छापील संदर्भ

१) खेडेकर, विनायक. 'विविधरंगी शिगमोत्सव', दैनिक तरुण भारत, ६ मार्च २०२३.

२) सावईकर, रमेश. 'कष्टकरी श्रमजीवींचा शिगमोत्सव, ११ मार्च २०२३

(ड)संकेत स्थल

1. https://www.heraldgoa.in/Goa/%E2%80%98Untapped-and-undeveloped%E2%80%99-hotspots-leave-Netravali-backward-/162413
2. https://goanvarta.net/story.php?id=41306
3. https://goanvarta.net/story.php?id=39331

(प) व्यक्तिनाम सूची

१) **रामचंद्र जीव गावकर** (वरिष्ठ ग्रामस्थ) - बांधवाडा, नेत्रावळी.

२) **कुष्ट नोळू गावकर** (वरिष्ठ ग्रामस्थ) - बांधवाडा, नेत्रावळी.

३) **चंद्रकांत राम गावकर** (वरिष्ठ ग्रामस्थ) – वेर्ले, नेत्रावळी.

४) **पावन नाईक** (लोककलाकार) - विचुंद्रे,नेत्रावळी**.**

५) **तुषार भंडारी** (लोककलाकार) - मार्गवाडा,नेत्रावळी.

६) **तुळशी** (गृहिणी) - बांधवाडा, नेत्रावळी**.**

७) **प्रभाकर देविदास** (वरिष्ठ ग्रामस्थ) वेर्ले, नेत्रावळी.

८) **विनय गावकर** (लोककलाकार) वेर्ले, नेत्रावळी.

९) **हरीश फडते** (लोककलाकार) मार्गवाडा,नेत्रावळी.

१०) **अक्षदा गावकर** (लोककलाकार) वेर्ले ,नेत्रावळी.

११) **नेत्रा गावकर** (लोककलाकार) विचुंद्रे